
# नवलाईचे नवरंग




लेखक

मो. अ. पसारकर

REFBK-0027259

# नवलाईचे नवरंग



लेखक

प्रो. अ. पसारकर

REFBK-0027259

# नवलाईचे नवरंग

भू-प्रयोग
प्र. क्र. ७६०
(स्थळ प्रत)

REFBK-0027259
REFBK-0027259

क

मो. अ. पसारकर

प्रकाशक :

सौ. शा. मो. पसारकर

२१, गावंडे ले आऊट रींग रोड,

नागपूर ४४००१५.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधिन

कींमत :- ३० रूपये

# प्रस्तावना

नवलाइचे नवरंग हे युरोप आणि अमेरीकेतील प्रवास वर्णन आहे. युरोपचा प्रवास जुन जुलै १९८९ मधला त्या वेळच्या लोकशाही देशांचा हा प्रवास आहे. इतिहास कालीन घटना तसेच त्या वेळच्या सामाजिक प्रश्नांचे संदर्भ त्यात आहेत. युरोप मधल्या प्रवासांत दर देशाच्या सीमेवर नाण्याचा प्रश्न येतो व डॉलरचे तेथील चलनी नाण्यात रूपांतर हा पहिला प्रश्न तसेच भाषेची कायम अडचण जाणवते. एफेल टॉवरवर भेटलेल्या फ्रेंच प्रोफेसर दांपत्यांशी खाणाखुणा करूनच संभाषण झाले. कागदावर चित्र काढून त्यावरून चर्चा करण्याची त्यांची पध्दत फारच नावीण्य पूर्ण वाटली.

पॉरीसच्या रस्त्यावर २०-२५ लोक सहानुभूतीनी मदत व मार्गदर्शन करण्या करीता सभोवती जमली होती, परंतु त्यात इंग्लीश समजणारे ३-४ च लोक मिळाले आणि तुटक इंग्लीश बोलणारे तर दोघेच निघाले. जर्मनी मध्ये एका बगीच्या जवळ ४ वर्षाचे शाळकरी मुलं आणि त्यांच्या माता हयांच्याशी हातवारे करीतच माहिती मिळाली. हॉलंड मध्ये १२-१३ लिटर दुध आच ेत घेऊन चालण्यात अडचणी येणाऱ्या गाई व त्यांच्या सोबतची अनोखे डच भाषेचे उच्चार बोलणारी बाळसेदार माणसं हयानी खूपच वेगळी करमणूक केली. आपली मातृ भाषा फार क्लीष्ट आहे म्हणून आपल्या मुलांना ती न शिकविता फ्रेंच भाषा शिकवणारे हे लोक अद्वितीयच म्हणायचे.

अमेरीकेचा प्रवास हा ऑगस्ट सप्टेंबर १९९२ मधला, त्यांच्या अध्यक्षांच्या निवडणूक प्रचाराच्या दिवसातला हा प्रवास आहे. आपला अध्यक्ष आपल्या पत्नीशी इमानदार असलेला कोणत्याह भ्रष्टाचारा पासून दूर, देश प्रेमी साहसी असावा ह्या विचारांनी भारलेल्या मतदारांच्या काळांतला हा प्रवास होता. आपल्या कडच्या अनेक दलांच्या निवडणूक दलदली पेक्षा तिकडची ही मखमली निवडणूक प्रचार मोहीम फारच आगळी वेगळी वाटते.

गुन्हेगारी वृत्तीची माणसं सोडली तर बाकी समाजात सुबत्ता, समृध्दी हयामुळे येणारी मनाच उदारता प्रगलभता, नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची वृत्ती हयांचे अनोखे दर्शन होते. माणूस मुळातूनच स्तुतीप्रिय असतो. त्यात आपली क्षमा मागुन आपली स्तुती एक्सलंट, फॅन्टॉस्टीक वगैरे शद्बांनी केली तर आपल्या अंगावर किती मुठ मांस

चढते ते मोजणे ही कठीणच? तो जगा वेगळा अनुभव मराठी माणसाच्या मनाच्या सुखद स्मृतीत कायम राहतो.

हे प्रवास वर्णन वाचकांना करमणूक व ज्ञान वर्धक होईल अशी आशा आहे.

हे पुस्तक प्रकाशकानी अलप वेळात प्रेस कॉपी तयार करून प्रकाशीत केले त्या बद्दल त्यांचा आभारी आहे. तसेच सौ. कुळकर्णी व त्यांचे झीरो सिस्टीमच्या सहकाऱ्यानी सुबक छपाई अल्प वेळात केली त्या बद्दल त्या सर्वांचे मी आभारी आहे.

**मो.अ. पसारकर**

७६० २८२५९ १७/२/१८

# युरोपची नवलाई

शाळेत असताना युरोपचा भुगोल तसेच तीकडील राजकीय परिस्थीती बद्दलची माहीती वाचत असु. त्यातही इटली, फ्रान्स, जर्मनी ह्या देशाबद्दलची माहीती जास्त लक्ष वेधुन घेत असे. लंडनचा ट्राफळगार चौक हाईडपार्क, बीगबेन टॉवर ह्या बद्दलची माहीती वाचुन ह्या बद्दल कुतुहल वाटत असे. लंडनच्या टॉवर ब्रीज वरून थेम्स नदीचे दृष्य कींवा एफेळ टॉवर वरून पॅरिसचे निहंगम दृष्य पहावयास मिळेल हे स्वप्नच होते व ते जवळ जवळ अशक्यच वाटत होते. पण तसा परदेशी जाण्याचा योग जुळुन आला व युरोप मधील त्या वेळचे प्रसिध्द लोकशाही देश व इग्लंड पहाण्याचे ठरले. त्यात इटली, फ्रान्स, जर्मनी, स्वीसझारलंड हॉलंड आणि इग्लंडचा समावेश होता. पासपोर्ट तयार होताच. ह्या सहा देशांचे व्हीसा काढायचे होते. इग्लंडचा व्हीसा करीता त्यांच्या वकालतीत स्वतः जायचे होते. त्या कार्यालयात मोठी लाईन. त्यात सर्व प्रांतातले लोक होते. परंतु फक्त एकच मराठी बाई होत्या त्यांच्याकडून कळले की यांचा मुलगा व सुन लंडनला राहतात आणि त्या बाई दर वर्षाचा उन्हाळा लडनला घालवीतात. एक मराठी बाई भारत लंडन हे घर अंगणा सारखे समजते हे पाहुन मराठी प्रगतीची प्रचिती आली.

तीथल्या मेरी बाईनी आपल्या घाऱ्या डोळयांनी पासपोर्टची व आमची आपाद मस्तक टेहेळणी हेटाळणीच्या सुरात केली व व्हीसा ची पासपोर्टमध्ये नोंद केली तेव्हाच लंडनच्या ट्रिपचा पहीला हीरवा संकेत मिळाला. त्या व्हीसाच्या आधारावर इतर देशांचे व्हीसा लवकर मिळाले आणि इग्लंडच्या व्हीसाचा इतर देशावर अजुनही कीती प्रभाव आहे ते जाणवले. परंतु फ्रान्सच्या व्हीसा करीता जरा चीकाटीची गरज लागली. जुन ते आक्टोबर तिकडचा उन्हाळा उष्णतामान १२° ते १५° सें असते. इटलित तर २०° ते २५° असते. तेव्हा गरम कपडयाची विषेश व्यवस्था स्वीसझरलंड करीता व हॉलंडकरीता करायची होती. परकीय चलन माणशी ५२० डॉलर मिळायचे त्या करीता रूपयात पैसे स्थानीक बँक्त भरून बँक ऑफ अमेरीकाचे ५० व १०० डॉलरचे चेक घेतले त्यावर १०% टॅक्स भरला व जाण्याची तयारी झाली शुभेच्छा देण्याचे सगे सोयरे यांचे समारंभ झाले. ८५ वर्षाच्या आईच्या शुभेच्छा, आशीर्वाद घेताना मनात आनंद, उत्कंठा, कुतुहल चींता अशा संमिश्र भावना होत्या तो आईनी दीलेला हार पेटीत पुर्ण प्रवासात जपुन ठेवला होता कारण तिच्या शुभेच्छा आणि प्रेमळ आशिर्वाद त्या सोबत होते.

विमान तळावर सर्व सामान सीक्युरीटी काऊंटरवर तपासुन त्याला सील लागले. विमानतळ टॅक्स भरला व एअर इंडीयाचे तीकीट घेऊन सामान नोंदले व ते त्यांनी स्वीकारले. नंतर पासपोर्ट व्हीसा तपासणी, कस्टम तपासणी आणि मेटल डीटेक्टरची आपद मस्तक टेहेळणी झाली त्यातही काही आक्षेपार्ह मिळले नाही त्यामुळे पुरेसे कडवट तोंड करून त्या बाईंनी प्रवासा बद्दल शुभेच्छा दिल्या. हा तपासणीचा कार्यक्रम प्रत्येक देशाच्या सरहद्दीवर असतोच त्यातही फ्रान्स, जर्मनी स्वीसझरलंड हॉलंड हयांच्या सरहदीवरची तपासणी म्हणजे तो स्वागत सोहळा किंवा नीरोप सोहळा असतो. इटलीच्या सरहदीवरची तपासणी मात्र प्रत्येकाचा पासपोर्ट मधील फोटो व त्याचा चेहरा तपासणी व मोजणी हा एखाद्या तुरूंगातील कैद्यांच्या गीनतीचाच समारंभ वाटायचा.

लहानपणी आगगाडीच्या प्रवासात खीडकी जवळच्या सीट बद्दल आमच्या भावात वाद व्हायचा. तेव्हा प्रत्येकाला ५ -५ मीनीटे द्यायची. त्या पाच मीनीटात त्यानी खीडकी बाहेर धावणारी झाड मोजायची. ज्याच्या पाच मीनीटात जास्त झाड झाली त्याला खीडकी जवळची सीट मीळायची कींवा एक एक तासाकरीता त्या खीडकी जवळ सीटचे वाटप व्हायचे. त्या एक तासात खीडकी बाहेरच्या पळत्या झाडांचे अभिवादन आम्ही स्वीकारीत असु त्याच उर्मीतुन आताही विमान तीकीट घेताना मुद्दाम खिडकी जवळची जागा मागुन घेतली त्या बाईचेही नाव मिस मेरी होते. त्यांनी हलकेसे स्मित करून खिडकी जवळची सीट दिली. त्या बाईना विमानाच्या खीडकीतुन दिसणाऱ्या दृष्याची कल्पना असणार हव्याची आम्ही चांदण्यांना आणखी ७-८ मैल जवळुन पाहु ह्या आनंदात होतो. तीकीटाच्या लाईनीमध्ये आमच्या त्या स्मीत रेषे मागे या खिडकीतून दिसणाऱ्या दृष्यांची कल्पना दडलेली असवी. मागे एक ढगळ प्यँट कोट घातलेले जबलपुरचे वयस्क जोडपे उभे होते. ते आपल्या खानदानी हींदीतुन आपल्या सोबतीणीला सांगत होते. मला तर विमानातली खीडकी जवळचीच जागा लागेल. कारण मी वारंवार तंबाखु खात असतो आणि खीडकी तर पीकदाणी म्हणुन लागेलच.

विमानात चढण्यापूर्वी पुन्हा पासपोर्ट व बोर्डींग पास वगैरेची तपासणी झाली. विमान पॅसेजलाच टेकुन होते. पॅसेजमधुन विमानात प्रवेश केला विमानाच्या दारात हवाई सुंदरी नावाप्रमाणेच आपल्या ओसंडत्या सौंदर्याचे प्रदर्शन करीत दोन्ही हात जोडुन स्वागता करीता उभी. तेव्हा विमान सेवा जशी आतिथ्यशील आहे तशीच रसीकही आहे हे

जाणवले. आपले स्वागत इतकं प्रदर्शनीच आहे. हे पाहुन उगीचच स्वमःचा अहंभाव सुखावला.

विमानात खीडकी जवळची जागा मीळाली. सीटवर एक गरम ब्लॅकेट बाजुला छोटा दीवा समोर नाश्ता जेवण्याकरीता सरकते टेबल आणि सीटच्या हातावर निरनिराळ्या रेडीयो चॅनेलची बटनं व हेडफोन होते. आपल्याला पाहीजे तो प्रोग्राम ऐकायचा जवळच संकट कालीन कीट आणि कमरेचे पट्टे "फासन योर बेल्ट प्लीज" मंजुळ आवाजातली पहीली सलामी झाली. कमरेचे पट्टे लावले आणि खीडकीतुन कुतुहल डोकावु लागलं, विमान हळु हळु यार्ड मधुन धाव पट्टीकडे आलं आणि धावपट्टी वरून खरच वेगाने धावु लागले. आपल्या एस.टी.चे घोंगावणे, वाहनांचे घ्वनी, प्रदुषणावर मात करणारे कर्कश्य आवाज, त्याला हॉर्नची केकाटणाऱ्या आवाजाची जुगळबंदी आणि ह्या सर्व वातावरणात धीट गंभीर अलिप्त पणाने गोगल गाईच्या वेगानी धावणारी गाडी हयाची आपल्याला झालेली सवय त्यामुळे विमान इतक्या भरधाव वेगाने आवाज वीरटीत शांततेला भेदुन धाव पट्टीवरून धावते आहे हे खीडकीतुन दिसत होते तरी मनाला पटेन अखेर विमानानी आपली समोरची चाकं उचलली आणि कासवा प्रमाणे पोटात घेतली. विमानानी जमीन सोडली व ते हवेत झेपावले. आकाश पाळण्यात बसल्यावर पाळणा वर जाताना पोटात हलचल होते. तशीच कदाचीत जमीन सोडुन हवेत तरंगणाच्या क्रीयेला पोटातुन दीलेली ती दाद असावी. आता पर्यत निरनिराळ्या प्रकल्पांचे काम सुरू करण्यापुर्वी प्रथम तीथल्या भुमीचे पुजन केले. तसेच सत्यनारायणाच्या पुजे वेळी कींवा इतर कोणत्याही पुजेपूर्वी भुमीपूजा केली. त्या भुमीला सोडुन आम्ही भुमीपुत्र हवेत तरंगत होतो. आता पायाखालची जमीन सरकण्याचा प्रश्न नव्हता तर पुन्हा जमीनीवर पाय रोवून कधी उभे राहु ही उत्कंठा होती. साधारण १५ ते २०,००० फुट उंची वरून विमान मार्गी लागले. प्रथम संकटकाळीन स्थितीत विमान जमीनीवर उतरले तर काय काय करायचे तसेच पाण्यात उतरले तर काय करायचे, विमानाच्या आपत्कालीन खीडक्या कुठे कुठे आहेत, त्या कशा उघडायच्या ह्या बद्दल तपशीलवार सुचना देण्यात आल्या. चहा, कॉफी झाली. मुंबईच्या सहार विमान तळावरून रात्री १-३० वाजता विमान निघाले होते.

आता रात्री ३ वाजता विमानात जेवणाचा घाट घातला होता. आपल्या भुमीपासुन दुर ४०,००० फुट उंचीजरील अधांतरी अवस्थेत घ्वनी पेक्षाही वेगवान स्थीतीत. निदान

जेवण तरी सावकाश उरकावे हा पोक्त वीचार करून जेवण घेतले. नंतर विमानाच्या प्रमुख पायलटनी आपली ओळख करून दीली. आता आपल्या विमानाचा वेग ताशी ९०० की.मी. असुन विमान ४०,००० फुट उंचीवरुन उडत आहे. तरीपण आपण आपल्या भुमीशी संपर्कसाधुन आहोत. वगैरे माहीती सांगीतली. तसेच विमानाचा लंडन जाण्याचा हवेतला मार्ग, मार्गात येणारे देश तेथील आजचे हवामान, उष्णतामान व लंडनला पोहोचण्याची वेळ सांगीतली. त्या वेळी मुंबईत पहाटेचे चार वाजले होते. मार्गातल्या सर्व देशात शांतता आहे. हवामानात प्रेमाचा नसला तरी साधा ओलावा (आद्रता) आहे. विमान संथ लयीत आपल्या लक्षाकडे विजुगीषु भुमीकेतुन वाटचाल करीत आहे. हे ऐकुन सर्वांनी पायलटवर आपला मनोमनी भार टाकुन निर्धास्त झाले व थोडयाच वेळत निद्रिस्तही झाले.

सकाळी विमानातच चहा नाश्ता झाला त्यावेळी मुंबईत सकाळचे ११ वाजलेले असणार. लंडनच्या वेळेनुसार सकाळी ६ चे सुमारास लंडन दिसु लागले. लांब समुद्र किनारा, एक किंवा दोन मजली बसकी घरे. लंहान प्लाट, रेखीव लेआऊट घरांना पांढरा कींवा फीक्का क्रीम रंग हे सर्व लंडनचे वरून दिसणारे दर्शन ब्रीटीशांच्या शिस्तबध्द मनोरचनेला साजेसच दिसत होत. सकाळच्या साडेसहा वाजता लंडनच्या प्रसिध्द हीतरो विमान तळावर विमान उतरल. हा हीतरो विमानतळ जगातल्या अतिशय बीझी विमान तळपैकी एक आहे. दर पाच मीनीटाला येथे एक विमान उतरते कींवा उडते. विमानतळावर पासपोर्ट, व्हीसा तपासणी झाली. ती तपासणी करणाऱ्या चार काऊंटर पैकी आम्ही गेलो त्या तीन नंबरच्या काऊंटरवर तपासणी करायला आणि लंडनमध्ये स्वागत करायला पुन्हा मेरी बाईच होती. मुंबईला व्हीसा देणारी बाई मेरी, सहार विमानतळावर विमानाचे तीकीट, बोर्डीग पास देणारी बाई मेरी आणि आता व्हीक्टोरीया, एलीझाबेथ व मेरी राण्यांच्या ह्या राजधानीत स्वागत करायला पुन्हा मेरीच भारतावर १५० वर्षे राज्य करणाऱ्या ह्या देशात आपलं इतकंउबदार स्वागत होताना पाहुन मन हुरळुन गेल. जमीनीवर पाय लागण्याचा आनंद आणि त्या सोबतच येथे होत असलेलं अस उबदार स्वागत त्यामुळे आता आम्हीच हवेत तरंगत होतो.

विमान तळबाहेर पांढरी स्वच्छ बस उभी होती. चालक, वाहक एकच. त्याचेही पांढरे स्वच्छ केस, मीशा, अंगात गरम कोट पॅन्ट. त्यांनी बसच्या पोटात घुसुन सर्वांचे सामान स्वतःच नीट लावुन घेतले.

ट्राफल गार स्केअर (Square) हा लंडन मधील मुख्य रस्त्यावरचा प्रसीध्द चौक हयाच चौकात प्रसिध्द ब्रीटीश सेनानी जनरल स्मीथ हयांचे स्मारक आहे फ्रेंच सम्राट नेपोलीयन हयाचा वाटर्लुच्या लढाईत पराभव करणारा हाच प्रसिध्द सेनापती. नेपोलीयन सम्राटाची इंग्लडवर केवढी दहशत होती हे इतीहास जाणतोच जनरल स्मीथचे उपकार तसेच त्याच्या कर्तृत्वाची जाण आणि त्याच्या बद्दलचा अभिमान हा त्याच्या अशा स्मारक करण्यात जाणवतो. एक मध्ये स्तंभ आणि त्यांच्या चारी बाजुला चार दीशाकडे तोंड करून बसलेले सीह असे हे काळया दगडाचे शिल्प आहे. अगदी स्वच्छ ठेवलेले.

बीगबेन टॉवर आणि त्या वरचे जग प्रसिध्द बीगबेन वॉल क्लॉक ही दोन्हीही चांगल्या स्थीतीत राखलेली आहेत. ह्या घडयाळच्या ठोक्यावर लंडन शहराचे स्पंदन कीती तरी वर्ष ताल धरून होत. लंडन शहराचा सीम्बाल म्हणून हे टॉवर प्रसीध्द होते.

पीकॅडेली सर्कल हा लंडन शहराचा व्यापार धंद्याचा भाग. तसेच ब्रीटीश सरकारची प्रमुख कार्यालये ह्याच भागात आहेत. इग्लंडच्या आर्थीक आघाडया तसेच शिस्तीच्या नाडया येथेच संभाळल्या जातात वेळ प्रसंगी त्या आवळल्याही जातात.

हाईड पार्क हा लंडनमधील वक्ते घडवीणारा प्रसिध्द पार्क आठ अकराच्या विर्स्तीर्ण हीरवळीवर व्यापला आहे. ह्या पार्कच्या अका भागाला स्पीकर्स कार्नर असे नाव आहे. एक छोटेसे स्टेज आणि त्या समोर श्रोत्यासाठी कॉक्रीटचा ओटा केलेला आहे ह्या स्टेजवर कोणीही यावे आणि आपल्या आवडीच्या विषयावर भाषण द्यावे वकत्यानी आपल्या कुवती प्रमाणे श्रोते आपल्या जागेवर खिळवुन ठेवावे. येथे श्रोते वकत्याच टींगल, टवाळी करतात त्याला तोंड देत देत वक्ता घडवीला जातो. लोकशाहीत वकत्याची आणि त्यातही प्रभावी वकत्याची किती आवश्यकता असते हे आपण पहातोच आय कॅन क्री अर द टेम्पो अस प्रभावीपणे थोडया वेळात करणारा वक्ता हा लोकशाहीच्या प्राण आहे जगात असे प्रभावी वक्ते घडवीणारे माध्यम बहुधा हे एकच असावे.

लंडन शहराच्या मधुन थेम्स नदी वाहते. ह्या नदीवर नवे व जुने लंडन जोडणारा टॉवर ब्रीज हा लंडनच्या प्रसिध्द कील्ल्या जवळच आहे. जुन्या रोप ब्रीजचा प्रकार चांगल्या स्थीतीत वापरात असलेला हा पुल लंडन शहराचा सिम्बाल मान चिन्ह आहे. T.V. वर लंडन शहराचे मान चिन्ह म्हणुन आपण अनेक वेळा बीगबेन टॉवर कींवा हा टॉवर ब्रीज

पाहतोच. ह्या नंतर आणखी ४-५ नवीन आधुनीक तंत्र वापरून थेम्स नदीवर पुल झालेत परंतु ह्या पुलाची (Tower Bridge) लंडन शहराशी खुणगाठ पक्की आहे.

ह्या पुलाजवळ नदी काठी लंडनचा प्रसिध्द कील्ला आहे. १६-१७ व्या शतकात किल्ले बांधुन त्या वरून राज्य करण्याची पध्दत तिकडेही होतीच. प्रशस्त आवार त्या भोवती खंदक नंतर मजबुत तट आणि आत राजवाडा महाल अशी पध्दतशीर बांधणी आहे. आता नवीन सुधारणात खंदक बुजवुन त्या ठीकाणी लॉन (मखमली हीरवळ) केला आहे. ह्या सर्व आत वास्तु संरक्षण खात्याकडे सोपवील्या आहेत.

ह्या थेम्स नदीकाठी एक प्रशस्त राजवाडा आहे. तेथे इग्लंडचे इतिहास प्रसिध्द पार्लमेंट भरत असे. लोकशाही चे मुळ व पायंडयावर काटेकोर पणे चालणारं हे शाही व्यासपीठ. ब्रीटीश सांम्राज्य पूर्वी सर्व खंडात विखुरलेलं की ज्यावर कधि सुर्य मावळत नसे अशी ज्याची ख्याती होती त्या संपुर्ण साम्राज्याचे राजकीय शिर्षस्थान हे पार्लमेंट होते. ह्या राजवाडया जवळच आता नवीन विशाल भवन बांधले आहे त्यांच्या तळ मजल्यावर हाऊस ऑफ कॉमन्स व वरिष्ठ सभागृह हाऊस ऑफ लार्डस अर्थातच वरच्या मजल्यावर भरते.

इंग्लडच्या एका सामाजिक प्रश्नामुळे सगळे समाज शास्त्रज्ञ, समाज हितचींतक, विचारी डॉक्टर्स हयांचे विश्व घुसळुन निघाले आहे. वर्तमान पत्रातही त्याच चर्चा जोरात चालु होती. इंग्लडमध्ये मुला मुलीचे सबंधाना १६ वषपिक्षा कमी वयात कायद्यानी मनाई आहे. १९७० च्या रीपोर्ट वरून ह्याचे उल्लंघनाची उदाहरण २% होती. परंतु १९८९ च्या रीपोर्ट वरून ही मर्यादा ५०% वर गेली आहे. ह्या ११-१२ वीत शीकणाऱ्या अल्लड मुलींवर वयाच्या १५-१६ व्या वर्षाच्या वयात ह्या कायदानुसार गुन्हे तरी कीती दाखल करायचे. हा सामाजीक प्रश्न समाज धुरिणासमोर उभा आहे. ह्या प्रश्नाची सोडवणुक म्हणुन हॉलंडनी ही वयोमर्यादाच १२ वर्ष केली आहे. आमच्या बरोबर लंडन शहरा करीता गाईड म्हणून मीस क्लारा होत्या. ही ३७ वर्षाची समाजशास्त्र, इतिहास घेऊन B.A. केलेली विदुशी. तिच्याशी केलेल्या चर्चेत ह्या प्रश्नाचे स्वरूप आणखीनच गडद झाले. तिला १० वीत असतानाच वयाच्या १५ व्या वर्षी मुलगी झाली. ह्या मुलीमुळे तिचा पुढे विवाह होवु शकला नाही आणि आता ३७ व्या वर्षी ती मीस आहे. इतर मुली हा व्यवहार करतात. आणि आपण नाही केला तर आपला बॉय फ्रेंड दुर

होण्याची भिती त्या वयात होती. त्यावयात बॉय फ्रेंड नसणं ह्या सारखं दुसरं दुःख नव्हत. तसेच आपल्या पालकांनाही आपल्या मुलीला बॉय फ्रेंड नाही ही एक चीतेची गोष्ट असते. म्हणून हा व्यवहार त्या वयात करावा लागतो ही तिचे प्रतिपादन ही ह्या सामाजीक प्रश्नच स्वरूप अधिकच गहीरे करते.

वेस्ट मिनीस्टर अॅबे हे लंडनचे जुने प्रसिध्द ठीकाण. हे नावाप्रमाणेच वेस्ट राजकारण्यांचे चिर विश्रांतीचे ठीकाण आहे. येथे इग्लंडचे ख्यातनाम पुढारी, पंत प्रधान वगैरे चिर निद्रा घेत आहेत. ह्याला अपवाद फक्त एका पंत प्रधानाचा सर विन्स्टन चर्चिल हा इंग्लडचा प्रसिध्द पंत प्रधान ह्याच्या करिता ह्या वेस्ट मीनीस्टर अॅबेमध्ये तो जीवंत असतानाच जागा राखुन ठेवली होती. परंतु त्याच्या इच्छेनुसार त्याला दुसरीकडे पुरण्यात आले. सर विन्स्टन चर्चिल हा इग्लंडचा पंतप्रधान, ज्यानी १९३९ ते १९४५ ह्या काळात घडलेल्या २ ऱ्या जगडव्याळ युध्दात इग्लंडची पडती बाजु सांभाळली आणि त्याला विजय मिळवुन दीला त्याचा जवळच पुतळा उभारलेला आहे. त्याच्या जवळच एक लहान चर्च आहे जेथे त्याचा विवाह झाला होता. ह्या सर्व गोष्टी चर्चील ह्याच्या बद्दलचा वाटणारा गर्व, अभीमान त्यानी इग्लंडला विनाशातुन वाचविले त्या बद्दलची उपकाराची जपणुक म्हणून केलेल्या दिसतात. हे चर्चिल भारताला स्वातंत्र देण्याच्या फार विरोधात होते. भारतीय लोक राज्य करण्यास सक्षम नाहीत आणि त्यांना स्वातंत्र दिल्यास काही वर्षातच ते आपली नालायकी सिध्द करतील ह्या ठाम विचारातुन त्यांची स्वातंत्र न देण्यामागील भुमीका होती. लंडन शहराच्या व्यापाच्या तुलनेत येथे पुतळे फार कमी आहेत. ह्या लोकशाही देशात पुतळे उभारण्या लायक लोकप्रीय पुढारी कमी असावे हे शक्य वाटत नाही कदाचित ह्या सर्व पुढाऱ्यांना ह्या अबेमध्यें स्थान मिळल्यामुळे त्यांच्या पुतळयांची वेगळी गरज वाटत नसावी का?

बकींगहॅम पॅलेस हा इग्लंडच्या राणीचा राजवाडा. सार्वभौम ब्रीटीश साम्राज्याच्या राणीला शोभेल असा हा विस्तीर्ण राजवाडा आहे त्याचा परिसरही तेव्हढाच विशाल. त्याच्या समोर संगमवरी दगडांचे पांढरे स्वच्छ स्तंभ आणि त्यावर पितळीचे भव्य गरूड स्मारक आहे. समोरच्या पटांगणात रोज सकाळी ११ ते १२ पर्यंत रेड गार्डचे पथ संचालन मोठया दीमाखात आपल्या जुन्या सर्व रूढी, प्रथा संभाळत बॅड वगैरेच्या ताला सुरात होते. ते पहाण्याकरीता टुरिस्ट तसेच स्थानीक लोकांची चांगलीच गर्दी असते. इग्लंडच्या घटनेप्रमाणे राजा हा सरकारचा प्रमुख असतो. येथे नामधारी राजेशाही अजुन टिकून

आहे आणी इंग्लीश लोकांची राजा बद्दलची श्रध्दा, भक्ती प्रसिध्दच आहे. आमच्या शेजारी कॉलेज विद्यार्थ्याचा एक गट उभा होता. ५ विद्यार्थीनी आणि दोन विद्यार्थी आपल्याकडे सीनेमान असतात. तशा पोझमध्ये दोन विद्यार्थी व विद्यार्थीनी उभे आणि सर्व जण हास्य विनोदात गर्कहोते. असे मुक्त जिवन पाहुन गंमत वाटली.

बकींगहॅम पॅलेस ह्या राजवाडया जवळच डॉऊनींग स्ट्रीट आहे. ह्या रस्त्यावर सर्व कॅबीनेट दर्जाचे मंत्र्यांचे बंगले आहेत. त्यातील १० क्रमाकांचा बंगला हा तेथील पंतप्रधानांचा बंगला आणि ११ क्रमाकांचा हा वित्तमंत्र्याचा. सरकारी शिस्त, राजकारणाची सुत्र १० क्रमांकाच्या बंगल्यातुन तर राष्ट्राच्या आर्थीक नाडया आवळण्याचे काम ११ क्रमांकाच्या बंगल्यातुन होते. एके काळी ह्या १० क्रमांकाच्या बंगल्यात एक स्त्री ह्या बलशाली देशाची पंतप्रधान म्हणून रहात होती. दोन स्त्रीया एक इग्लंडची राणी तर दुसरी पंतप्रधान. एक जन्मानी राज्य घराण्यात जन्म घेतल्यानी राणी झाली तर दुसरी आपल्या कर्तृत्वानी पंतप्रधान झाली. एकीला जन्मानी पॅलेस, राजवाडा मीळवा तर दुसरीला पंतप्रधानाच्या खुर्चीमुळे १० क्रमाकांचा बंगला मीळला. ह्या दोन स्त्रीयांच्या हा ि लाखो लोकांचे भवीतव्य सुरक्षित होते. हे दोन्ही बंगले १० आणि ११ क्रमाकांचे त्य. त्या खुर्चीशी निगडीत खुर्ची सोडली की बंगलाही सोडायचा सकाळी १२ वाजता पंतप्रधानकीचे पद सोडल्यावर लगेच पंतप्रधान मार्गरेट थॅचर बाईंनी बंगला दुपारी २ वाजता सोडला.. आपल्या दिल्लीला पंतप्रधानाचे बंगले हे त्यांच्या नंतर म्युझीयम बनवतात. दिल्लीच्या ह्या पार्श्वभुमीवरून ही इग्लंड मधील शिस्त फारच कौतुकास्पद वाटते.

लंडनचा ऑक्सफोर्ड स्ट्रीट प्रसिध्द आहे. त्याच रस्त्यावर युरोपभर प्रसिध्द असलेली डीपार्टमेंटल स्टोअर्स जसे 1) C and A (2) मार्कस् अंड स्पेन्सर (3) सेल फ्रीझेस वगैरे आहेत. तसेच मॅडम टु सॅडस् हा म्युझियमपण आहे. हयाच रस्त्यावर तेथील प्रसिध्द २० मजली हॉटेल मेट्रोपोल आहे. तेथील मुक्कामात समोरची एक्सटेन्शन ची काम दिसत होती. त्यावर (UTTIS) युटिस इलेव्हेटर्स ही पाटी पाहुन आपल्या ओळखीची एक कंपनी येथेही आहे हे पाहुन जीव सुखावला. ह्या हॉटेलचे वैशीष्ठ म्हणजे येथे पर्यटकाच्या प्रत्येक खोलीला इलोक्ट्रोनीक कुलुप होते कुलुपाची कील्ली कुलुपात घातली की कील्लीवरच छोटा हीरवा दीवा लागायचा व कुलुप उघडायचे. चुकीची कील्ली लावली तर कील्लीवरचा लाल दीवा लागायचा. पण कुलुप उघडले जात नसे.

पर्यटकाला जितके दिवस रहायचे तितक्या दिवसा करीता व त्या वेळेपर्यंतच ती कील्ली लागायची नंतर इलेक्ट्रोनीक यंत्रणा बदलायची व त्या कुलुपाला ती कील्ली लागत नसे. काऊंटरवरून दुसरी कील्ली मीळायची ही आधुनीक सुरक्षीत व्यवस्था ह्याच हॉटेलमध्ये होती. बाकी युरोपभरच्या इतर हॉटेलमध्ये अजुन आपली जुनीच लॉच कुलुपाची व्यवस्था चालु होती.

येथे लंडनला सुर्योदय सकाळी ५ च्या सुमारास होतो आणि सुर्यास्त रात्री ८-३० चे सुमारास होतो. त्यामुळे सकाळी ४-३० पासुन रात्री जवळ जवळ ९-३० पर्यंत दिवस असतो. रात्री ७-३० अथवा आठ वाजता (स्वच्छ दिवस असेल तेव्हा) उन्हात फीरणं एक अप्रुप आनंद देतो. लंडन शहर हे युरोपच्या इतर शहरापेक्षा फार महाग शहर आहे. साध्या पुरी भाजी टाईप दोन आयटमलाही ३ पौडं पडले. म्हणजे रूपयामध्ये ते जवळ जवळ १२० रूपये झाले.

लंडन ते डोव्हर हा साधारण १५० कीलोमीटरचा बसचा प्रवास २-२ १/२ तासांचा. लंडनच्या उपनगरातुन जाताना दुतर्फा. पांढरी अथवा क्रीम रंगाची बसकी घरे घरांना बालकनी, गॅलरी, छज्जे नाहीत. लहान मुल खेळांत ठोकळयांची चौकोनी घर बांधतात तशीच खीडक्यावर कॉक्रीट लीटल ऐवजी जुने आर्चेस आहेत. खीडक्यांना पांढरे अथवा निळसर काच आणि खीडकीत इग्लीश कथा कादंबऱ्यात वर्णन केलेली टीपीकल इंग्लीश पोषाख आणि वेश भुषेतील इंग्लीश गृहिणी फ्लॉवर पॉट सजवताना दिसतो तेव्हा इंग्लीशांच्या शिस्तप्रीय, टापटीप रहाणीची कल्पना मनाला उत्साहीत करते रस्ते साधारण ५० फुटांचे सर्व घरांना कम्पाऊंड आणि रस्त्यावर कुठेही वाहन पार्क केलेली नव्हती. मोकाट गुरे नाहीतच पण पाळलेले कुत्रे देखील रस्त्यावर दीसत नाहीत. विमानातुन हा भाग जीतका स्वच्छ आणि पदुषण वीरहीत असावा असे वाटले तसाच तो तेथील रस्त्यावरून फीरतानाही जाणवला.

डोव्हर हे इंग्लीश बेटावरचे बंदर तेथे पासपोर्ट, व्हीसा ह्यांची तपासणी झाली नंतर चॅनेल फेरीतुन फ्रान्स मधील कॅले करीता प्रवास ही २२ मैल लांबीची डोव्हर ते कॅले अशी इंग्लीश चॅनेल-युरोपला इंग्लीश बेटांना जोडणारी सर्वात जवळची कमी अंतराची चॅनेल. आहे. इंग्लडवर युरोपमधुन झालेल्या अनेक इतिहास काळीन स्वाऱ्यांची ही चॅनल साक्षीदार आहे. तसेच डच लोकांची इन्व्हीन्सीबल आरमाडा ह्या अजींक्य आरमारा तर्फे

केलेल्या इंग्लडवरील सागरी स्वारीचे वेळी हे चमकदार फेसाळ पाणी लाल झाले होते त्या दुःखीत क्षणाच्या स्मृती ह्या सागराच्या कुशीत आहेत. हीटलरनी १९४२-४३ साली कॅले वरून ह्या खाडीवरून ब्रीटीशावर आपल्या इग्लीशा बद्दलच्या राग, द्वेश मत्सर, शत्रुत्व हयांच्या समवेत डागलेले तोफांचे काही गोळे ह्या खळखळणाऱ्या चमकदार पाण्यात सामावलेले आहेत.

हीचॅनेल व हे २२ मैलांचे अंतर न थांबता (NON-STOP) पोहोत जाण्याचे विक्रम अनेकांनी केले आहेत. आपले मीहीरसेन सारख्या काही भारतीयांनीही केले आहेत.

फेरी चॅनेलनी हा डोव्हर ते कॅले हा प्रवास ७५ मीनीटात होतो. ही फेरी चॅनेल बोट चांगलीच प्रशस्त आमची दुमजली बस आतील प्रवाशा सहीत तराफयावरून बोटीच्या तळघरात नेली. तेथे आणखी ८-१० अशाच बसेस होत्या तसेच जवळ जवळ ४०-४५ छोटया कार पार्क केलेल्या होत्या. एवढे विस्तीर्ण तळघर होते. बोट २ मजली खाली तळघर नंतर १ ला मजला त्यात एक मोठे डीपार्टमेंटल स्टोअर एक बॅक, हॉटेल आणि प्रवाशांना बसण्याकरीत खुर्च्या, येथे कर .अरहीत (duty free) अशी मुक्त बाजारपेठ त्यात डॉलरचे फ्रॉक (फ्रेंच चलन) करण्याची सोय होती. इतर ठिकाणी हा चलन बदलाचा दर त्या दिवशी डॉलरला ६-३० फ्रॅक असताना येथे बोटीवर तो दर डॉलरला ६-४५ फ्रॅंक असा होता.

कॅले येथे फ्रान्सच्या भुमीवर पहीले पाऊल टाकले. पासपोर्ट आणि व्हीसाच तपासणी झाली. ह्या तपासणीत दोष शोधण्याचा दृष्टी कोन नव्हता. तर फ्रान्स मध्ये उबदार स्वागत आणि सदिच्छा प्रगट करण्याचा होता. तीथल्या स्वागत अधीकाऱ्यानी प्रत्येकाशी हस्तांदोलन करून स्वागत केले. फ्रान्स सारखा प्रगत देश, आपल्या भुषणावह इतिहासाची जपणुक करणारा. प्रसिध्द फ्रेंच लेखक लेखीकांचा देश तिथले अधिकारी आपल्या रूक्ष कर्तव्यात हा उबदार स्वागताचा ठेवा, बाळगतात तेव्हा मन भारावुन जाते. कॅले ते पॅरीस हा ३०१ कीलोमीटरचा तसचा प्रवास साधारण पाच तासात झाला. येथे युरोपमध्ये आता वाहतुकीचे नियम बदलले व आमच दुमजली बस आता रस्त्याच्या उजवीकडुन धावु लागली तसेच घडयाळ पण एक तास पुढे केले. कारण

इग्लंड भारताच्या ५ १/२ तास मागे तर युरोप ४ १/२ तास मागे असतो. पॅरीसला मेनरोडवर आपल्या भारतीयाचे हॉटेल कीस्मत आहे. तेथे भारतीय पध्दतीचे जेवण हॉटेल मालक श्री. सुरजीतसींग हयांनी हींदी भाषेत खानदानी रूबाबात केले. इतके अद्यायावत हॉटेल पॅरीसच्या मेन रोडवर ते गेल्या दहा वर्षापासुन यशस्वीपणे चालवतात त्या बद्दल त्यांचे अभिनंदन केले बोलण्याच्या ओघात त्यांनी सांगीतले की फ्रेंन्चाचा ब्रीटीशा बद्दलचा १६ व्या शतका पासुनचा द्वेश अजुनही नवीन पीढीत सुध्दा झीरपत आला आहे. परंतु आशीयाई देशाबद्दल आणि त्यातही भारतीया बद्दल सदभावना फार आहेत. कदाचीत आपणही ब्रिटीशांचे अन्याय १५० वर्षे सोसले म्हणून शत्रुचा शत्रु तो आपला मित्र ह्या न्यायाने ही सदभावना असावी. इग्लीश खाडीच्या समुद्राखालुन डोव्हर ते कॅले हा बोदा करून रेल्वे लाईन टाकायचा प्रस्तावही ह्या द्वेशामुळेच जवळ जवळ ५० वर्षे रेंगाळला. आता ते काम संपत आले आहे. समुद्राच्या जवळ जवळ १५० मीटर खालुन बोगदा करून रेल्वे लाईन टाकणे चालु आहे. पुढील २-३ वर्षांनी ही प्रवासी गाडी सर्व खाडी तिच्या पाण्यासह डोक्यावर घेऊन ४५ मीनीटात डोव्हर ते कॅले हा प्रवास करणार आहे आणि ह्या दोन देशांची मनं अधीक जवळ आणणार आहे. स्वातंत्रवीर सावरकर ह्यांनी बोटीतुन ती इतिहास प्रसिध्द उडी मारून फ्रेंच कीनारा समुद्र पोहुन गाठला. ते तीन तीनदा त्या फ्रेंच पोलीसाला सांगत होते की मी आता तुमचा कैदीआहे मला तुमच्या फ्रेन्च्यांच्या ताब्यात घे. परंतु त्या फ्रेंच पोलीसाचा ब्रीटीशाबद्दलचा द्वेश जर तेव्हा जागृत असता तर त्यानी सावरकरांना तेव्हा ब्रीटीशांच्या ताब्यात दील नसतं आणि आपल्या स्वातंत्र लढयाचा सगळा इतिहासच बदलला असता.

पॅरिस हे नाईट क्लब करीता प्रसिध्द शहर आहे. रात्री ९ ते १ पॅरीस शहराचा फेरफटका मारला तर ह्या स्वप्नील नगरीची थोडीतरी कल्पना येते. मोठमोठया इमारतीवर १०-१२ फुट उंचीच्या रंगीत टयुबच्या जाहीराती असतात. लाइटींग तर इतक्या विवीध प्रकारचं आणि विवीध रंगातल खुपच कल्पकतेनी केलेलं असतं. नाईट क्लबचे समोरचे देखावे फारच बहारदार असतात. त्यातही “मौलीन रोग”(MAULIN ROUGE) सारख्या जग प्रसिध्द नाईट क्लबची रोषणाई आणि बाहेरचे देखावे तर अवर्णनीय होते युरोपचे रसीक टुरिस्ट तसेच स्थानीक लोकांचे हे खास आकर्षण असते. तसेच एफेल टावरचे रात्रीचे दर्शन प्रेक्षणीस असते.

एफेल टॉवर हा जगातील एक अद्वितीय मनोरा आहे. एका जर्मन इंजीनीअरच्या बुध्दी चातुर्याचा नमुना पॅरिस शहर जसे नाईट क्लब करीता प्रसिध्द आहे. तसेच एफेल

टॉव्- आणि नेपालीयन गेट हे त्याचे मान चिन्ह (Symbol) आहे. सन १८८९ मध्ये हा ३०२ मीटर उंच मनोरा बांधला त्याला ३ स्टेजेस आहेत. १ली (स्टेज) लॉन्डीग ५४ मीटर वर दुसरी ७० मीटरवर आणि तीसरी जमीनी पासुन ९४ मीटर उंचीवर आहे. १ल्या आणि दुसऱ्या स्टेजवरून पॅरीसचे वीहंगम दृष्य पहाता येते. १ ल्या दुसऱ्या स्टेज वर लीफ्टनी जाता येते. माणशी भाडे १४ व १६ फ्रॅन्क्स् असते. हा टावर बांधताना त्याला वीस लक्ष रिव्हेटस् लागले. दर आठ वर्षांनी त्याला पेन्टीग करतात तेव्हा त्या पेन्टीग करीता ४० टन पेन्ट लागतो.

पॅरीस शहरात जुने राजवाडे अजुनही फार चांगल्या स्थीतीत राखलेले आहेत. राखी रंगाच्या ह्या राजवाडयाकडे पाहुन हे ६-७ शे वर्षापूर्वीचे जुने राजवाडे आहेत हे सांगुनही खरे वाटत नाही इतके ते चांगल्या स्थीतीत आहेत. जर्मनीच्या हीटलरनी जेव्हा फ्रान्सवर स्वारी केली. १९४० मध्ये तेव्हा ह्या इतिहास काळीन वास्तु राखल्या जाव्या इतिहासाचा ठेवा चांगल्या तऱ्हेनी जतन केलेला सुरक्षीत रहावा ह्या भुमीकेतुन त्या वेळच्या फ्रान्सच्या सरकारनी हे शहर न लढवताच जर्मनीच्या ताब्यात दीलं होत. येथे १२ व्या शतकातील पहील्या लुईचा राजवाडा तसेच त्या नंतरच्या शतकातीलही बरेच राजवाडे आहेत. हे सर्व चांगल्या स्थीतीत राखले आहेत. एका राजवाडयात पॅरिसचे प्रसिध्द म्युझियम आहे. इतर राजवाडयात पोलीस खात्याचे व इतर सरकारी कार्यालये आहत. पॅरीस शहरामधुन सीन नदी वहाते. ही नदी दोन्ही कडुन पुर्ण बांधुन काढली आहे तिच्या दोन्ही काठावर अनेक कील्ले व राजवाडे आहेत. नदीतुन बोटीनी सहल करताना ह्या सर्व कील्यांची व राजवाडयांची फ्रेंच व इंग्लीश भाषेत माहीती सांगतात. त्या मधुन प्रत्येक कील्ला त्याचे वैशीष्ठ व त्याकरीता झालेल्या लढाया हयांचे सवीस्तर शद्व दृष्य डोळ्यासमोर उभे करतात. शेवटी फ्रेन्चांनी अमेरिकेला स्वातंत्र देवतेचा प्रसिध्द पुतळा दिला त्याची १०-१२ फुट उंचीची हुबेहुब प्रतिकृती उभारली आहे ती अमेरीकेची स्वातंत्र देवतेची प्रतिकृती आणि त्याच्या पार्श्वभुमीवर एका जर्मन इंजीनीअरचा कला अविष्कार असलेला फ्रान्सच्या लोकशाही स्वातंत्राच्या अस्मीतेचे प्रतिक एफेल टॉवर दिसते ते दृष्य पाहुन मन फार उचंवळुन येते. व ते दृष्य चिरकाल स्मरणात रहाते.

नात्रदम चर्च हे युरोपातील पहीले गायिक चर्च १३ व्या शतकात बांधलेले विस्तिर्ण चर्च आहे. आतल्या मोठमोठया उंच पीलर्सच्या आधारावर उभे असलेले हे संपुर्ण दगडी शिल्प खुपच प्रशस्त आणि अगदी स्वच्छ ठेवलेले असते. इथेच नेपोलीयन

बादशहाचा विवाह झाला होता. फ्रान्सच्या इतिहासातील सम्राट नेपोलीयन हा फ्रान्सचा मानबींदु त्याच्या सबंधित सर्व खाणा खुणा अभीमानाने जाणीव पूर्वक जतन केलेल्या आहेत. जवळच राजवाडा आहे. त्याच्या समोरच्या चौकात एका सुमारे ३० मीटर उंचीच्या स्तंभावर एक पुतळ बसवीला आहे. ही त्या काळातील इंजीनीअरींग ची आश्चर्य कारक प्रचिती आहे इजिप्तच्या मनोऱ्याची पीरॅमडिची प्रतिकृती म्हणुन काचेचे तीन पीरॅमीडस येथे आहेत. मधला पीरॅमीड ८ मीटर उंचीचा असुन त्याच्या दोन्ही बाजुला एक एक पीरॅमीड २ मीटर उंचीचा आहे.

युरोपात १८ व्या शतकात दोन क्रानत्या झाल्या. एक धर्म क्रांती व दुसरी राज्य क्रांती दोन्हींचे पडसाद पुढे जग भर उमटले. मार्टीन ल्युथर ह्यांनी पोपशाही विरूध्द दंड थोपटंले आणि प्रोटेस्टर पंथाचा उदय झाला आज दक्षीण युरोप मध्ये इटाली, फ्रान्स मध्ये ९५ टक्के लोक कॅथोलीक आहेत तर उत्तर युरोपमध्ये जर्मनी, हॉलंड येथे ९५ टक्के प्रोटेस्टंट आहेत. हेच लोण जगभर पसरले आहे. दुसरी राज्य क्रांती १७८९ साली फ्रान्स मध्ये झाली, राजेशाही विरूध्द लोकशाहीची राजाच्या जुलमी राजवटी विरूध्द लोकांचा इतका राग उफळुन आला होता की ह्या क्रांतीच्या वेळी राजाचे शीर भाल्याच्या टोकावर लावुन ते तटाच्या मुख्य दरवाजावर आठ दिवस लटकत होते. ते ठीकाण पहाताना मनात विचारांचे काहुर उठते. ह्या राज्य क्रांतीचा झंझावात पुढे युरोपभर आणि जगभर पसरला ते क्रांतीचे हे ठीकाण पहाताना शद्ब विशद्ब होतात. रंजले गांजलेले सामान्य माणसही अन्यायाच्या, जुलुमाच्या विरूध्द भारावलेल्या अवस्थेत राजेशाहीची अभेघ तटबंदीही धुळीस मिळवतात. लोकशाहीतील दोष आणि श्रुटी पाहुन काही विचारवंत आजही फ्रान्स मधील ही क्रांती फ्रान्सला भुषण आहे की दुषण ह्या संभ्रमांत आहेत.

पॅरीस शहरात मधे एक विस्तिर्ण चौक आहे. हयाची तुलना कदाचीत चिन मधल्या रेड स्क्वेअरशीच करता येईल. ह्या चौकाच्या एका बाजुला तेथील लोकसभा भवन व इतर सरकारी कार्यालये आहेत. ह्याच्या जवळच शहराच्या मध्य भागात एका लहान राजवाडयात फ्रान्सचे राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान आहे. ४०-५० फुटांचे मोकळेआवार त्या भोवती ८ फुट उंचीची कंपाऊंडची भींत व समोर १२ फुट उंचीचे लोखंडी फाटक त्यावर दोन पोलीस पहारेकरी इतक्या साध्या वातावरणात अध्यक्ष राहतात. राज्य कर्त्यांनी लोकामध्येंच रहावे त्यांनी साधे पणानी रहावे ही तेथील राज्यक्रांतीतुन

निपजलेली विचारधारा, तिचे पालन येथे कटाक्षानी करताना दिसते तसेच त्याचा परिणाम अमेरिकेतील व्हाईट हाऊस पर्यंत झालेला दिसतो.

शहराच्या मुख्य रस्त्यावर नोपोलीयन गेट आहे मागच्या युध्दात १९४१ -४२ साली जर्मनीनी फ्रान्स पादाक्रांत केल्यावर प्रथम ह्या गेटची पुर्ण नासधुस केली कारण नेपोलियन बादशहा हा फ्रान्सचा हिरो मान बिंदु. तेव्हा जेत्याच्या भुमीकेतुन त्यांनी ह्या मान बींदुचा विध्वंस केला. १९४४ मध्ये फ्रान्सनी पुनः विजय प्राप्त केल्यावर प्रथम कोणते काम केले असेल तर ते म्हणजे नेपोलीयन गेटची विशाल आणि सुंदर, देखणी बांधणी केली. आपल्या मानबींदुची पुनस्थापना केली आणि आपल्यावरील आक्रमणाच्या खुणा पुसल्या हे गेट लाईटींग वगैरे करून खुपच सुशोभित केलेले आहे.

पॅरिस शहरात फिरताना आमच्या बसनी एका छोटया फीयाट गाडीशी लगट केली वर पक्ष आणि वधु पक्ष आपापल्या कुंडल्या घेऊन बोलणी करण्यास बसली परंतु १५-२० मिनीटाच्या चर्चेतुन लक्षात आले की वर रूमानियातील व वधु पॅरिसची तेव्हा बोलणी फीसकटली व दोन्ही पक्ष एकमेकांना सद भावना व्यक्त करून निघुन गेले दुमजली बसचे रजिस्ट्रेशन व इन्शुअरन्स रूमानियातील व कारचे फ्रान्समधील पॅरीसचे त्यामुळे इतक्या आंतरराष्ट्र . समस्येला तोंड देण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी एकमेका प्रति सदिच्छा व्यक्त करून निरोप घेतला.

पॅरिसची ऑपेरा आर्ट गॅलरी ही युरोपमध्ये प्रसिध्द आर्ट गॅलरी आहे. ती तेथील मुख्य बाजार भागात असुन तिचा दर्शनी भाग खुपच कळा कुसरीचा असुन आर्ट गॅलरीला शोभेसाच आहे. दर्शनी भागाला जवळ जवळ ४० पायऱ्या असुन येथे युरोपातले सर्व कला दालनातले कलाकार येत असत व आपल्या कलेचा अविष्कार करीत प्रसिध्द फीडल वादक निरो येथे काही दिवस राहीला होता असे सांगतात.

येथील रस्ते दोन चॅनेलचे व अगदी स्वच्छ आहेत. चौका चौकात रहादारी नियंत्रणा करीता संकेत दिवे तर आहेतच परंतु इलेक्ट्रॉनिकचे मोठे घडयाळ पण असते. उंच मनोऱ्यावर घडयाळ अनेक ठीकाणी असतात. बीग बेन टॉवर लंडनचे व मुंबईचे राजाबाई टॉवर अशा मनोऱ्यावरील घडयाळा करीता प्रसिध्दच आहेत परंतु १०--१२ फुट उंचीचे स्तंभावर (पीलरवर) चौकात मोठे घडयाळ लावलेले हे अगदीच नवीन वाटले. पॅरीसमध्ये सार्वजनिक स्वच्छता गृहे सर्वत्र आहेत. त्याला ग्लेझड टाईल्स, आरसे

असतात. काही ठीकाणी प्रसाधन साधने जसे साबु, पावडर इत्यादीपण असतात वाश बेसीनवर पाणी वाया जाऊ नये म्हणुन २-३ लीटर पाणी वाहुन गेल्यावर आपोआप बंद होतात. त्यांना **anti waste cock** लावलेले असतात. त्यांची स्वच्छता ठेवण्याकरीता व इतर देखभाल करण्याकरीता एखादी बृध्द कींवा अपंग स्त्री तीथे असते प्रसाधन गृह वापरणाऱ्यानी तिला २-३ फ्रॅंक द्यायचे असतात आर्ट गॅलरीच्या बाजुच्या रस्त्यावर एक स्वच्छता गृह होते. बाहेरून बंद व दाराजवळ पैसे टाकण्याकरीता एक रोमन दोनच्या आकाराची खाच होती. आमच्या एका साथीदाराने त्या खाचेत दोन फ्रॅंकचे नाणे टाकले व तो दार उघडण्याची वाट पहात बसला परंतु नाणे परत आले. दार काही उघडले नाही. असे दोन तिनदा नाण टाकुन पाहीले पण दरवेळी नाणं परत आले रस्त्यानी जाणारे येणारे लोक आमच्या भोवती जमु लागले त्यात सर्व वयोगटातील स्त्रीया व माणसे होती. ती फ्रेंच भाषेत त्या स्वच्छता गृहा बद्दल सांगत होती. परंतु त्यांची भाषा आम्हाल कळत नव्हती. शेवटी एक वृध्द जोडपे पुढे आले आणि त्यानी हात धरून पुढील चौकात चलण्यास सांगीतले त्याच्या तुटक इग्लीश भाषेवरून तेवढाच बोध झाला. काहीतरी गडबड झाली आहे. आणि हे लोक आपल्याला बहुतेक चौकातल्या पोलीसकडे नेत असावे असे वाटले. आम्ही चौघे आणि आमच्या मागे पुढे ते २०-२५ जण अशी वरात चौकात गेली. चौकात एका कोपऱ्यात एक वृध्द स्त्री टेबल खुर्ची मांडुन बसली होती. तिने आपल्या मोडक्या तोडक्या इंग्लीश भाषेत सांगीतले की येथे एक एक फ्रॅंकचे तीकीट घ्या आणि ते प्रसाधन गृहाच्या दाराजवळच्या खाचेत टाक म्हणजे तिळ उघड सारखे दार उघडेल एवढे सर्व होई पर्यंत ते सर्व लोक आमच्या भोवती मदती करीता उभेच होते. आमची अडचण निस्तरलेली पाहील्यावर सर्वानी फ्रेंच मध्ये अगुरीव्हार (Aug - REVOIR) म्हणजे टाटा करून निरोप घेतला. फ्रेंच लोकांची टुरीस्ट बद्दलची ही मदतीची भावना फारच सुखकर वाटली.

आर्ट गॅलरीच्या मागच्याच चौकात पॅरीस मधले सर्वात मोठे डीपार्टमेंटल स्टोअर आहे येथे सर्व तऱ्हेचे वस्तुकरीता वेगवेगळे दालनं आहेत. येथे आपल्या आवडी प्रमाणे कपडा घेऊन टेलर कडून कपडे शीवून घेणे हे श्रीमंत लोकानाच शक्य होते. बाकी सर्व जण रेडीमेड कपडे आपल्या मापा प्रमाणे बदलवुनच वापरतात. ३ महीन्याच्या मुला पासुन सर्व वयोगटातील लोकाकरीता स्त्री, पुरूषांकरीता तसेच मुला मुलीकरीता वेगवेगळ्या दालनात कपडे सजवुन ठेवलेले असतात. येथे ट्रॉली घेऊन

फीरायचे आणि खरेदी करायची एक मध्यम वयीन मुलगी आपल्या अपंग आईला चाकाच्या खुर्चीत बसवुन व स्वतः खुर्ची ढकलीत सर्व स्टोअरभर फिरून खरेदी करताना दिसली. फ्रान्स मध्ये कुटुंब व्यवस्थेची संकल्पना पुर्ण विस्कळीत झाली आहे वृध्दांची समस्या तिव्र स्वरुपात आहे आणि त्यातही अपंग वृध्दाची सेवा ही तर इतिहास कालीन कल्पना झाली आहे. त्या पार्श्वभुमीवर एक मुलगी आपल्या अपंग आईची अशी सेवा करताना पाहुन तिच्या बद्दल कुतुहल वाढले. तिच्याशी चर्चा केल्यावर उलगडा झाला की ति जर्मन असुन फ्रेंच माणसाशी तिने विवाह केला आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती खुर्चीतील अपंग स्त्री ही तिची आई नसुन सासु आहे. कुटुंब, त्यातील नातेवाईक ह्यांच्या बद्दलचा प्रेमाचा झरा क्षीण स्वरूपात का होईना! पण अजुन झुळ झुळ वाहतो आहे. त्याचा प्रत्यय त्या सुखाच्या क्षणी आला.

येथील उत्तराच्या दालनात फीरताना जशी त्या दालनाची प्रशस्ती लक्षात रहाते तशीच अत्तरांची विविधता पाहुन मन भारावुन जाते. अत्तराकरीता फ्रान्स फार प्रसिध्द आहे. विवीध गंधांचे अत्तर, निरनिराळ्या स्वादाची दारू आणि बहु विद नेत्र सुखाचे नाईट क्लब ही रसीक फ्रान्सची खास खासियत, युरोपच्या रसील्या रसीक जनांच्या कल्पना विश्वातील सम्राज्ञी. ह्या स्टोअरच्या अत्तराच्या दालनात निरनिराळ्या रंगाचे व गंधाचे अत्तरांची नुसती उधळण होते. आपल्या आवडीच्या विशीष्ठ सेंटचे नाव सांगुन मागणी करणारे रसीक जास्त प्रत्येक सेंट त्याच्या खास गंधामुळे चांगला वाटणारे सर्व समावेक्षक आमच्या सारखे गीऱ्हाईक तिथे कमी सापडतात. तिथल्या रेखीव विक्रेत्यानी आमच्या कपडयावर प्रत्येक सेंट उडवला व त्यातला आवडला तो खरेदी केला. खरेदी केला त्या पेक्षा अंगावर उडवलेला सेंट कीती तरी जास्त होता. त्या नंतर सर्व पॅरीसभर आम्ही हा सुवास दरवळला तसेच पॅरीसच्या २० मजली पेन्टा हॉटेलच्या १८ व्या मजल्यावरही पसरवला.

फ्रान्सचा व्हीसा मिळण्यावर फारच कडक निर्बंध आहेत. त्यामुळे परदेशी यांना येथे स्थायीक होणे फार कठिण आहे. आपल्या बंदिस्त रेखीवपणाची ही आगळी वेगळी जपणुक कोदंणातल्या पैलुदार हीऱ्या सारखी वाटते. फ्रान्सच्या संपुर्ण प्रवासात आफ्रिकन लोक ५-६ च जण एफेल टॉवर जवळ विक्रेते म्हणून आढळले.

दुर्मिळ रेखोव सौंदर्याच्या स्त्रिया बहुतेक आपल्या बॉय फ्रेंड बरोबर जोडीनी फीरताना आनंदात बागडताना दिसतात. सार्वजनीक ठीकाणी एकमेकांशी घसट चुंबन हयात कोणाला काही गैर वाटत नाही हा बहुधा त्या दोघांचा वैयक्तीक मामला समजण्यात येत असावा. त्यामुळे एफेल टावरवरच्या गॅलरीत एका प्राध्यापक जोडप्याला एकाच खुर्चीवर माडीवर बसुन आजुबाजुचे विहंगम दृष्य पहाताना आपण काही गैर करतोय असे वाटले नसावे. आणि टुरीस्टना जवळ उभे करून फोटो काढायलाही त्यांना काही अनोखे वाटले नाही. परंतु रस्त्यानी वृध्द जोडपेही एकमेकांचे हात धरून एकमेकांना आधार देत आपल्या सुखी सहजिवनाचा स्मृतीठेवा मुठीत बंद करुन चालताना दिसतात तेव्हा त्या सुखी सहजीवनाचे आपणही साक्षीदार आहोत असे वाटते.

हॉटेल पेन्टाच्या सभागृहात एक तीथल्या शीक्षणतज्ञ व समाजशास्त्राज्ञांचे चर्चा सत्र होते त्यातील एका तज्ञाशी गप्पा करताना हया प्रगत देशातील प्रश्नही कीती प्रगत आहेत हयाची कल्पना आली. भारतात लोक संख्या वाढीचा जटील प्रश्न आहे. वाढीच्या प्रमाणात समृध्दी कशी आणायची आहे ती समृद्धी कशी टीकवायची तसेच लोक संख्या वाढीच्या प्रमाणात दर डोई उत्पन्न कसे वाढवायचे हा प्रश्न आहे. परंतु इथे फ्रान्समध्ये लेक संख्या घटीचा प्रश्न आहे. भारतात लोक संख्या वाढीचा वेग दर दशकात २०-२१ टक्के आहे तर फ्रान्स मध्ये लोक संख्या घटीचा वेग दशकाला १/१० टक्के आहे त्यामुळे दर दशकात लोकसंख्ख्या घटत आहे. हयाची कारण सांगताना ते म्हणाले की येथे विवाह संस्था, कुटुंब संस्था तरूण तरूणींना आवडत नाही. ती त्यांना बंधनकारक वाटतात. मैत्रीपुर्ण सहजीवन ही त्यांची आवडती व्यवस्था. हया व्यवस्थेत प्रजोत्पादन, शीशु संगोपन हे बसत नाही. तेथील समाज धुरीणा समोर हाच प्रश्न एक आव्हान म्हणून सध्या उभा आहे हया विरूध्द सर्व स्तरावरून शैक्षणिक प्रचार चालु आहे.

पॅरिस ते झुरिच हा प्रवास रोड बसने ६९८ कीलोमीटरचा आहे. त्यात पॅरीस पासुन ४६६ कीलोमीटर पर्यंत फ्रान्सच्या हद्दीतला प्रवास बाकीचा स्वीसझरलंडचा दोन्ही देशांच्या सीमेवर पासपोर्ट व्हीसा तपासणी होते. ही तपासणी अगदी १० मीनीटात पुर्ण होते. स्वीस हद्दीत तर तिथल्या स्वागतिकेनी प्रत्येकाशी हस्तांदोलन करून उबदार स्वागत केले तेव्हाच हया जगातल्या सर्वात सुंदर नंदनवन देशाबद्दल आपुलकी निर्माण झाली. पॅरीस मधुन बाहेर पडताना एका ठिकाणी हायवेच्या बाजुनी १०० मीटर अंतरावर

रेसिडेन्शीअल ३-४ मजली इमारती होत्या. त्यांना हायवेच्या वाहतुकीचा ध्वनी प्रदुषणाचा त्रास होवु नये म्हणुन खास (स्पेशल) व्यवस्था रस्त्याच्या बाजुने केली होती.

ध्वनी प्रदुषणा बद्दलची ही जागरूकता कौतुकास्पदच आहे.

स्वीसझरलंड हे जगातले नंदनवन येथे सर्व देशामधुन पर्यटक येत असतात हया देशाचे जवळ जवळ ६० टक्के उत्पन्न हे पर्यटका पासुनच मीळते. चेक पोस्टवर एक लहान हॉटेल आणि डॉलर वटणावळीकरिता एक बँकेचे कार्यालय सर्व व्यवस्था पाहुण्यांच्या सोयी सुवीधाची जाण ठेवुन केलेली हा पॅरीस झुरीच हा हायवे प्रशस्त आठ चॅनलचा आहे. चार जाणाऱ्या वाहनाना चार येणाऱ्या वाहनाकरीता विषेश चढ उतार नाही की खास वळण नाही. दर २५ कीलोमीटरवर पार्कींगची खास व्यवस्था रसत्याच्या बाजुला केलेली तेथे एक हॉटेल एक स्वच्छतागृह, प्रवासात लागणाऱ्या जुजबी सामानाचे स्टोअर आणि फोनची व्यवस्था असते. रसत्यात कोणते वाहन पार्ककेलेले आढळत नाही. एखादे वाहन रसत्यात नादुरूस्त झाल्यास ते ओढुन लगेच पार्कींगच्या जागी नेऊन ठेवतात. दोन्ही बाजुनी येणारे क्रॉस रस्ते हे वरून उडान पुलावरून नेलेले असतात रसत्यात मध्ये मोकट जनावर नाहीत त्यामुळे वाहतुकीला कोणताच अडथळा नसतो वाहन अगदी संथ गतीनी ७०-८० कीलोमीटरच्या वेगानी चालत रहाते. हया रसत्याची देखभाल खाजगी ठेकेदाराकडे असते. तो प्रत्येक वाहना करीत नाममात्र वेळ सुरूवातीला घेतो. मधल्या चहापाण्याचे मुक्काम धरूनही हा सर्व ६९८ कीलोमीटरचा प्रवास १२ तासात होतो. फ्रान्सच्या भागात रसत्याच्या दोन्ही बाजुला दृष्टी जाईल तितपर्यंत अगदी सपाट जमीनीवरची शेती आणि द्राक्षाचे मळे दिसतात. कारण द्राक्षरस ही तर फ्रान्सची खासियत. स्वीसझरलंडच्या भागात सर्व दुर हीरवे कंच रान व मधे मधे ७-८ फुट उंचीची गोल हीरवी गार झाडे दिसतात. एखाद्या कलाकारानी कल्पनेनी आपल्या कॅनव्हास वर दृष्य काढावे तस स्वप्नसृष्टीतल हे निसर्गरम्य विलोभनीय दृष्य असत. कॅसेट संगीताच्या तालावर निसर्गाच्या लयीत बसचा तो संथ प्रवास निसर्गाच्या रम्य सानिध्यातला कधी संपुच नाही असं वाटतं. परंतु शेवटी सुखालाही मर्यादा आहेच. बारा तासांच्या बस प्रवासातही थकवा नव्हता. अति उत्साही वातावरणात झुरीच विमान तळाजवळचे सर्वात मोठे हॉटेल नोवोटेल कधी आले ते कळलेही नाही. विमान तळ ते हॉटेल अशी हया हॉटेलची स्वतःची बस सेवा आहे. दर एक एक तासानी प्रवाशांचे स्वागत करायला ही सेजा तत्पर असते. नंदनवनातील झुरीच हे शहर फुलांनी डवरलेलं येथे चौका

चौकातुनच्या आयलंड मध्ये सुध्दा सुशोभीत फुलांचे ताटवे आहेत. फुल आपल्या विविध रंगानी प्रवाशांना सुखवतात, त्यांना उत्साहीत करतात आणि त्यांच्यातही रंग भरतात. येथे फुंल तोडणे त्यांना बेरंग करणे हा दखलपात्र गुन्हा आहे त्याकरीता पाच फलँक दंड होवु शकतो. रस्ते बहुतेक दोन चॅनलचे आहेत. रस्ता आणि फुटपाथ हयामध्ये ६-७ फुटाचा भाग हा दुचाकी वाहना करीता राखीव असतो. चौका चौकात हया भागात दुचाकी वाहनाचे चित्र काढलेले आढळते इतक्या शांत वातावरणातील इलेक्ट्रीक बस सेवाही इथली विषेश सुवीधा आहे. तसेच सहा डब्यांची गडद निळ्या रंगाची इलेक्ट्रीक लोकल शांत परिसराला तितक्याच शांतपणे वेगाने भेदुन जाताना पाहुन आश्चर्य वाटते. ध्वनी प्रदुषणात आकंठ बुडणाऱ्यांना हे आवाज वीरहीत प्रक्षेपण पहाताना नवल तर वाटतेच परंतु आपल्या कानात काही बीघाड तर झाला नाहीना असा संशयही येतो.

झुरीच ते पिसा हा स्वीस व इटाली ह्या दोन देशातुन जाणारा ६७० कीलोमीटर लांबीचा रस्ता नकाशात. दोन गावांना सरळ रेषेनी जोडावी तसा अगदी सरळ रस्ता आहे. पुर्ण आल्पस पर्वताच्या रांगा ओलांडल्या पण कुठेही घाटाचा रस्ता नाही की वळण नाही. नेहमी कटाक्षानी नाकासमोर धावणारा सरळ रस्ता आहे. आपल्या मार्गात पर्वत मधे आला तर त्याला फोडुन त्याच्या पोटात घुसुन तो पार करण्याची जिद्द या रस्त्यात आहे. मार्गात ४३ बोगदे आहेत. त्यातील ३८ बोगदे स्वीस मध्ये व ५ बोगदे इटाली देशाच्या हद्दीत येतात. जगातील सर्वात लांब बोगदा १७ कीलोमीटर लांबीचा सेंट गोथार्डास (st. GOTHARDAS) हा हयाच रस्त्यावर आहे स्वीसच्या हद्दीत सर्व बोगद्यात विजेचे दीवे व टेलीफोन बुथ आहेत. हा एवढा लांब बोगदा १५-२० मीनीटात सहजच पार करता येतो. रस्ता ६ चॅनेलचा आहे तीन चॅनेल जाणाऱ्यां व तीन येणाऱ्या वाहना करीता इतका प्रशस्त आहे. दर २५ कीलोमीटरवर व बोगद्या मधेही स्वयंचलीत फोनची व्यवस्था आहे. १ मीनीटाकरीता तीन मीनीटाकरीता व पाच मीनीटाकरीता वेगवेगळे दर आहेत. एक मीनीटाकरीता नाणं टाकुन जर बोलण त्यापेक्षा जास्त झालं तर लगेच फरकाचे बील पुढे येते. फोन लागला नाही तर पैसे परत करणारी ही यंत्रे आहेत. असे पैसे न खाणारी यंत्र पाहुन त्याच्या इमानदारीला दाद द्यावीशी वाटते. आल्पस पर्वताची बर्फाच्छादीत शीखर मधुन मधुन आपल्याला साद घालतात. त्या वरील सुर्य कीरणात चमचमणारे बर्फक्वचीत सप्तरंगाची प्रखरण करतात. तेव्हा ते दृष्य फारच मनोहारी दिसते. इटालीच्या हद्दीत

आल्यावर पहीले आपले स्वागत करतो तो कोमो तलाव निळसर स्वच्छ पाणी, दोन्ही काठावर बगीच्या त्यात रंगी बेरंगी फुल आणि हीरवे कंच लॉन. चारी काठावरचा बगीचा फुलझाडं वगैरे अगदी मोजमाप करून इतका सारखा केला आहे की आपण तलावाच्या कोणत्या काठावर उभे आहोत हाही संभ्रम पडतो ह्या बगीच्यातला थोडासाही मुक्काम आल्हाद दायक होतो व इटालीतील आपले स्वागत छान झाल्यासारखे वाटते.

पीसा हे इटालीतील जगप्रसिध्द तिरक्या मनोऱ्याचे ठिकाण. येथील मनोरा हा जगातील काही महान आश्चर्यपैकी एक समजतात. हा मनोरा १२ व्या व १३ व्या शतकात बांधला. ह्या पीसाच्या मनोऱ्याचे बांधकाम ११७३ मध्ये सुरू झाले व पुढे १८० वर्षांनी ते पुरे झाले. हा ५५ मीटर उंच मनोरा आहे आणि ५.१० मीटरनी तिरपा झालेला आहे. म्हणजे मनोऱ्याचे वरचे टोक हे लंबापासुन (Perpendicular from earth) ५.१० मीटर जमीनी कडे झुकलेलें आहे हा मनोरा मधेच झुकला नसुन पुर्ण ५५ मीटर उंचीचा मनोरा एका सरळ रेषेत झुकलेला असुन जमीनीशी साधारण ८४° चा कोन करून उभा आहे. तो बांधतानाच त्याचा पाया खचला होता पण राजानी तो जुजबी दुरूस्त करून तसाच त्या पायावर पुरा मनोरा बांधला असे इतिहास कारांचे मत आहे तर त्याचा पाया आता काही दशकापूर्वी दबणे सुरू झाले आणि आताही दर वर्षी ४-५ सेंटीमीटरने तो दबतो आहे असे वास्तु शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे मनोऱ्याला आतुन जीना आहे प्रत्येक स्टेजवर गॅलरी व तीला रेलींग आहे पूर्वी ५० मीटर पर्यंत जाता येत असे आता सुरक्षीततेे करीता फक्त २ ऱ्या स्टेजपर्यंतच जाऊ देतात. ह्या मनोऱ्या सोबतच दुसरे आश्चर्य म्हणजे मनोऱ्यापासुन सुमारे ३० मीटर अंतरावर मनोरा झुकला आहे त्याच बाजुला घरं आहेत. आणि रोज सकाळ संध्याकाळ मनोऱ्याला वंदन करून काही हींमतवान लोक तिथे रहातात. मनोऱ्याच्या जवळच एक संगमरवरी दगडांचे चर्च आहे तसेच एक राजवाडा सदृश भव्य इमारत आहे. तीथे म्युझीयम आहे हा म्युझीयम सायंकाळी सात वाजता बंद होतो. पीसा हे इतीहास कालीन मोठे शहर होते ते त्या काळी व्हेनिस प्रजासत्ताकात होते. तेथे त्या काळी एक प्रसिध्द युनीव्हर्सीटी होती. ह्या युनीव्हर्सीटीत जग प्रसिध्द शास्त्रज्ञ गॅलि लि ओ हा प्राध्यापक होता असे सांगतात. इतर टुरिस्ट ठीकाणा प्रमाणे येथेही शोभेच्या व इतर वस्तुच्या विक्रीकरता लहान लहान दुकान आहेत. इटालीयन विक्रेत्यांचा उद्दामपणा, रागीट पणा व भांडकुदळ वृत्तीचा पहीला अनुभव येथे आला.

पीसा ते रोम हा ३१० कीलोमीटर लांबीचा बसचा प्रवास. रस्ते साधारण प्रतिचे व त्यांची देख भालही बेताचीच. त्यामुळे एवढया प्रवासालाही ५ १/२ तास लागले. येथील हॉटेल प्रीन्सेसमध्ये मुक्काम होता. ह्या हॉटेलचा तळ मजला म्हणजे खरोखरचाच तळ मजला अगदी जमीनी खालचा. त्या हॉटेलचा फर्स्ट फ्लोअर म्हणजे ग्राऊंड फ्लोअर आहे. इटाली मध्ये फीरताना पुष्कळसा भारतीय वातावरणाचा भास होतो. त्या दिवशी दिवसाचे उष्णतामानही २८ सेंटीग्रेड म्हणजे ८२ फॅरनहीट होते तिकडे उन्हाळा मे ते ऑक्टोबर असतो. आणि दिवसाचे तापमान साधारण ३०° पर्यंत जाते. येथे लेबर युनीयन फार संघटीत आहेत. कोणतीही लहान मोठी गोस्ट सरकारला ह्या युनियनशी चर्चा करून त्यांची संमती घेऊनच कराव लागते. दुपारच्या लंच टाईम मध्ये पेट्रोल पंप सुध्दा बंद असतात असे कळले येथे खीसे कापणे, उचले चोर, हातातली मनी पर्स कॅमेरे वगैरे हातोहात पळवीणारे हुषार हुत्री अनेक आहेत. पुष्कळ वेळा जवळचे पैसे, पासपोर्ट चोरी गेल्यामुळे येथे दुसरा पासपोर्ट मीळेपर्यंत अडकुन पडल्याची पुष्कळ उदाहरणे घडत असतात. त्यामुळे सेंट पीटर चर्च वगैरे ठिकाणी फिरताना पर्स आपल्या पोटाशी धरा पर्स, कॅमेरे संभाळा अशा सुचना सारख्या मीळत असतात. रोमची कॅथोलीक पंथाच्या धर्मगुरूंची व्हॅटीकन सीटी प्रसिध्द आहे. तेथे विषेश परवानगी घेतल्या शीवाय जाता येत नाही. जगात ख्रीशचन धर्माचा प्रसार कसा होईल. कोणताच धर्म न मानणाऱ्या सोन्हीयट रशीया किंवा चीन येथेही धर्माचा प्रसार, प्रचार कसा योजनाबध्द रीतीनी करता येईल हयाची काळजी वाहणारे धर्मपीठ येथे आहे. सेंट पीटर चर्च येथे आहे. हे खुपच अवाढव्य कॅथोलीक पंथाचे चर्च जगातले ह्या पंथाचे सर्वात मोठे चर्च आहे. ह्या चर्चचा वरचा जेम १९० फुट व्यासाचा लाल दगडांनी बांधलेले हे वीशाल चर्च आहे. वरच्या छताला नक्षीदार जाळया खाली संगमवरी टाईल्स आहेत. आतुन बाहेरून अगदी स्वच्छ ठेवले असते. येथे सेंट पीटर ह्यांची समाधी आहे. एका बाजुला ह्या चर्चमध्ये धार्मीक प्रवचन चालु असतात रोम मध्ये जवळ जवळ ९५ टक्के लोक हे ह्या कॅथोलीक पंथाचे आहेत.

रोम हे पडक्या राजवाडयांचे शहर आहे काही राजवाडे तर अगदी खींडार झाल्यागत झाली आहेत. रोमवर निरनिराळ्या राजांनी वेगवेगळ्या शतकात राज्य केल. राज्य घेतलं की दरवेळी राजानी आपल्यासाठी नवीन राजवाडा बांधायचा जुना राजवाडा

राजाचं तेथे वास्तव्य नाही म्हणून त्याकडे तो पडे पर्यंत कोणी पाहीलं नाही तसेच प्रत्येक नवीन राजानी ह्या जुन्या राजवाडयांचा रागच केला. हा इजिप्तच्या राजानी बांधलेला राजवाडा हा दुसरा ग्रीसच्या राजाचा असे अनेक पडके राजवाडे दिसतात. पॅरीसला जसे जुने १२व्या १३ व्या शतका तीलही राजवाडे एक आपल्या राष्ट्राची परंपरा, अस्मीता म्हणून अभीमानानी जतन केले आहेत अगदी त्याच्या उलट स्थीती येथील आहे. जित आणि जेत्यांचा राग, नवीन सम्राज्याचा जुन्या राजा बद्दलचा दुःसास वगैरे अनेक मानवी मनाचे अनेक पौलु ह्या खींडारात दबलेले आहेत.

रोमन लोकांचा सर्कस एरिना आहे. येथे जुन्या काळी रथांच्या शर्यती होत असत. एक क्लब बील्डींग पडक्या स्थितीत आपल अस्तीत्व कसं बसं टीकवुन उभी आहे. त्यात ४ मोठे प्रशस्त दीवाण खाने आहेत. त्यात आखाडा आहे येथे फक्त राज घराण्यातील व सरदार घराण्यातीलच लोक येत असत. आपली आपसातील मैनी हेवे दावे. वैमनस्य ही टीकवण्याकरीता व वाढवण्याकरीताचे मनसुभे येथे रचले जात असत. एक मोठा गोल आकाराचा ३ मजली स्टेडीयम आहे. त्या वरचे छप्पर पडले आहे. हयात ५०,००० लोक बसत असत. लोकांच्या राजकारणातील व माजातील स्थानाप्रमाणे त्यांना येथे वेगवेगळया जागा राखुन ठेवल्या असत. येथे बुल फायटींग, वाघाशी युध्द, जीवघेण्या कुसत्या, भाला युध्द, रोमन स्त्रीयाच्या जीवघेण्या कुस्त्या वगैरे होत असत. ह्या स्टेडीयमला “कलो सियम” म्हणत. वेस पॅसियन आणि टायटस या सम्राटांनी ही कलोसयम नावाची प्रचंड इमारत बांधली. मुद्दाम युध्दाचे प्रशिक्षण देऊन तयार केलेले योध्दे आणि हिस्त्र पशु हयांच्यातील जीवघेण्या झुंजी येथे होत असत. ह्या जीव घेण्या झुंजी मध्ये कीती अमाप रक्त सांडत असे, कीत योध्दे मारल्या जायचे. पण ह्या हिस्त्र गोष्टी पहाण्याकरीता त्या पासुन मीळणारा असुरी आनंद घेण्याकरीताच प्राचीन रोमचे नागरीक अत्सुक असत आणि आजही त्या शुर वीर योध्दयांची ज्यांनी आपल्या वीव्हळण्यानी बलीदानानी रोमनांची करमणुक केली त्यांची स्मृती म्हणून ह्या इमारतीची जपणुक केलेली दीसते. प्राण्यांचे चिलाट, योध्दयांचे कींचाळणे, यातनांनी तडफडणे आणि असुरी आनंदानी साद घातलेल्या प्रेक्षेकाना ह्या वास्तुच्या भींती साक्षीदार आहेत. कदाचीत् हा सर्व कल्लोळ साठवु न शकल्यामुळे हयाच्या छप्परानी शोकमग्न जमीनीशी जवळीक साधली असावी.

व्हिक्टर इमॅन्युअल मॉन्युमेंट म्हणून एक जुन्या रोमन कला कुसरीची प्रशस्त बिल्डींग आहे. त्या समोर एक सुंदर कारंजे आहे. या कारंजामध्ये दोन उधळलेले घोडे धरून आणणारे दोन सशक्त जवान असे हे सुंदर रेखीव संगमरवरी शिल्प आहे. त्या भोवती एक १० फुट रूंदीचे गोल टाके आहे त्या पाण्यानी भरलेल्या टाक्यात नाणे टाकुन आपले भाग्य अजमावयाचे असते. १ ले नाणं मध्यभागी भिंतीला न लागता बुडाले तर रोमला पुन्हा यावे लागेल असा संकेत समजतात. दुसरे नाणे भीतीला लागुन बुडाले तर इच्छापुर्ती व नाणे न बुडाल्यास दुःख संकटे येतील अशी श्रध्दा येथील लोकांची आहे. आम्ही गेलो तेव्हा ते टाके कुठुन तरी लीक झाले होत त्यामुळे त्यात पाणी नव्हते. त्यामुळे आम्हाल कुठलाच संकेत घेता आला नाही. नाणे आपल्या खीशातच ठेवण्याचा संकेत मीळव्याचे आम्ही धरून चाललो हे संकेत आणि त्यावरच्या अंध श्रध्दा ह्या अजुनही तीथें जोपासलेल्या दिसतात. सर्कस एरीनाच्या जवळच दोन लहान देवळं आहेत साधारण १५-२० फुट व्यासाची त्यातील एका देवळात उपवर मुली आपल्याला चांगला पती मीळावा म्हणून प्रार्थना करीत देवाल नेम करीत तसेच दुसऱ्या देवळात उपवर मुलगे चांगली पत्नी मीळावी म्हणून देवाला साकडे घालीत. परंतु आता विवाह ठरवण्याच्या पध्दतीत आमुलाग्र बदल झाला आहे. व्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि सह जीवनाच्या ह्या विचार धारेत विवाह ठरवण्याची जबाबदारी उपवर तरूण तरूणींनीच स्वतःच उचलली आहे. आणि म्हणुन ह्या देवळाकडे आता कुणी फीरकत नाही.

येथील चलन लीरा हे फारच लहान चलन आहे आपल्या नवीन पैशा सारखे. एक रूपया बरोबर ८० लीरा असा हीशोब एका अमेरीकन डॉलर बरोबर १८१६ लीरा यायच्या वटणावळ टॅक्स वगैरे जाऊन दहा डॉलरचे ६८६५० लीरा मीळाले. महागाई सुध्दा तशीच आहे. एक कप चहाला १००० लीरा पडायचे २५० ग्रॅम बीस्कीट पुडयाला २५०० लीरा, १२० ग्रॅम व २५० ग्रॅम बीस्कीट पुडे व दोन कप चहाल ५७०० लीरा पडले म्हणजे जवळ जवळ ७१ रूपये आपली पर्स संभाळा, खीसे संभाळा ह्या सुचना लक्षात ठेवत तेथील भाजी बाजारात गेलो. भाज्या पुष्कळशा आपल्या कडच्या सारख्याच प्रत्येक भाजीच्या ढीगावर एक खडुनी लीहीलेली पाटी. त्यावर १ कीलोचा भाव इंग्लीशमध्ये लीहीलेला. बाजारात अजीबात गडबड, आरडा ओरडा नाही. भावाची घासाघीस नाही. बहुतेक सर्व विक्रेत्या स्रीयाच. बाजारात गर्दीही स्त्रीया व वयस्क माणसांचीच. लीरा

सारखं इतकं लहान नाणं परंतु विक्रेत्ता पाच लीराचा सुध्दा हीशोब करून वसुल करतान दीसला.

रोम मधील बॅंकेत गेलो. आत जाण्याकरीता एकच दार त्यावर लाल दीवा लागलेला. दर तीन मीनीटांनी हीरवा दीवा लागणारं आणि दार एक मीनीटाकरीता उघडणार. एवढया वेळत फक्त ३-४ माणसे आंत जाणार. बाहेर येण्याचे दार वेगळे. त्यामुळे बॅंकेत सुरक्षीतता आहे तसेच गर्दीही कमी असते बॅंकेत २०,००० व ५०,००० तसेच एक लाखाच्या नोटा डॉलरच्या बदल्यात मिळल्या. त्या नोटाही अर्ध्या अधीक फटक्या, जुन्या, चुरगळलेल्या, डाग पडलेल्या आपण अशा नोटा घेत नाही. अशा नोटा बॅंकेतुन मीळल्या. त्या फाटक्या नोटा बदलुन देण्या विषयी विचारल तर सर्वजण आश्चर्यानी आमच्याकडे पहात राहीले त्यांनी मॅनेजरकडे जाण्याविषयी संकेत केला मॅनेजरनी आपल्या जुजबी इग्लीश भाषेत सांगीतले की दे आर फार बेटर दैन वाट यु गेट आऊट साईड. बॅंकेतुन बाहेर पडल्यावर पहीले काम केल तर ते म्हणजे एक लाखाची फाटकी नोट वटवली तेव्हा जीव भाडयांत पडला.

येथे रात्रीची इलेक्ट्रीक रोषणाई असते. परंतु पॅरीस सारखी सर त्याला नाही तसेच पॅरीस सारखे नाईट क्लबही नाहीत. इंडीया हाऊस हे भारतीयाचे पंजाबी हॉटेल आहे. भारतीय चवदार जेवणाची रोम मधील मजा काही वेगळीच असते. रोम हे फीयाट गाडया, अवंती गरेली लॅम्ब्रेटा हयांचे माहेर घर येथे चामडयाच्या वस्तु, पर्सेस सुट केसेस इत्यांदी फार चांगल्या मीळतात. चमकदार आणि विवीध प्रकारच्या टाईल्स ही येथली खासीयत. लांब १६ चाकी ट्रॉलीवर दोन थरात आठ आठ मोटारीची वाहतुक ह्या देशाच्या समृध्दीच्या रंगीत खाणाखुणा वाटतात तर गावाबाहेर जुन्या गाडयांचे २०-२० फुट उंचीचे ढीगारे हे तरक्कीतील गळलेले अवशेष वाटतात.

रोम ते व्हेनीस हा हायवे चा प्रवास आपल्या कडच्या राष्ट्रीय महामार्गाची आठवण करून देणारा आहे.रस्त्यांची देखभाल वगैरे सर्व भारतातील महामार्गा सारखीच आहे. शेक्सपीअरच्या प्रसिध्द नाटकातील नावावरून (मर्चट ऑफ व्हेनीस ) ह्या गावाबद्दलचे कुतुहल वाढते. येथे १४ व्या व १५ व्या शतकात प्रसिध्द प्रजासत्ताक साम्राज्य होते पीसा येथील त्या काळातील प्रसीध्द विद्यापीठ ह्या साम्राज्यात होते. ह्या व्हेनीस शहराची जडण घडण जगातल्या इतर शहरापेक्षा फारच वेगळी आहे हे प्रसिध्द

कालव्याच शहर जगात एकमेव आहे. गावा बाहेरून हायवे आहे. त्याच्या आत रींग रोड आहे. बाहेरची सर्व वाहन ह्या रींग रोडवर थांबतात. त्या नंतर आत सर्व कालव्याचा वापर आणि बोटीचा प्रवास घराबाहेर पाणी आणि कालवा. भाजी, फळ हयांची बोटीतुन फीरती दुकाने काही ठीकाणी कालव्यातच प्लॅटफॉर्म करून त्यावर दुकान थाटली आहेत. आपण बोटीतुन त्या दुकानासमोरून लाईनीत जायचे आणि खरेदी करायची कालव्याचे पाणी अगदी स्वच्छ असते. पाण्यातील भाजीचे दुकान ही कवी कल्पनाच वाटते. पण तेथे भाज्या अगदी कोरडया असतात. वजन वाढवण्याकरीता ओल्या केलेल्या भाज्या हा प्रकार येथे आढळत नाही. घरासमोर चार चाकी वाहन आपल्या वैभवाचे प्रतिक म्हणुन प्रतिष्ठेत उभ आहे हा समृध्दीवर देखावा येथे पहायला मीळत नाही. काही घरासमोर रंगीत, सजवलेल्या बोटी मात्र कुठे कुठे दीसतात. निरनिराळी कार्यालये कालव्याच्या दोन्ही काठावर आहेत. त्या करीत कालव्याच्या दोन्ही काठावर स्थानके आहेत कार्यालयात जाण्या येण्याकरीता वाटर बस जाये करते. त्याला ते व्हेपोरेटो(VAPARETTO) म्हणतात ही दोन मजली वाहतुकीची बोट. हयात बस मध्ये असतात. तशाच सीट असतात. मधुन वरच्या मजल्यावर जाण्याकरीता ५ फुट रूंदीचा जीना असतो. दुर वरची शोभा पहाण्याकरीता आम्ही वरच्या मजल्यावर बसलो होतो. स्थानक आल्यावर खाली उतरायचे तर जीन्याच्या पहील्या पायरीवर एक तरुण ज्याला तेथे उतरावयाचे होते तो व त्याची मैत्रीण हे घट्ट मीठीत प्रदिर्घ चुंबन घेते झाले. ते एक दीड मीनीट सर्व वरच्या मजल्यावरचे लोक खाली येण्याकरीता तिष्ठत उभे राहीले अगदी शांततेनी कोणीही एक शद्ब बोलले नाही. मग लाईन क्लीअर झाल्यावर जिन्यावरून घाई घाईने खाली उतरले. काही जण तर पळत पळत धक्याकडे गेले. ही ह्या लोकांची शिस्त प्रीयता म्हणायची की त्या नवीन मीत्र मैत्रिणीच्या रसिक पणाला दिलेली दाद म्हणायची हयाचा उमज पडला नाही. बोटीतुन उतरून सेंट मार्कस स्क्वेअर येथे गेलो. तेथे भव्य मार्बलचा राजवाडा आहे. उत्तम स्थीतीत राखलेला त्याच्या टॉवरवर एक मोठं घडयाळ आहे. त्याच्या दोन्ही बाजुस एक एक शीपाई हातात हातोडा घेऊन उभे आहेत. ह्या पोलीसांच्या वेषात त्या दीड फुट उंचीच्या बाहुल्या आहेत. दर अर्ध्या तासाने हे शिपाई आल्या हातातील हातोडयाने घडयाळ खालच्या घंटीवर टोल देताना दिसतात हयाच सारखे घडयाळ आपल्याकडे हैद्राबादला सालाझार म्युझीयम मध्ये आहे. हा राजवाडा १५ व्या शतकातला असुन फार चांगल्या स्थीतीत ठेवला आहे.

ह्या राजवाडया जवळच तिकडील प्रसिध्द मुरानो ग्लास फॅक्टरी आपल्या विस्तिर्ण प्रदेशात सोनेरी रंगाची उधळण करीत दिमाखात उभी आहे. येथील शोभेच्या

वस्तु आणि त्यातही विषेशतः सोनेरी रंगाच्या विविधी छटामधील काचेच्या वस्तु खेळणी, फुलदाण्या पहाण्यासारख्या आहेत. तेथील कारागीरानी घोडा, घोडेस्वार फुलदाण्या वगैरे पाच मीनीटात आपल्या समोरच करून दाखवल्या. ह्या वस्तु बनवीताना पाहतानाही वेगळाच आनंद मीळतो. कारागीराचे कौशल्य, त्याची सौदर्यदृष्टी, त्याची अल्प वेळातली कामाची सफाई, वस्तुची सुबकता आणि रंगांचे चटकदार मिश्रण हयातील कोणत्या गुणामुळे ती वस्तु इतकी आल्हाददायक झाली हे ठरवीणेही कठीणच आहे. त्याच्या सारख्या निष्णात कलाकाराला त्या मानाने वेतन मात्र फार अल्प मिळते ही मनाला खंत वाटली. ह्या वस्तु सुंदर आहेत त्या पहावयासच प्रसन्न वाटतात त्यांचा विकत घेण्याचा विचार जडच जातो. एक सहा इंचाचे ट्रे त्यावर सुबक दोन छोटे आईसक्रीम कप (रिकामे) हयाची कीमत रूपयामध्ये ५४० होती. गावात कालव्यातुन फिरताना निरनिराळ्या तऱ्हेच्या बोटी दिसतात. आपल्या मालकाची हौस कलादृष्टी व आर्थीक स्तर दीमाखात मिरवीताना ह्या बोटी कालव्यातील विवीधता आणि वैचित्र आणखीनच वाढवितात. एक एकराचा दोन प्रमुख रस्त्यांच्या कॉरनरचा प्लॉट, त्यावर विवीध रंगी फुलांचे ताटवे, मधे मधे ४-५ फुट उंचीचे हिरवे कंच गोल कापलेली झाडं छोटे छोटे लाल रस्ते, रंगीत पाण्याची कारंजे आणि त्यामध्ये हॉटेल पडोवा शेरेहन ची मोहक रंग संगतीनी सजवलेली सात मजली बील्डींग हे दृष्य पाहीलं की वाटत हे एखाद्या कलाकारानी कॅनव्हासवर रंगवलेल मोहक स्वप्न तर नाही.

व्हेनीस ते लक्स ह्या स्वीसझरलंडमधील प्रसिध्द हील स्टेशनच्या बसचा प्रवास ६९५ कीलोमीटरच होतो. मधला साधारण दोन तासाचा मुक्काम धरून हा प्रवास बारा तासांचा होतो. हयाच प्रवासात जगातील दोन नंबरचा (लंबाईमध्ये) बोगदा “सन बनी डीनो” हा स्वागत करतो. हयाची लांबी १६ कीलोमीटर आहे. बोगद्यात इलेक्ट्रीक लाईट फोन वगैरे सुवीधा आहेत. इटाली आणि स्वीसझरलंड हयांना जोडणारा हा रस्ता. हयातील काही भाग इटालीत व बाकीचा स्वीसमध्ये आहे. रस्त्याच्या देखभाली बद्दलही ह्या दोन्ही देशांच्या दृष्टीकोनातला विस्कळीतपणा, विसविसीतपणा रस्त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावरूनच लक्षात येतो. त्यामुळे इटलीची हद्द कुठे संपली हे रस्त्याच्या बोलक्या प्रवासात लगेच समजुन येते.

स्वीसच्या बस प्रवासात रस्त्याच्या दोन्ही भागाना दृष्टी जाईल तीतक्या दुर पर्यंत गर्द हीरवा गालीचा त्यात मधुन मधुन पार्टनची त्याहुन गर्द हीरवी झाडं फार आल्हाद दायक

दिसतात मधुन मधुन आल्पसच्या हिमाच्छादीत शिखरावरचा चमचमणारा बर्फ हीमालय पुत्रांना खुणावत असतो तेव्हा सर्व सृष्टी कशी उत्साहानी ओसंडुन वाहते आहे असे वाटतं आणि लवकरच आपण जगातल्या नंदनवनात स्वीसझरलंडमध्ये प्रवेश करणार आहोत हे जाणवतं हयाच आल्पसच्या हिम शीखरावर आपले विश्व प्रसिध्द अणु संशोधक श्री होमी एच. भाभा हे चिरनिद्रा घेत आहेत हयाचीही आठवण होते.

लक्स (LAAX) हे स्वीसझरलंडमधील प्रसिध्द टुरिस्ट सेंटर त्यातुनही तेथील चॅलेट हॉटेल हे पर्यटकांचे खास पसंतीचे आवडते ठीकाण आहे. येथे नेहमीच्या सोयी जसे वातानुकुलीत खोल्या प्रत्येक खोलीला अटॅचड, बाथ कीचन त्यात मायक्रोव्हेव कुकींग रेंज पासुन सर्व सुवीधा टी.व्ही. फोन वगैरे तर आहेतच परंतु विषेश म्हणजे एक मोठा स्वीमींग पुल आणि व्यायामा करीता दोन प्रशस्त दालनं आहेत. त्यात व्यायामाची सर्व प्रकारची साधनं त्यांच्या वापरावयाच्या सुचना आणि तुमचे वय उंची, वजन हयांना अनुरूप व्यायाम कोणता आणि कीती घ्यायचा ही माहीती पण तपशीलवर दिली असते. येथे एक स्पोर्ट डॉयरेक्टरची पण नेमणुक केलेली आहे हा लाल बुंद गोरटेला गुटगुटीत धीप्पाड उत्साही डायरेक्टर सर्वाना व्यायामाच्या सुचना देताना पोहोण्याचे प्रकार शिकवताना सर्व पर्यटकांमध्ये उत्साह तजेला अगदी ठास ठासून भरताना दिसतो. त्यांच्या स्पर्धा ठेवून सर्वांना काहीतरी बक्षीस वाटुन त्यांचा उत्साह हवेतही तरंगत ठेवण्याची कीमया करतो पहाटेच्या सहा डीग्री उष्णतामानात लहान मोठे प्रवासी मुल मुली स्त्रीया थंडगार स्वीमींगपुल मधले पोहोताना पाहुन आम्हाला आमच्या उबदार कपडयातुनही घाम फुटला हॉटेलच्या बाजुला राखीव जंगल आहे. तेथे फीरुन वाईल्ड जॉईज ऑफ लीव्हींग ह्या इंग्लीश कवीतेत वर्णन केलेले आनंदी क्षण उपभोगीता येतात.

लक्स पासुन ४० कीलोमीटरवर चुर हे शहर आहे. येथे युरोप मधील सर्व प्रसिध्द डीपार्टमेंटल स्टोअर जसे 1) C and A (2) MIEBROS (3) GLOBES वगैरे आहेत. येथे रेडीमेट कपडे, होजीअरी वगैरे युरोपच्या इतर देशापेक्षा फ्रान्स, इंग्लड, इटाली इत्यादी पेक्षा स्वस्त आहेत स्वीसझरलंड हे जगप्रसिध्द चॉकलेटचे माहेर घर आहे. तर चुरचे वरील स्टोअर हे चॉकलेटचे आगर आहे. चॉकलेटचे इतके विवीध रंगाचे, स्वादाचे, रूचीचे, आकाराचे प्रकार येथे आहेत की ते पाहुन आपल्याकडे ह्या बाबतीत अजुन बरीच वाटचाल व्हायची आहे हे जाणवते. मुलांचे दात चॉकलेटनी लवकर खराब होतात ही आपली समजुत परंतु तिकडचे इतक्या प्रकारचे चॉकलेट व

त्यांच्या रोजच्या खपाचे आकडे ऐकुन इकडच्या हवेत चॉकलेट खाण्याने दात पक्के होत असावे का असा संभ्रम पडतो.

लक्स येथे स्वीस विदुषी भेटल्या बी.अे. झालेली ५० वर्षे वयाची श्रीमंत बाई आपल्या २० वर्षाच्या मुलीबरोबर रहाते दोन वर्षापूर्वी त्या भारतात येवुन गेल्या त्यामुळे भारतीय लोक भारतीय साडया पाहुन त्यांनी गाडी थांबवली आमची वीचारपुस केली व आपल्या घरी येऊन गेल्या तिथे आपली डायरी काढुन त्या आधारे त्यांनी भारत भेटीतील सर्व स्मृतींना उजाळा दिला. तीन दिवस त्यांचा मुकाम मुंबईत होता त्या म्हणाल्या आम्ही गाईडच्या सल्यावरून पंढरपुरला गेलो. तिथे यात्रा चालु होती. ५-५ लाख लोक जमलेले त्यातील जवळ जवळ ७५ टक्के लोक गरीब वाटत होते. पावसाळयात चिखल तुडवत ओले होत होत ४-५०० कीलोमीटर पायी चालुन आलेले हे लोक तिथल्या नदीच्या गढुळ पाण्यात स्नान करून तासन तास देवाच्या दर्शना करीता लाईनीत उभे रहात आणि काही मीनीटातच देवाच दर्शन घेऊन पुन्हा घराकडे पायी निघत. ह्या सर्व लोकांना अशी कोणती मानसीक ओढ, श्रध्दा हयांना इथपर्यंत खेचून आणते. एवढा त्रास सहन करून ते पाच मीनीटांच्या देव दर्शनाकरीता कीती तरी तास तिष्ठत लाईनात उभे रहातात. त्यात भौतीक त्रास अगदी पराकोटीचा परंतु मानसीक आनंद समाधान बहुमुल्य मीळत असावा. या यात्रेचा हा अनुभव फारच अपुर्व आणि शद्बांच्या पलीकडचा आहे. श्रध्दा आणि भक्तीच हे अपुर्व दर्शन चिरकाल स्मरणात राहील. एका संवेदनाशील परदेशी पर्यटकाच्या मनावर झालेला हा आपल्या पंढरपुरच्या यात्रेचा प्रभाव अनोखा आहे.

लॅक्स येथुन लुसर्न हे साधारण २०० कीलोमीटर अंतरावरचे शहर निसर्गानी मुक्तपणे भरभरून शोभेची नुसती उधळण केलेले हे शहर आहे. हीरवेगार पर्वत त्याच्या पायथ्याशी एक सुंदर तलाव. त्यातुन सुशोभीत बोटीतुन जल विहार करायचा. बोटीवर रंगी बेरंगी फुलांची सजावट आणि साथीला आलो सुरातली प्रेमगीत कींवा देवाचे आभार मानणारी भक्तीगीत असतात. आपण सिनेमातलया काल्पनीक विश्वातल्या एखाद्या प्रेम गीताच्या प्रसारणात सामील झालो आहोत असे वाटते. लुसर्न येथे युरोप मधले प्रशास्तपणात तीन नंबरचे प्रॉटेस्टंट चर्च आहे. येथे ५०० वर्षापूर्वी बांधलेला लाकडी पुल कीपल ब्रुक ब्रीज (Keeple BRUKE BRIDEGE) आहे तो चांगल्या सथितीत आहे आणि अजुनही वापरात आहे. त्याचया दोन्ही बाजुला जुने इतिहासाकाळीन लाकडी शोभेचे दीवे आहेत. जुन्या इंग्लीश सिनोमात कींवा हीच

फॉकच्या जुन्या डीटेक्टीव्ह सीनेमात ते कुठे कुठे दिसतात. हा पुल ही जुनी इतिहास कालीन वास्तु म्हणुन कौतुकानी प्रेमानी अभिमानानी त्याची जपणुक केलेली दिसते. शिकाऱ्यांनी सिंहाची शिकार केल्या नंतर तो सिंह कसा दीसतो ह्याचे मॅन्युमेंट ६० फुट रूंदीचया एका दगडावर कोरले आहे. त्याला लॉयन मॅनयुमेंट म्हणतात हे मॅट स्कल्पचर म्हणुन प्रसिद्ध आहे. आपल्याकडे मद्रास जवळ ह्या पेक्षा कीतीतरी मोठे आणि रेखीव असे मॅनयुमेंट आहेत इथेही मोठेमोठे डीपार्टमेंटल स्टोअर आहेत आणि त्यात अर्थातच स्वीस चॉकलेटची चलती आहे.

स्वीझरलंड हा घड्याळ करीता प्रसिद्ध देश ह्या लुसर्न शहरात अलबुकर नावाचे तीन मजली दुकान आहे. इथे १०० वर्षापूर्वीचे मॉडेल्स तसेच अद्ययावत फॅशनी घडयाळ आहेत त्यात टेबल क्लॉक, वाल क्लॉक, रीस्टवॉचेस तसेच नवीन क्वार्टसचे वैगेरे सर्व प्रकार आहेत. येथे पहाताना घडयाळ्यांचा इतिहासच डोळ्यापुढुन सरकतो. जुन्या इंग्लीश सीनेमात पाहीलेली घडयाळ आहेत. तसेच महल सीनेमातील रोल देणार घड्याळ रात्रीच्या निरव शांततेला छेद देणार आणि एकाकीपण वाढवणार हृदयाच्या ठोक्यांनी चुकवणार घडयाळ आहे. तसेच कोटाचया वरच्या खीशातील साखळीचे घडयाळ आहे. ते घडयाळ पाहील्यावर जुन्या जी.आय.पी. रेल्वेच्या निळया सुट आणि ऐटीत कौटी कॅप घातलेला हे खीशातले घडयाळ पाहुन लगेच हीरवा दीवा किंवा झेंडा दाखवणारा गार्ड डोळ्यापुढे उभा राहीला ही जुनी घडयाळ पाहुन जुन्या स्मृती चालावल्या.

हा स्वीस देश जेथे सर्व देशातुन पर्यटक येतात. तसेच युनोची कार्यालय येथे आहेत त्या तुनही निरनिराळ्या देशाचे लोक तेथे आहेत. त्यामुळे इंग्लीश भाषेची अडचण फ्रान्स, इटलीत जाणवते. तशी ती येथे जाणवत नाही. हा साधारण १५० मैल लांब व ७५ मैल रूंदीचा आणि ७५ लाख लोकवस्तीचा देश आहे. त्यांचे ६० ते ७० टक्के उत्पन्न टुरीझमवरच आहे. निसर्गानी जसे सौदर्य व सुखद हवामान दीलयं तसेच स्त्रीयांना रेखीवपणा व सौदर्याची अगदी खैरात केली आहे. रस्त्यानी जाताना भेटलेले विद्यार्थी, विद्ययार्थीनी किंवा इतर नागरीक "वेलकम टु स्वीस" म्हणतात तेव्हा त्यांची भारदस्त शालीनता आणि खानदानी आतीश्यशीलता मनाला सुखवुन जाते. रस्त्यानी जाताना कार आडवी आली तर कारचालक गाडी थांबवुन पादचाऱ्यांना आधी जाऊ देतात. हा अनुभव नवीन होता. एका रोड सिग्नलच्या चौकात रात्री ११ वाजता सर्व रस्ते जवळ जवळ मोकळे होते. वाहन नव्हते तरी सुद्धा लाल दीवा पाहुन एक ट्रक व एक कार स्वस्त

उभे राहुन हीरव्या दीव्याची वाट पाहात उभे होते. ही शिस्तप्रीयता आपल्याला फारच आगळी वेगळी वाटते.

ह्या लहानशा देशात समृद्धी तसेच श्रीमंती खुपच आहे. आपल्याकडच्या एक लाख लोक संख्येत जेवढे लक्षाधीश मिळतील त्याच्या जवळ जवळ १०० पट जास्त लक्षाधिश इथे एक लाख लोकवस्तीत मीळतील असे श्रीमंतीचे मोजमाप हे सांगतात.

लुसर्न वरून झुरीच तेथुन पश्चिम जर्मनीत प्रवेश केला. हाईन नदी ह्या दोन्ही देशांना सांधणारी पाण्याला खुपच ओढ असलेली नदी त्यावर एक मध्यम उंचीचा धबधबा आहे. दोन्ही देशांनी बांधुन काढलेल व सौदर्याच्या वेगवेगळ्या युक्तया दोन्ही बाजुला वापरलेल्या आहेत. स्वच्छ खळाळते फेसाळ पाणी पाहाण्यात वेळ कसा जातो ते कळतच नाही.

जर्मनीत टिटीसी (TITISEE) हे दोन्ही देशांच्या सीमेवरचे लहानसे गाव हे प्रसिद्ध जर्मन कक्कुक्लॉकसचे माहेरघर आहे. लहान लहान दुकानात ह्या धडयाळांचे अनेक प्रकार पहावयास मीळतात. येथे स्वीस फ्रँक, इटालीच्या लीरा किंवा जर्मनीच्या मार्कह्याही चलनात वस्तु मीळतात. त्या वेगळ्या विनीमय दराप्रमाणे विक्रेत्यांची आर्जवी गोड भाषा आणि कक्कु घडयाळांच्या मंजुळ गुंजनाने ही दुकान अगदी भरून गेलेली असतात.

जर्मनीतल्या कालोन शहरात जाणारा हा रस्ता पाईन वृक्षांच्या दाट जंगलातुन जातो उंचच उंच दाट झाडातुन सुर्यकीरण ही येत नाही. त्यामुळे ह्या जंगलाला ब्लॅक फॉरेस (BLACK FOREST) म्हणतात. लहान लहान रस्ते त्याला अरूंद वळणं असा हा रस्ता आपल्या कडच्या दाट जंगलातील असल्या सारखाच वाटतो. नाल्यातील खडकही राखी किंवा पांढऱ्या रंगाचे आहेत. लहान लहान धबधबे, नाल्याचे पांढरे स्वच्छ चमकणारे पाणी, टेकड्यावर दाट हीरवे जंगल अशी ही मनोहर वनराई आहे. येथे जर्मनी मध्ये उघडयावर व्यायाम करण्याची फार आवड दीसते. तसेच व्यायामाला वेळेचे ही बंधन नसावे. दुपारी दोन वाजताही बगीच्यात लोक व्यायाम करताना, जॉगींग वैगेरे करताना दीसतात. सायकलींग हा इथला जास्त आवडता व्यायाम. आपल्या कारच्या टपावर तीन सायकली (एक जेन्टस एक लेडीज व एक छोटी) उभ्या लावुन गावाबाहेर ८-१० कीलोमीटर जातानाची उदाहरणं नेहमीच दीसतात. गावाबाहेर गेल्यावर सायकली वरून

८-१० कीलोमीटर सर्व कुटुंबानी रपेट करायची व नंतर परत कारनी घरी जायचे हा इथला आवडता छंद दीसतो. स्थुल स्त्रीयाचे प्रमाण जास्त दिसते स्थुलपणा मुळे येणारे पायातले दोष, गुडघे दुखणे त्यामुळे लंगडत चालणे ही उदाहरण आपल्या सारखीच तिकडे विषेश करून जर्मनीत जास्त दीसतात. एक KG-I वैगेरेची शाळा होती. तीच्याजवळच बगीच्या होता. त्या बगीच्यात आम्ही बसलो होतो. जवळ २-३ वयस्क पुरूष व ४-५ स्त्रीया बसल्या होत्या त्या बाल शाळेतल्या आपल्या नाती, नातवांना नेण्याकरीता जमलेले त्याची वाट पहात थांबलेले हो आजी आजोबा. नवीन मुली कीती अवास्तव अनावश्यक उत्साह दाखवतात कोणत्या विषयाच खोल ज्ञान नको, अर्धवट पणातुन प्रसिद्धी पाहीजे हेत्यांच्यातले चर्चेचे विषय होते (हे अर्थात दुभाषा गाईड कडून कळले) त्यावरून जनरेशन गॅपचा प्रश्न इथेही आहे हे दीसले. प्रगत, अप्रगत देश असो, भौगोलीक अंतर कीतीही असो, हवामान, रहाणीमानात कीतीही फरक असो मनुष्य स्वभाव सर्व दुर कीती सारखा आहे हे पाहून गंमत वाटली.

ऱ्हाईन नदीतुन ३ तास बोटीनी प्रवास केला. ही क्रुझ शीप मोठी दोन मजली व जवळजवळ २०० प्रवासी बसतं इतकी मोठी होती. ह्या नदीतुन प्रवास करताना नदीच्या दोन्ही काठावरील कील्ले व महाल ह्यांचे दर्शन होते. हे १६-१७ व्या शतकातले कील्ले बहूतेक अर्धवट पडलेले आपल्या जुन्या वैभवाचा थोडाही मागमुस नसलेले अशा स्थीतीत आहेत. त्या तुलनेनी त्याच काळात आपल्याकडे बांधलेले कील्ले पुष्कळ चांगल्या स्थितीत आहेत.

कोलोन हे जर्मनीतील उत्तरेला असलेले शहर आहे. युरोपमधील प्रोटेस्टंट पंथाचा प्रसार इकडे चांगला झाला. येथे ह्या पंथाचे सर्वात प्रशस्त चर्च आहे. याच पंथाचे प्रशस्ति पणात २ नंबरचे चर्च स्वीस मध्ये लुसर्न येथे आहे. कोलोन येथील चर्च सभावेती मोकळी जागा जास्त नाही आणि आजुबाजुला खुप उंच बील्डींग झाल्या आहेत. ज्यात प्रसिद्ध डोरिट हॉटेल आहे. त्यामुळे चर्चची इमारत दुरून दिसत नाही तसेच बाहेरून चर्च इतके प्रशस्त असेल असे वाटत नाही. तेथील वर्तमानपत्रात साध्या सामाजीक फील्म कोणत्या टॉकीझ मध्ये आहेत व सेक्स फील्म कुठे आहेत ह्याची ठळक जाहीरात असते तसेच T.V. वर साध्या टेलीफील्म दाखवतात. परंतु कोलोन येथे चौथ्या चॅनेलवर सेक्स फील्मचे वितरण चालु होते. गाईड करून कळलं की चौथी चॅनल रोजच ह्या सेक्स फील्म साठीच असते. इतर देशापेक्षा जर्मनी ह्याही बाबतीत इतका पुढे गेलेला

आहे आणि जर्मनीच्या सर्वांगीण प्रगतीच्या मापदंडात सेक्स फील्महो अंतर्भुत झालेल्या दीसतात. आपल्याकडे स्टार किंवा झी टी.व्ही. ह्या फील्मचे लोण इकडेही आले तर काय होईल ह्याची कल्पनाही करवत नाही. कोलोन ते हॉलंडमधील ॲमस्टरडॅम हा बसचा पाचतासांचा प्रवास होतो सर्व दुर हीरवी पालवी आणि पशु खाद्याची शेती. त्यात मधुन मधुन पवन चक्या आणि त्यावर चालणारे पंप दीसतात. वाऱ्यापासुन पंप चालवणारे आणि विपुल पवन चक्याचा वापर करणारा जगातला पहीला नंबरचा हा देश आहे. डेअरी, दुध व दुधाचे पदार्थ ह्या करीता हा देश प्रसिद्ध आहे. १५-१६ लीटर दुध गाईच्या आचळामध्ये असते. त्या गाईला चालता देखील येत नाही इतकंदुध गाई आचळात असते. युरोप मधल्या सर्व देशामध्ये सर्वात दाट लोकवस्तीचा हा देश आहे. त्याची मुळ भाषा डच परंतु ही भाषा फार कीचकट बोजड आणि समजायला अवघड आहे. या करीता ती भाषा सोडुन फ्रेंच किंवा इंग्लीश भाषा येथील लोक आपल्या मुलांना शीकवतात. नवीन पीढीला मातृभाषा सोडुन इतर भाषा शिकवण्यातच जास्त रस घेतात. मातृभाषा ही कीचकट समजुन तिला आपणहुन अंतर देणारे हे जगावेगळे लोक जास्त व्यवहारी समजायचे की मातृभाषा भक्तीशुन्य समजायचे हा प्रश्नच आहे. चौदा मातृभाषाच्या वादात आपण आपली राष्ट्रभाष ठरवु शकत नाही ह्या पार्श्वभुमीवर हा येथील जगा दे[illegible]ा व्यवहारीपणा अजोडच म्हणायचा.

येथे हीऱ्यांचा व्यापार फार चालतो. जागतील बोटावर मोजण्याइतक्या हिऱ्यांचया व्यापारी देशात ह्या देशाचावरचा क्रमांक लागतो. तिथली कॉस्टर डायमंड फॅक्टरी ही अद्यावत फॅक्टरी पाहीली. हीऱ्याची वर्गवारी करण, त्यांना पैलु पाडण, रंग देण पॉलीश करण इत्यादी सर्व काम लहान लहान यंत्राच्या सहाय्याने सफाईदार पणे करतात. त्यात पीवळा, हीरवा जांभळा इत्यादी रंग देण सोपे असते परंतु निळा रंग देण महाकठीण काम आहे. असे कळले निलमणी आपल्या कडे शुभ अशुभाच्या वादात तो अंगावर धारण करणाऱ्याच्याही मनात वादळ निर्माण करतो. मनात चलबीचल करतो तसा हा निळा हीरा आपल्या जन्मापासुनच कारागीर आणि यंत्रानाही आपल असाधारण व्यक्तीमत्व दाखवितो. हे पाहुन कर्तुत्ववान माणस आपल्या जन्मापासुनच आपल असाधारण वेगळेपण दाखवितात अस दिसत. साधारण २ कॅरेटचा हिरा ८८ डॉलरला म्हणजे त्या वेळच्या विनीमयदराप्रमाणे १६७२ रूपयाचा होता तर सर्वात महाग २००० पौंड म्हणजे ६०,००० रूपयांचा होता.

येथील लाकडी जोडयाचे उत्पादन हे युरोपच्या सर्व देशापेक्षा ह्या देशाचे वेगळेपण आहे हे गरीबांच लेण त्यांच्या पायाचे बर्फापासुन रक्षण करणारं अनोखा वाण आहे. लाकडाच्या ओंड़क्यातुन लहान लहान लोथ व ड्रील वैगेरे मशीननी ह्या नरम लाकडाचे जोडे (SHOE) बनवीतात. हे जोडे बर्फआणि त्याच्या सानिध्यातल्या शुन्य तापमानातल्या थंडीपासुन पायाचे रक्षण करतात. इकडील गरीब व मध्यम वर्गीयांच्या पायांची ही कवच कुंडलेच आहेत. ह्या जोडयांचे आयुष्यही साधारण १ वर्षाचे असते. त्यामुळे नवींन वर्ष नवीन बर्फआणि त्याच्या स्वागताला नवीन जोडे असे हे प्रमाण दीसते.

येथील विमानतळ हा जगातला अजोड वीमानतळ आहे. तो समूद्र सपाटीपेक्षा चार मीटर खोलात आहे. ह्या वीमान तळवर जाताना रसत्यावर मधल्या एका उथळ खाडीवर एक लाकडी पुल आहे. हा पुल ५० वर्ष जुना असल्याचे सांगतात. ह्या पुलाचे वैषीष्ट म्हणजे हा पुल मॅन्युअली ऑपरेटेड आहे. दोन मंजुर एक हॅंडल हातानी फीरवुन हा पुल वर करतात. छोट्या छोट्या, नावा यातुन इकडन तिकडे जातात आणि नंतर पुन्हा पुलखाली करून रस्त्यावरील वाहनांची वाहतुक चालु होते

येथील पवनचक्की वींड मील ही जगातील एक मानवानी निसर्ग शाक्तीला आवहान देऊन त्याच्या कडुन आपल काम सुरळीत करून घेण्याचे एक दुर्मिळ उदाहरण आहे. ह्या पवन चक्या इकडच्या शेतात नेहमी कार्यरत आसलेल्या दीसतात. वाऱ्याची दीशा पाहुन त्याकडे पाठ न फीरवता त्याला हीमतीनी समोरं जाण्याची ही दिव्य कल्पना आहे. वाऱ्याची शक्ती ही अशी अहर्निश बिन तक्रार काम करताना पाहुन ह्या संप ताळेबंदी, पगार वाढीच्या दिवसातली ही निरळस निष्काम सेवा मनाला दुर्मीळ आनंद देते.

येथे मडुरो डॅम (MADURODAM) नावानी हॉलंडस फेरीटेल सिटी इन मिनी अचर असे वर्णन असलेली एक छोटी स्वप्न नगरी बसवली आहे. एका मोठया पटांगणात ॲमस्टर डॅम शहरातील बील्डींग त्यांच्या त्यांच्या रंगात, आकारात आणि प्रमाणात बांधल्या आहेत. तसेच रस्ते, विमानतळ, लोकल बोटी इत्यादी सर्व आहेत. त्यात विमानतळाच्या धावपट्टीवर विमान उड्डाण करण्याकरीता पळताना दिसते लहान बोटी आपले सायरन वाजवुन प्रवाशांना खुणावीत धावताना दीसतात. लोकल तर अव्याहतन थकता धावत असते. रस्त्यावर छोटी छोटी वाहन चौका चौकातले वाहतुक संकेत सांभाळत

चहल पहल करताना दिसतात. चर्चवरील रोषणाई घराघरातील उघडझापीचे दीवे हे सर्व गतीमान संकेत त्या शांत स्थीर स्वप्न नगरीला वेगळाच स्वप्नील आयाम देतात.

येथे एक आपल्या भारतीयाचे प्रशस्त आणि प्रसिद्ध हॉटेल आहे. मयुर हॉटेल त्याच नाव हॉटेलचे नाव सार्थ करण्याकरिता तेथे काऊंटरच्या वर एक सुंदर पीसारा फुललेला काळे ढग पाहुन थुई थुई नाचणाऱ्या मोराचे ४' x ६' फुटाचे चित्र लावले आहे. एका बाजुला भारतीयांशी जवळीक सांधणारी एक लहान पाटी आहे. "हॉटेल शेरे पंजाब" ती पाटी पाहुन खरच भारतीय आपुलकी जागृत झाली व पंजाबी बंधुचे कौतुक वाटले. जेवण तर उत्तमच भारतीय पद्धतीचे होते मेनुही अस्सल भारतीय होता.

त्यांनाही पंजाबी व हींदीतुन मोकळे पणानी बोलण्यात आनंद होत होता. जगजीत सींगला खुपच आनंद झाला होता साडी आणि पंजाबी पोषाख पाहुन त्यांच्या जुन्या स्मृती उचुंबळुन आल्या होत्या. भारतीय स्त्री साडी, कुंकु, केशरचना बांगडया हयामुळे युरोपमध्ये वेगळी उठुन दीसायची परंतु आता पोषाख व केशरचना पेहराव हा सर्व युरोपीयन स्त्री आणि भारतीय स्त्रीचा सारखाच होत आहे. बांगडयांनी सुट्टी घेतली कुंकुमॅचींग रंगाच ह्या सर्व बदलाबद्दल त्यांना खंत वाटत होती पूर्वी ४ थ्या आणि ५ व्या दशकात १९३० ते १९५० चे दरम्यान ९ वारी पातळ व ५ वारी साडी बद्दल कीती वाद झाला होता. त्या मानानी आताचे पोषाखातील हे बदल फारच शिघ्र आणि सरल झाले. हा येत्या पीढीचा प्रगल्भपणा म्हणायचा की सुट सुटीत आणि व्यवहारी दृष्टीकोण हा त्यांच्या समोरील प्रश्न होता. परदेशात ॲमस्टरडॅमला राहुन जगजीत सीगाना भारतीय रीतील-रीवाजाबद्दल फारच ओढ होती. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतुन समजल की पॅरीस, रोम, कोलोन इत्यादी युरोप मधील प्रमुख ठीकाणी भारतीयांची मोठी हॅाटेल आहेत आणि आमचे एकमेकांशी चांगले संबंध व संपर्कआहेत. परस्परांना आम्ही मदतही करत असतो. हॉलंड हा युरोप मधील सर्वात दाट वस्तीचा देश आहे. तरी पण येथे व्हीसा मीळणे सोपे आहे. भारतीया बद्दल येथील लोकांचा व सरकारचाही सहकार्याचा दृष्टीकोन आहे. भारतीयांना येथे येवुन स्थायीक होण्यास विषेश अडचण येत नाही उलट उत्तेजनच मीळते कोणी भारतीय इकडे स्थायीक होण्यास येत असल्यास मी त्यांन मदत करण्यास उत्सुक आहे. परदेशी स्थायीक झालेल्या [illegible] भारतीयांची आपल्या मातृभुमीशी असलेली भावनीक जवळीक येथे जाणवली ही ओढ त्यांच्या पुढच्या पीढीत कीतपत राहते हा प्रश्नच आहे.

ॲमेस्टर डॅम ते रॉटर डॅम (हुक ऑफ हॉलंड) ह्या हॉलंडच्या बंदराकडचा बस चा प्रवास साधारण दोन तासांचा होतो. येथुन प्रवासी बोटीने इंग्लंडला जायचे होते. ही प्रवासीबोट बारा मजल्यांची (डेक) खालच्या दोन मजल्यात कार्गो सामान तीसऱ्या मजल्यावर बस, कार आणि इतर वाहन चौथ्या पाचच्या आणि सहाव्या मजल्यावर प्रवाशा करीता केबीन सातव्या आणि आठव्या मजल्यावर प्रशस्त कॅन्टीन, सिनेमा हॉल व एक कॅबरे डान्स हॉल आहे. नवव्या व दहाव्या मजल्यावर काही केबीन प्रवाशांच्या व बोटीच्या कॅप्टन व इतर अधिकाऱ्यांच्या आहेत. अकराव्या मजल्यावर बोटीची मशीनरी व सभोवार गॅलरी आहे आणि बारावा मजला म्हणजे पुर्ण डेक येथुन सर्व दुर समुद्र आणि नजर जाईल तिथपर्यंत पाणीच पाणी वारा तर खुप जोराचा आणि थंडगार येथे बोटीचे डोलणं, हेलकावे चांगलेच जाणवतात. त्यामुळे डेकवर सुट उथे राहाणेही फार कठीण पाया खालची वाळु सरकत नाही तर पाया खालचे पाणी दहा फॅदम (मैल) वेगाने सरकत असते. वर आभ्राच्छादित आकाश व थंडगार वारा अशा स्थीतीत चार महाभुतांच्या (पृथ्वी, पाणी, वायु, आकाश) सानिध्यात बाजुच्या रेलींगच्या आधाराशीवाय डेकवर उभे राहाणे जवळ जवळ अशक्यच कारण हयांच्या जोडीला बोटीचे डोलणेही असतेच. रात्री युरोपटाईम प्रमाणे साडे दहा वाजता बोट निघाली आणि इंग्लडच्या हुल (HULL) ह्या बंदरावर इंग्लडच्या वेळेप्रमाणे सकाळी साडे सहा वाजता पोहोचली रात्री सीनेमा हॉल मध्ये इंग्लीश व फ्रेंच सीनेमे दाखवत होते. कॅबरे हॉल मध्ये संगीत, नाच आणि दारू ह्यांना उधाण आल होत. वाद्यांचे घणाघाती आवाज आणि गायकांची अगदी पोटतिडकेनी काढलेल्या ताना ह्या मध्ये कोण श्रेष्ठ ही जणु स्पर्धाच चालु होती. बाकी गायकाच्या चेहऱ्यावरून व त्यानी काढलेल्या चिरत्या तानावरून खरंच त्याच्या पोटात तिडीक निघाली असावी हयाची खात्री पटायची. ह्या सर्व कोलाहलात आम्हाला तेथे सुर सापडणे अशक्यच होते स्टेजच्या बाजुच्या एका कोचावर एक त्यातलीच सुंदर गायीका अश्रु ढाळत तिथल्या सर्व उत्साही कोलाहलात आपल्या पुरता रंगाचा बेरंग करीत बसली होती ती त्या बोटीवरची प्रसिद्ध मुख्य गायीका आपल्या जुन्या उभरत्या संगीत विश्वाची, मैफलींची आपल्या संगीत सम्राज्ञीच्या स्मृती चाळवत बसली होती कारण नुकतेच कॅन्सरच्या गाठीकरीता तिची छाती डॉक्टरनी सपाट केली होती.

एका बाजुला कॅसीनो आणि इतर तशाच प्रकारचे खेळ चालु होते. त्या खेळणाऱ्यात द्युतात सर्वस्व धरणाऱ्या पांडवांच्या जिद्दीने खेळणारे ही होते. तसेच

हरल्या बद्दलचे उसासे टाकणारे, खिशातले सर्व संपल्याने अवसानघात झालेले विषण्ण स्थितीतले लोक आणि नवीन प्रचलीत समाज व्यवस्थेत आपली पत्नी पणास लावु न शकल्याने अगतिक झालेले सगळ्या समाज व्यवस्थेला व आपल्या धोकादायक नशीबाला शिव्या देणारे भकास चेहऱ्याचे लोक दिसत होते.

केबीन मध्ये बोटीचे डोलणे जाणवत नव्हते तिच्या इंजीनचाही आवाज येत नव्हता शांत सागरा वरच तिचं निःशद्ब सरकणे तेव्हढं जाणवत होत. सगळ्या दुनियेपासुन दुर प्रशांत सागरात आपले आपले विचार आणि विकार हयांची जपणुक करीत ते एक छोटं विश्व रात्रीच्या निरव शांततेत संथपणे पाण्यावर धावत होत. सकाळी त्या पाण्यावर तरंगणाऱ्या बोटीतच चहा नास्ता झाला व इंग्लंडच्या वेळेप्रमाणे साडेसहाला बोटीने इंग्लडच्या हूल (HULL) ह्या बंदरात नांगर टाकला.

तपासणीचे सोपस्कार झाले आणि बस रस्त्यांनी लंडनच्या हितरो विमानतळाकडे झेपावली. इथे वाहतुकीचे नियम बदलले व सर्व वाहन मुकाट्याने रस्त्याच्या डाव्या बाजुनी प्रयाण करते झाले ह्या प्रगत देशातही आपल्या कडच्या सारखा ट्रॉफीक जॅमचा प्रकार आढळला रस्त्यावर सर्व तऱ्हेची वाहन होती आणि ती जिद्दीनी इंच इंच सरकुन्ह्या आवेशात लंडनकडे हळु हळु सरकत होती. शेवटी दुपारी दोन वाजता हीतरो विमानतळ गाठला आणि बसच्या सव्वासहापुट उंच आणि चार फुट रूंद ड्राईव्हरने आपली टोपी जमीनीवर आपटुन आनंद आणि वैताग दोन्ही प्रदर्शीत केला.

लंडनचा हितरो विमानतळ हा फार बीझी विमान तळ आहे. येथुन दर पाच मिनीटाला एक विमान उडते किंवा उतरचे जागोजाग एका पोलवर चार दीशांना एक एक फोन लावुन सार्वजनीक टेलीफोन बुथ तयार केले आहेत. नाणे टाकुन लगेच फोन करायचे इतकया जवळ जवळ फोन असुनही बोलणाऱ्याना एकमेकांच्या बोलण्याचा त्रास होत नाही कारण अगदी हळु बोलुन ही परदेशात बोलण होवु शकत. विमान तळाच्या परीसरात स्टेनलेस स्टीलचे सुंदर आकाराचे चकचकीत झाकणाचे ड्रूम उभे होते. त्याच्या खालच्या बाजूची क्लीट पायानी दाबाली की वरचे झाकण उघडते. आत कागद कचरा टाकायचा की पुन्हा झाकण बंद असा सर्व कचरा पोटात साठवणारे आणि सभोवतालचा परीसर स्वच्छ ठेवणारे हे चकचकीत ड्रूम म्हणजे तिथल्या स्वच्छतेचे आधार स्तंभच विमान तळावरच्या कॅन्टीन मध्ये थंडगार दुध दोनशे मीली लीटर पन्नास

सेंटला म्हणजे त्या वेळच्या वीनीमय दरानी तेरा रूपयेला मीळाले आणि वर पुरेशा कडवटचेहऱ्यांनी वी नेव्हर सर्व्ह हॉट मिल्क ही मुक्ताफळ ऐकायला मिळाली.

एअर इंडीयाचे विमान लंडनहुन मुंबई करीता रात्री साडे आठला सुटणार होते. संध्याकाळी साडेसहा पासुन सिक्युरीटी चेकींग लगेज एक्सरे वैगेरे करणार होते.

संध्याकाळी साडेपाचला एक लालपाटी झळकली की विमान सीक्युरीटी च्या दृष्टीने एका प्रवाशाला आपल्या सोबत फक्त एकच हॅड बॅग किंवा पर्स नेता येईल. पाटी पाहून बहुतेकांची धावपळ झाली कारण तयांच्या जवळ पर्स शिवाय जास्तीच्या दोन दोन हॅन्ड बॅग होत्या आणि सुटकेस गच्च भरलेलया काही सामान एकात केल. काहीच एक मेकांना देवाण घेवाण केल फळांना वैगेरे तीथेच न्यायदीला आणि विमानात जाण्यासाठी सर्व तयार झाले.

पासपोर्ट व्हीसा तपासणी सामान एक्सरे चेकींग विमान तीकीट तपासणी मेटल डीटेक्टर ची टेहळणी झाली. विमानाच्या हवाई सुंदरीचे स्वागत स्विकारीत विमानात आपल्या सीटवर स्थानापन्न झालो "फासन योर बेल्ट प्लीज" हे ब्रीटीश उच्चारातले शेवटचे वाक्य ऐकले आणि विमानानी ब्रीटीश भुमी सोडली संकटकाळीन लॅन्डींगच्या सुचनांची उजळणी झाली आणि विमान ताशी ९३० कीलोमीटर वेगानी ३७००० फुट उंचीवरून भारताकडे झेपावले.

मनाचा वेग त्याहुनही जास्त होता मनानी आम्ही भारतात तेव्हाच पोहोचलो होतो मातृभुमीची ओढ आणि तिही काही दीवसांच्या गैरहजेरीनंतर कीती तीव्र आणि सुखद असते हे तेव्हा प्रकर्षानी जाणवले हवेत तरंगत असतानाच रात्री दीड वाजेपर्यंत एक इंग्लीश व एक हींदी सीनेमा पाहीला सकाळी चहा नास्ता झाला आणि भारतीय वेळेनुसार ९-१५ च्या सुमारास आपल राजाभाईटॉवर आणि इतर ओळखीच्या बिल्डींग ठळकपणे दिसु लागलया आपली स्वच्छ मुंबई ही विमानातुन खरच सुंदर दीसत होती. सकाळी ९-३० वाजता. विमान सहारविमानतळावर उतरलं पासपोर्ट व्हीसा वैगेरे तपासणी नंतर सातव्या बेल्टवर सामान मीळाले. लॅन्डींग स्लीपच्या जाहीर नाम्यावर ग्रीन चॅनेलमधुन वाट मीळाली.

विमान तळाबाहेर आल्यावर आपल्या देशात आल्याच्या आनंदानी मन उचंबळुन आले. प्रगत देशांचे सामाजीक प्रश्नही जास्तच अवघड व तितकेच विचित्र, त्यातुनही व्यक्ती स्वातंत्र्याच्या अतिरेकी कल्पनांनी ते प्रश्न जास्तच जटिल झाले आहेत. आपल्याकडे आपली कुटुंब संस्था अजुनही पुष्कळशी अबाधित आहे आणि त्यामुळे तिकडचे पराकोटीचे जटील प्रश्न इकडे नाहीत. आपला हा संत महात्म्यांचा देश दुरीतांचे, तीमीर जावो आणि जो जे वांच्छील तो ते लाहो ही आपली प्रार्थना, पाप पुण्य आणि पुनर्जन्म ह्या संकल्पनांना बांधीलकी असलेला सर्वाप्रती सहीष्णुतेचा आदर्श जपणारा आणि कर्मण्ये वाधीकारस्ते ही शिकवण रोमरोमात भीनलेला असा आपला देश येथे आल्यावरचे पहीले रोमांचित अभीमानाचे व आनंददायी क्षण विसरण शक्यच नाही.

●

# अमेरीकेतील नवलाई

सकाळचे ७-१५ वाजले होते. विमानाचा घुSS असा आवाज कानात घुमत होता. कुवेत एअर वेजच्या विमानातून खिडकी जवळच्या सिट वरून मी बाहेर पहात होतो. सर्व दूर पांढरे ढग आपण खालून आकाशाकडे पाहताना जसे ढगा मधून मध्येच निळे आकाश दिसते, तसे एखाद्या अवखळ छोट्या ढगाच्या बाजूने मध्येच खालच्या जमीनीचे दर्शन होत होते. हवाई सुंदरीने नुकतेच सिट बेल्टचे प्रात्यक्षिक दाखविले होते. विमानाच्या संकट कालीन खिडक्यांच्या जागा त्या उघडण्याची रीत वगैरे माहिती सांगितली, हेडफोन वाटप झाले. समोरच्या पडद्यावर विमान उड्डाणाची माहिती सरकत होती. विमान जमीनी पासून ३८४४० फुटावरून उडत होते वेग ताशी ९६० कि.मी. आणि खाली मुंबई २०० कि.मी. दूर झाली होती. आणि दर मिनीटाला ती आणखीनच दूर दूर जात होती. हेडफोन वरूनच्या गाण्यात रस वाटत नव्हता. कारण मागच्या महिन्यातल्या आठवणीची उजळणी मनात होत होती.

अमेरीकेला जाण्याचे ठरले. पासपोर्ट तयारच होता. व्हीसासाठी अमेरीकेच्या वकालतीत खेपा सुरु झाल्या. फोटो ठीक नाहीत, आम्ही सांगतो त्या स्टुडिओत फोटो काढा. शेवटी त्या दिंडी दरवाजातून आत गेलो. तेथे (मेटल डिटेक्टर) धातु संशोधका कडून तपासणी झाली. आत गेल्यावर भारतीय वीज बंद झाली. वकालतीतील अधिकाऱ्यांनी सुट्टीच्या मूडमध्ये येऊन उद्या येण्यास फर्मीविले. तिसऱ्या दिवशी काऊंटर पर्यंत पोहोचलो. आंत अगदी चांदीच्या रंगाच्या पांढरी शूभ्र केसाची तरुणी पांढऱ्याच रंगाच्या फ्रॉकमध्ये बसलेली. भुवयासुध्दा पांढऱ्या स्वच्छ. एखादा म्हातारा योगी बसला आहे असे वाटले. "व्हॉट्स युवर नेम" खिडकी पलीकडून खर्जातल्या आवाजात प्रश्न खिडकीचे कांच छेदीत बाहेर आला. आणखीही काही प्रश्नोत्तरे झाली. युरोपमध्ये कोणचा देश आवडला हा भसाड्या आवाजातला रसीक प्रश्न? आणि शेवटी युरोपच्या कोणत्याही देशापेक्षा अमेरीका तुम्हाला जास्त आवडेल ह्या आशावादाने तीन दिवसांची पायपीट फलद्रुप झाली. व व्हीसा मिळून अमेरीकेची पहली एन्ट्री पक्की झाली.

आमचा प्रवास सुरु झाला. समोरच्या पडद्यावर कुवेत २६० कि.मी. आहे व आपण १५-२० मिनीटातच कुवेतला उतरु असे जाहिर झाले. व पाहता पाहता विमान ढगाच्या खाली झेपावले. उंची ८००-१००० फुट झाली. तेथे २-३ तेल विहीरी

जळताना दिसल्या. आता इराक बरोबरचे युध्द थांबून ७-८ महिने झाले होते. तरी असे हजारो लीटर तेल दर क्षणाला जळत होते. जीत आणि जेते ह्यांच्या संघर्षाला इतिहास साक्षी आहे. जेते लोकांनी जिंकलेल्या मुलखातुन धन दौलत लुटून नेणे हा तर त्यांच्या विजयाच्या धुंदीचा-कैफाचा आविष्कार, यांच्या विजयोत्सवाचे एक प्रतिक. ह्याला इतिहासात तैमुरलंग, चंगीझखान, महंमद गजनीच्या स्वाऱ्या साक्ष आहेत. परंतु युध्दात माघार घेताना त्या मुलखाचा सर्वनाश करीत करीत माघार घ्यायची हा रिवाज नवा होता. मागच्या युध्दात दोस्त फौजाना माघार घ्यावी लागली. अनेक आघाड्यांवर त्याला गोंडस नांव यशस्वी माघार असे दिले. ह्याही वेळी सर्वनाश करत माघार घ्यायचा पायंडा त्यांनी पाडला. इराकनीही कुवेत मधून माघार घेताना सर्व तेल विहीरींना आग लावून नंतरच तेथून पलायन केले. पृथ्वीवरील मानवाच्या सेवेत पुढील किती तरी वर्षे पुरेल इतक्या खनीज तेलाचा नाश होताना पाहून मन खिन्न झाले. आमच्या शेजारी दोघे केरळी भारतीय बसले होते. ते कुवेतला उतरणार म्हणून विमान कंपनीने त्यांना दोन फॉर्म भरण्यास दिले. त्यांना इंग्लीश किंवा हिंदी सुध्दा येत नव्हते. शेवटी खाणाखुणा करून ते फॉर्म भरून दिले. एका मच्छीमार कंपनीच्या केरळी मॅनेजरने त्यांना तेथे नोकरी दिली होती व ते पहिल्यांदाच तेथे जात होते. त्यांच्या हिमतीचे कौतुक वाटले. कुवेत मुंबईच्या जवळ जवळ २ तास मागे आहे. तिथे कुवेत टाईम प्रमाणे सकाळचे ८-१५ वाजले होते. तेथे १ एक तास थांबून पुढच्या विमानाने कुवेत न्युयॉर्कप्रवास सुरु झाला. लंडनच्या हितरो विमानतळावर एक तास मुक्काम झाला. ह्या विमानतळावर येण्याची ही तिसरी वेळ होती. कारण युरोप ट्रिपच्या वेळी ह्या विमान तळावर दोनदा आलो होतो. त्यामुळे विमानतळ ओळखीचा वाटत होता. ड्युटी फ्री स्टोअर मधल्या भारतीयांनी हिंदीतून स्वागत केले. विमानतळावरील गर्दीत तो भारतीय एकदम जवळचा वाटला.

विमान न्युयॉर्कक्डे झेपावले. खाली अटलांटिक महासागराचे अथांग पाणी व वर आकाश माणयाला भयभीत करणार, त्याचे कुतुहल वाढविणार आणि काही महाभागांना आकाशाला गवसणी घालण्याची जिद्द निर्माण करणार त्यातल्या चंद्र ताऱ्यांच्या सहवासात सुखावणार, उगवत्या सूर्याच्या साक्षीने "होंगे कामयाब हम एक दिन" अशी जिद्द माणसाच्या मनांत निर्माण करणार आणि मावळत्या सूर्याच्या संध्याछायांनी भयभीत होणार, व्यथीत होणार माणसाचं मन. त्या अथांग सागराच्या दर्शनाने उचंबळून आलं होतं.

आकाशातून विमान चाललं होतं. एक छोटेसे विश्व ज्यात विविध जाती धर्मांचे, देशाचे लोक होते. आपले विचार आचार, सुखाच्या कल्पना, विकार, आपल्या सुखदुःखाचा ठेवा नको असलेल्या दुःखद स्मृती जतन करीत निघालेले.

संध्याकाळी ७ १/२ वाजता विमान न्युयॉर्कच्या केनेडी विमानतळावर उतरले. त्यावेळी मुंबईत दुसऱ्यादिवशीचे सकाळचे ६ वाजले असणार? हा विमानतळ जगातला सर्वात मोठा! दर दोन मिनीटानी एक विमान अतरते किंवा उड्डाण करते असा दावा सांगणारं हे विमानतळ! येथे निरनिराळ्या लोकांच्या नावाच्या पाट्या घेऊन स्वागता करीता लोक उभे होते. आखाती देशाच्या पध्दती प्रमाणे आपल्या पाहुण्याचे स्वागत होत होते. आपला पडदा बाजूला सारून प्रियजनांच्या भेटीचे आनंदाश्रु लपवू न शकणारी बुरखाधारी स्त्री होती तसेच तेथे पाया पडून स्वागत करणारे भारतीय ही होते. त्या गर्दीत अमेरीकेबद्दलचे कुतुहल आणि उत्कंठा मनांत साठवून आम्हीही उभे होतो. खांद्यावर हात ठेऊन " साहाब, टॅक्सी खडी है चलिये" हे न्युयॉर्कच्या भारतीय टॅक्सी वाल्याचे शद्व ऐकून भानावर आलो. ७५ लाख लोक वस्तीचे न्युयॉर्कहे अमेरीकेतील सर्वात मोठे शहर आहे. येथे दोन सुसज्ज विमानतळ, सर्वात जास्त लोकसंख्या शैक्षणिक, औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले. येथे अनेक सामाजिक बांधिलकी असलेल्या संस्था आहेत. चर्चचीही मोठी संस्था आहे. याच बरोबर गुन्हेगारीच्या ही जगात आघाडीवर आहे. आधुनिक विज्ञानाच्या मदतीने गुन्हे करणारे बहुधा जगातील ह्या प्रवृत्तीचे लोक येथूनंच आपल्या व्यवसायाचे धडे घेत असावेत.

स्वातंत्र्य देवतेचा पुतळा हा येथील वास्तुशास्त्राचा एक चमत्कार तर आहेच परंतु फ्रेंच राज्यक्रांतीनी भारावून गेलेल्या कलाकारांनी अमेरीकेला भेट म्हणून दिलेला हा पुतळा लोकशाही क्रांतीचे प्रतीक आहे. १५१ फुट उंचीचा स्त्रीचा हा पुतळा एका हातात स्वातंत्र्याची मशाल जी पीतळेची आहे आणि उन्हात खरंच मशाल वाटेल अशी चमकते. दुसऱ्या हातात एक पुस्तक त्यावर ४ जुलै १७७४ ही तारीख आहे. फ्रेडरीक आगस्ट बारथोल्डी ह्या फ्रेंच मूर्तिकारानी हा पुतळा तयार केला आहे. अनेक लहान लहान पेट्या मधून तो बोटीने अमेरीकेत पाठविला. याचे खालचा चबुत्तरा ग्रानाईट दगडाचा व ६५ फुट उंचीचा आहे . ह्याला बांधण्याचे पैसे अमेरीकन जनतेकडून जमविले. प्रत्येक दात्याचे नांव वर्तमान पत्रात छापण्याची प्रचलित युक्ति बहुदहा अमेरीकेत त्यावेळी

प्रथमच वापरली गेली. आणि त्यामुळे पेडस्टल करीता पुरेशी धन राशी त्वरीत जमा झाली. वारा पाऊस तुफान ह्याला तोंड देणारा हा चबुत्तरा ३०० तांब्याचे पत्रे वापरुन गुस्ताव्ह इफेल ह्या इंजिनियरनी २०० वर्षापूर्वी बांधला. हे एक लहानसे बेट आहे त्याला लिबर्टी बेट असं नांव आहे. चबुतऱ्या पर्यंत लिफ्टनी जाता येते. खाली म्युजीयम आणि सभोवार बगीच्या. त्यापलीकडे पाणी हटवून खडकांवर मोठ मोठ्या बिल्डींग बांधल्या आहेत. न्युयार्कपेक्षा येथे जमीन स्वस्त मीळाली म्हणून बहुतेक मोठ्या व्यापारी प्रतिष्ठानानी येथे जमीन घेऊन आपली कार्यालये येथे थाटली आहेत. त्याला न्युजर्सी नांव दिले आहे. तेथे एम्पायर स्टेट बिल्डींग ही १०२ मजले असणारी १४५४ फुट (४४३ मिटर) उंच बिल्डींग १९३१ मध्ये बांधली. १०२ मजले १२५० फुट त्यावर २०४ फुटाचा अन्टेना आहे. ह्या वरून न्युयॉर्कचे ३ टि.व्ही. स्टेशन व १४ रेडीओ स्टेशने आपले प्रोग्रॅम रीले करतात. स्वच्छ हवेत ४० मैलावरच्या बोटी दिसतात. तसेच दुर्बिणीवून ८० मैलावरची सृष्टी शोभा दिसते. ८६ व्या मजल्यावर (१०५० फुट उंची ३२० मिटर) आणि १०२ व्या मजल्यावर निरीक्षण गॅलरी आहे. आता ८६ मजल्यावरच लिफटनी जाऊ देतात. जवळ जवळ २५ लाख लोक एका वर्षात ह्याला भेट देतात. १९७५ मध्ये ह्याला इटाली जर्मनी वगैरेतून टाईल्स आणून लावल्या व इतर दुरुस्ती केली, तेव्हा त्याला १४० लाख डॉलर खर्च आला. चार वर्षापूर्वी ट्वीन ब्लॉक वर्ल्ड ट्रेड सेंटर ही ११० मजली इमारत येथे बांधली व ११४ मजली बिल्डींग शिकागो येथे झाली आहे. ही आता जगातील सर्वात उंच इमारत आहे. एम्पायर स्टेट बिल्डींग जवळ मॅडीसन हा प्रसिध्द चौक आहे. तेथे जगातील दोन नंबरचे पोस्ट ऑफीस आहे. ते चोवीस तास सुरु असते. (आठवड्यातील सात ही दिवस). त्याच्या जवळच मेडीसन हॉल आहे. येथे एका वेळी १०,००० प्रेक्षक बसू शकतात. ह्या शहराची मांडणी चांगली आहे. दक्षिण् उत्तर असे ५ मोठे रस्ते आहेत. ज्याला अव्हेन्यु म्हणतात. (१) फर्स्ट अव्हेन्यु (२) पार्क अव्हेन्यु (३) फिफ्थ अव्हेन्यु (४) सेन्ट्रल पार्क वेस्ट अव्हेन्यु (५) ब्राडवे अव्हेन्यु हा सिटी रोडस मधला जगातील सर्वात लांब रस्ता आहे. ह्याला पूर्व पश्चिम रस्ते छेद देतात. वॉल स्ट्रीट हा येथील शेअर बाजारचा मुख्य रस्ता आहे. ब्रिटीश व डच लोकांचे ह्या शहरात युध्द झाले. तेव्हा डचानी लाकडाच्या भिंती उभारुन तेथे लढा दिला. ब्रिटीशांनी सर्व अडथळे पार करून डचांना हरविले. तेव्हा पासून ह्या रस्त्याला त्या भिंतीमुळे वॉल स्ट्रीट नांव पडलें. हे हडसन नदी आणि इस्ट रीवर ह्यांचे संगमा

जवळ आहे. युनो करीता काही जागा इस्ट नदी काठी ह्याच्या ताब्यात दिली आहे. येथे युनोची कार्यालये जसे सेक्रेटरी ऐट बिल्डींग, असेबली हॉल, सिक्युरीटी कौन्सील हॉल वगैरे आहेत. येथील सर्व व्यवस्था सिक्युरीटी पासून युनोचे कार्यालय स्वतः पाहाते. त्याच्या गाईड बरोबर आतील सर्व हॉल जनरल असेंबली हॉल, सिक्युरीटी कॉन्सील हॉल वगैरे पाहाता येते. व फोटोही घेता येतात.

बफेलो हे नायगरा धबधब्या जवळ अमेरीकेतील गांव आहे. न्युयॉर्कपासून १ १/४ तासाच्या विमानाच्या प्रवासानंतर येते. नायगरा धबधबा ही निसर्गाची अवर्णनीय शोभा असलेली देण आहे. ह्यात लायटिंग वगैरे करून निसर्ग आणि मानव ह्यांची शोभा वाढविण्यात जणु स्पर्धाच झाली आहे. त्या स्पर्धेत कोण जिंकले व कोण हरले हे ठरविणे कठीण आहे. नायगरा ही नदी अमेरीका आणि कॅनडा ह्यांच्या सिमेवरून वाहते. धबधबा दोन देशांत वेगळा आहे. अमेरीकेकडील भाग ७०० फुट लांब आहे. आणि ५६ मीटर उंची वरुन पाणी पडते. क्रेस्ट जवळून पाहताना खाली दूध सागर तुषारांचे स्वच्छंदी बागडणे त्यात उन पडले तर सप्तरंगही सामील होतात. रात्री निरनिराळे प्रकाश झोत सोडले की ही शोभा आणि त्याची प्रेक्षणियता निसर्गावर मात केल्या सारखी वाटते. खाली बोगद्यातून धबधब्याच्या अगदी तळाशी जाता येते. तेथे १८२ फुटावरुन पडणारा पाण्याचा स्तंभ, त्याचा भीषण आवाज, उडणारे तुषार पिवळे रेनकोट घालून मानव आपल्या इवल्याशा हातानी त्या सौंदर्याला दाद देताना तो दुग्ध सागरही उचंबळून आल्या सारखा वाटतो. कॅनडाच्या भागातील धबधबा हा घोड्याच्या नाली सारखा आहे. त्याची गोल लांबी (कर्व्हींग क्रेस्ट) २१८१ फुट ६७१ मीटर आहे आणि उंची ५३०.६ फूट आहे.(१७४ मी.) दर क्षणाला ४३२४ घन मीटर पाणी वरून नदीत पडते. बोटीतून ह्या अर्ध गोल धबधब्याच्या मध्ये नदीच्या पात्रातून जाता येते. येथे केवळ निसर्गानी केलेली सौंदर्याची पोखरण दिसते. तिन्ही बाजूनी पडणाऱ्या पाण्याची भिंत खाली सर्व दूर खळबळणरे दूधा सारखे पाणी, अंगावर उडणारे असंख्य तुषार, पाण्याचा कानठळ्या बसणारा आवाज आणि त्यामध्ये आपण उभे. रेनकोट सावरायचे भान राहत नाही. वयाची उमज नसते. माणसा माणसातील विरोधाच्या भावना गळून पडतात. न कळत सर्वांच्या तोंडून आवाज निघतात. त्या सौंदर्याचाच आपण एक भाग आहोत असे वाटते. आपण संपूर्ण त्याच्याशी एकरुप झालो आहेत असे वाटते. धबधब्याच्या जवळंच ह्या नदीच पात्रात एकाच आर्चवर पूल बांधला आहे त्यावरून कॅनडातून अमेरीकेत जाता येते. ही एक

आधुनिक वास्तुशास्त्राची किमयाच आहे. सुमारे ५० वर्षापूर्वी येथील जुना पुल पडला त्यानंतर हा रेन बो ब्रिज बांधलायेथून १० मैलावर पावर हाऊस बांधलें आहे. ते १९६१ मध्ये बांधले. ते न्युयॉर्क शहराला १४०० वीज पुरविते. टोरांटो हे कॅनडातील औद्योगीक, सांस्कृतिक आणि व्यापारी केंद्र आहे. रस्त्याच्या दुतर्फा निरनिराळे कारखाने दिसतात. प्रदुषणा बद्दल फारच काळजी घेतलेली दिसते. मिलची चिमणी (धुरांडे) त्यातून अव्याहत निघणारा धूर हे दृश्य तर तेथे दिसतंच नाही. प्रत्येक कारखान्याच्या परीसरात दाट झाडी आहे. त्यामुळे कारखान्याच्या इमारतीही दिसत नाही. बर्फवृष्टीतही हे वृक्ष शाबूत राहतात.

सी एन टॉवर हा जगातील सर्वात उंच मनोरा (फ्री स्टॅन्डींग स्ट्रक्चर) ५५३.३३ मीटर (१८१५ फुट) उंच आहे. फेब्रुवारी १९७३ ते जून ७६ ह्या ४० महिन्यात १५३७ लोकांनी खपून हा बांधला. ४४७ मीटर उंची वर स्पेस डेक (१४६५ फूट) ही निरीक्षण गॅलरी आहे. ही जगांतील सर्वात उंची वरची निरीक्षण गॅलरी आहे. दुसरी ३४२ मीटर (११२२ फुट) वर आहे. ३४१ मीटरवर नाईट क्लब व ३५१ मीटरवर रीव्हाल्व्हींग हॉटेल आहे. येथून सभोवार पाहिले तर काहींना जमिनीवर राहून स्वर्ग दोन बोटे राहिलेले आपण पाहातो. परंतु येथून सभोवार पाहिले तर आसमान ठेंगणे झाल्यासारखे वाटते. व खुजी मानवाची दुनिया आणखीनच खुजी वाटू लागते जून ७६ मध्ये हा मनोरा पूर्ण झाला. त्याचे उद्‌घाटन झाले आणि त्या कंपनीच्या १५३७ मजुरापैकी एका तांत्रिक मजुराने ह्या मनोऱ्या वरून उडी मारुन बलूनच्या साह्याने सुरक्षीत खाली येण्याचा पराक्रम केला. तेव्हा हा जगातील सर्वात उंच मनोरा ठेंगणा वाटू लागला. त्या मजुराच्या पराक्रमाचे कौतुक करण्याऐवजी त्याचा उपहास करून त्याला नोकरीतून काढून टाकण्यात आले. एका दुर्दै वी माणसाच्या पराक्रमाचा उपहास पाहण्याचा योग ह्या मनोऱ्याच्या जन्म वेळीच त्याचे नशीबी आले. हा मनोरा ५५३.३३ मीटर १९७६ मध्ये बांधलेला तर एम्पायर स्टेट बिल्डींग ४४३ मीटर १९३१ मध्ये बांधली. २९० मि. उंच एफेल टॉवर पॅरीसचे ३२० मीटर उंच १८८९ मध्ये बांधलेले. जर्मनी मध्ये म्युनिच येथे अलेंम्बीक टॉवर १९६८ मध्ये बांधले. युरोमास्ट राटर डॅम हॉलंड मध्ये १८५ मीटर १९६० मध्ये सेऊल टॉवर कोरीया मध्ये २३६ मीटर १९६० मध्ये ब्लॅकपुल टॉवर इंग्लंड मध्ये १५८ मीटर उंच १८९४ मध्ये ह्या शिवाय खालील प्रसिध्द टॉवर आहेत. (१) ओस्टंकीनो टॉवर मास्को ५४० मी. १९७१ (२) ताशकंद टॉवर रशिया, ३७५ मी.

१९८४ (३) टोकीयो टॉवर ३२३ मी. १९५८ (४) सिडने टॉवर ऑस्ट्रेलिया ३०४ मी. १९८१ (५) कोलेस्ट्राटा टॉवर स्पेन २८८ मी. १९९२ (६) डॉनस्टोरम टॉवर ऑस्ट्रीया २५२ मी. १९६४ (७) टोलेस्क्राम टॉवर आस्ट्रेलिया १९५ मी. १९८० (८) कॉलगोरी टॉवर कॅनडा १९० मी. १९६८ (९) ब्रिटीश टेलीकॉम १८९ मी. १९६५ (१०) ऑलेम्पीक १९६५ (११)मॉन्ट्रीयल कॅनडा १७५ मी. १९८७ असा जगातल्या निरनिराळ्या देशातील मनोऱ्याचा इतिहास आहे.

येथे पार्लमेंट बिल्डींग आणि युनिव्हर्सीटी परीसर मोठा आहे. अमेरीकेत बहुतेक गावी दिसणारे चायना टाऊन आहे. कॅसा लोमा हा हेन्री मील पीलार्ट चा रोमन गोथीक आणि नॉर्मन कलाकुसरीचा राजवाडा अजून चांगल्या स्थितीत राखलेला आहे. बफेलो ते वॉशिंगटन हे सुमारे ६५० मैल अंतर आहे. व वेळ साधारण ७ तास लागतात. मध्ये २५० मैलावर कारनींग ग्लास फॅक्टरी आहे. येथील म्युझीयम मध्ये मानवाच्या पाषाण युगा पासून १५०० B.C. पासून आज पर्यंतच्या प्रगती सोबत असलेल्या काच उद्योगानी ही कशी कशी प्रगती केली ते त्यात्या काळच्या नमुन्या सहित असे २०,००० नमुने आहेत. त्यात आपण अनुभवलेले जुने रॉकेलचे काचेचे दिवे मोगल कालीन झुम्बर छताचे नक्षीकाम काचेचे बंगले वगैरे फारच सुबक आणि प्रेक्षणिय आहेत.

वॉशिंगटन हे राजधानीचे गांव १७९० मध्ये स्थापन झाले. तेथील आजची लोकसंख्या ३५ लाख आहे. येथे औद्यागिक प्रतिष्टान विशेष नाहीत. हा एका फ्रेंच आर्कीटेक्टचा कल्पना विलास आहे. अमेरीकेच्या १०व्या प्रेसिडेन्टच्या नावानी हे स्थापन झाले. व्हाईट हाऊस ही २ मजली वर डोम असलेली साधी पांढरी वास्तु आहे. खालच्या मजल्यावर अध्यक्ष व त्यांचे कडे येणाऱ्या व्ही. आय. पी. पाहुण्यांचे स्वागत करतात. त्यावेळी युरोपमध्ये राष्ट्रप्रमुखांनी साधी राहाणी ठेवावी, लोकांच्या समीप, त्यांच्या मध्येच राहावे ही विचार धारा फार प्रचारात होती. त्याचीच प्रचिती येथे दिसते. कारण फ्रान्सचे अध्यक्ष पॅरीस शहरात साध्या भवनातच राहतात. व्हाईट हाऊसच्या मध्यभगी भव्य घुमट आहेत. तेथे भव्य सभागृह आहे. त्याच्या उजवीकडे सीनेट चेंबर ह्यात १०० मेंबर असतात. प्रत्येक संस्थानाचे दोन मेंबर असतात. त्यातील लोकांची निवडणूक दर २ वर्षानी होते. डाव्या बाजूला हाऊस चेंबर ह्यात ४६५ मेंबर असतात. ह्याची निवडणूक दर दोन२ वर्षानी होते. त्याच्या बाजूला लहानशी पिवळी इमारत हे अध्यक्षांचे कार्यालय व निवास स्थान आहे. बाजूला ४मजली इमारतीत उपराष्ट्रपतींचे

कार्यालय आहे. जगातील लाखो लोकांचे भवितव्य ठरविणारे त्यांचे जीवन मरणाचे प्रश्न-अधिकार ठरविणारे हे भवन त्याच्या बाजूला अध्यक्षा करीता बगीच्या त्यात हॅलीपॅड व स्वातंत्र्य लढ्यातील सेनापतीचे पुतळे आहेत. तेथे एक ख्रीसमस ट्री आहे. ज्याला दरवर्षी २२ डिसेंबरला अध्यक्ष हार घालून देशात नाताळच्या उत्सवाला सुरुवात करतात. अध्यक्षांनाही स्वातंत्र्याचे आणि शांततेचे भान ठेवावयास सांगणारा हा वृक्ष आहे. वॉशिंगटन मेमोरीयल हा १८० फुट उंच मनोरा आहे. पोलोमॅक नदी जवळ त्याच्याच रेषेत लिंकनचा पुतळा हे तिन्ही एका रेषेत आहेत. आपल्या कडील ताजमहाल समोर कालवा व त्यात दिसणारे ताजमहालाचे प्रतिबिंब हे फ्रेंच वास्तुशास्त्रज्ञाला फारच आवडेल. त्याने तेथेही व्हाईट हाऊस वॉशिंगटन मेमोरीयल व लिंकन मेमोरीयल हे एका रेषेत घेऊन त्याच्यामध्ये कालव्यांचे प्रयोजन केले आहे. एब्राहम लिंकन हा अमेरीकेचा १६वा अध्यक्ष यांनी २८ संस्थांना फेडरेशन करुन स्वातंत्र्य पुकारले. १-४-१८६५ हा स्वातंत्र्याचा पहिला दिवस. त्याच दिवशी त्याचा एक टॉकीज मधल्या स्वातंत्र्य सोहळ्यात खून झाला. तो गुड फ्रायडेचा दिवस होता. अशा तऱ्हेनी आपल्या अंध्यक्षाचा ज्यानी २८ संस्थाने एकत्र करून अमेरीकन राष्ट्राला जन्म दिला - ज्यानी "ऑल मेन आर क्रिएटेड इक्वल" ह्या राष्ट्राला आधारभूत तत्वाचा आधार दिला - सर्वजण कायद्या समोर समान हा लोकशाहीचा परवलीचा घोष दिला त्या अध्यक्षाचा बळी दिला व त्याला हौतात्म्य देऊन स्वातंत्र्याला आगळा वेगळा मुजरा केला. ह्या नंतर आणखी २२ संस्थाने विलीन होऊन ५० संस्थानाचे हे फेडरेशन युनायटेड स्टेट ऑफ अमेरीका झाले आहे.

जाफरसन हे बोटानिस्ट शिक्षणतज्ञ, वास्तुशास्त्रज्ञ, संगीततज्ञ अमेरीकेचे तीसरे अध्यक्ष. १७४३ ते १८२६ ह्या काळतील त्यांच्या स्मृति करीता एक जाफरसन मेमोरीयल तसेच बोटानिकल गार्डन केला आहे. तेथे त्याचा पूर्णाकृती ब्रांझचा पुतळा तसेच भिंतीवर त्यांची प्रसिध्द भाषणं कोरलेली आहेत. अमेरीकेतील नीग्रो रेड इंडियन्सला मानवतेचे अधिकार देणारा, यांची गुलामगिरी बंद करणारा हा अध्यक्ष त्याचे मेमोरियल करुन त्याची स्मृती ठेवण्याचा व उपकारातून उतराई होण्याचा हा प्रयत्न केला आहे. येथे एप्रील ट्री म्हणून सुंदर फुले देणारी झाडांची लागवड केली आहे. ही झाडं जपाननी भेट म्हणून दिली होती. मागच्या युध्दाच्या काळांत ह्यांचा नाश होऊ नये म्हणून महिला संघटनांनी त्यावर दिवस रात्र पहारा ठेवला होता. युध्दा नंतर जपान मधील ह्या

झाडांचा नाश झाला तेव्हा ह्या महिला संघटनांनी येथील झाडांची रोपं जपानला परतफेड म्हणून सप्रेम भेट दिली. अशा रीतीनी दोन शत्रु राष्ट्रात वैमनस्याच्या जागी प्रेम निर्माण करणारा प्रेमाचे प्रतीक बनलेली ही फुल झाडे आहेत.

नॅशनल एअर एँड स्पेस म्युझियम, हे विमानाच्या पहिल्या शोधापासून प्रगति दाखविणारा आलेख आणि त्याच्या प्रतिकृती तेथे आहेत. १९१४ ते १९१८ ह्या काळातील पहिल्या युध्दात विमानानी केलेली कामगिरी, त्याचे त्या वेळचे नमुने तसेच १९३९ ते १९४५ ह्या दुसऱ्या युध्दातील आधुनिक विमाने युटू विमान, त्यानी केलेली मर्दूमकी दिसते. येथे २३ गॅलरी खोल्या आहेत. राईट बंधुंनी शोधलेले पहिले विमान १९०३ सालचे येथे आहे. तसेच चंद्रावरील खडकांचे नमूने पण तेथे आहेत. अपोलो ११ आणि त्या सोबत चंद्रावर जाऊन आलेले कोलंबिया यान हे प्रत्यक्षच तिथे पहायला मिळते. उंची ३.२ मीटर (१०.७") १२ फुट १०" कमाल व्यास, ३.९ मीटर वजन ५९०० किलोग्राम व कमाल वेग ४०२५० कि.मी. प्रतितास (२५०००मैल) सर्वात जास्त गर्दी या याना जवळ असते. ह्याच्या बद्दल प्रेम कुतुहल तर असतेच परंतु त्याला हात लावून आपणही चंद्र स्पर्श अनुभवतो व तसेच त्याला अभिवादन केल्या सारखे ही वाटते.

वॉशिंगटन ते बाल्टीमोर व ओरलँडो हा विमानाचा प्रवास १ १/२ तासाचा आहे. वॉल्ट डिस्ने मॅजिक किंगडम करीता ओरलँडहून अर्धा तास लागतो. येथे मनोरंजन व ज्ञानवर्धक असे अनेक कार्यक्रम आहेत. एकंदर ६ भाग आहेत. (१) मेन स्ट्रीट यु.एस.ए. (२) ऍडव्हेंचर लँड (३) फ्रॅन्टियर लँड (४) लिबर्टी स्क्वेयर (५) फॅन्टसी लँड (६) टुमारो लँड. पहिल्या भागात कालची अमेरीका दाखविली आहे. जुने मूक चित्रपट, घोडा गाडी, वाफेची इंजिन गाडी, वॉल्ट डिस्नेचे चरीत्र, त्याचे मिकी माऊस वगैरे तेथे आहेत.

दुसऱ्या भागात स्वीस कुटुंबाची लाकडी घरे, त्याचे त्या वेळचे राहणी मान वगैरे त्याची जीवन पध्दती दाखविली आहे. अंधाऱ्या जंगलातील नदीतून जाताना दोन्ही किनाऱ्यावर जंगली प्राणी श्वापद, क्रूर दुष्ट मनुष्य प्राणी दिसतात. दुसऱ्या दालनात रंगीतापक्षी त्यांचे मधुर संगीत त्याला पुरक आपले वाद्य संगीत असे मनोहारी वातावरण आहे. चौथ्या दालनात अंधाऱ्या गुहेतून बोटीतून जाताना जुने दर्यावर्दी चाचे, त्याची

गुन्हेगारी कृत्य, शिक्षेचे प्रकार हे दोन्ही किनाऱ्यावर दिसतात. कोलंबस, जेम्स कुक वगैरेंनी किती हिमतीनी ह्या परिस्थितीत दुष्ट प्रवृत्तीशी लढा देत शोध लावले. याची कल्पना येते. तिसऱ्या भागात उघड्या ट्रॉलीच्या गाडीत २ सीटची ट्रॉली जवळ जवळ १०० कि.मी. वेगानी धावतात. त्या गाडीला निरनिराळी वळण ही पुष्कळ आहेत. ४०-५० फुट उंचीवरून खाली धबधब्या सारखी पण रुळावरून वेगानी झेपावणारी गाडी आहे. अज्ञात बेटावर रस्ते चुकत जाणारी गाडी आहे. निरनिराळ्या विद्रूप प्राण्याच्या गुहा आहेत.

चौथ्या लिबर्टी स्क्वेअर ह्या भागात एका स्टेजवर अमेरीकेचे सर्व अध्यक्ष त्यांच्या त्या वेळच्या पोषाखात दिसतात. त्यांची माहिती माईकवर सांगितली जाते. शेवटी त्यांच्यातील काही आपल्या आयुष्यातील मुख्य तत्व, घटना स्वतःच्या भाषेत आणि स्वतःच्या बोलण्याच्या पध्दतीत सांगतात. येथील हॉन्टेड मॅन्शन हे फ़ारच गमतीदार दालन आहे. अंधाऱ्या गुहेतून उघड्या बोटीतून प्रवास आणि दोन्ही किनाऱ्यावर जगातील निरनिराळ्या देशात भूतांचे जे विविध प्रकार भाकड कथा मध्ये वर्णन केले आहे, कथा-कादंबऱ्या-सिनेमात दाखविले आहेत ते सर्व ये` दिसतात. त्यांचे विचित्र चित्कार, आरोळ्या ऐकूयेतात. नुसते धड किंवा नुसते ३..र एखादा सुटा हात आपल्या बोटी पर्यंत येतो. हडळ आपल्या जवळच्या हडकाच्या तुकड्यांनी मंत्र घालताना शाप देताना दिसते. एका ठिकाणी बोट जाताना दोन्ही किनाऱ्यावर लावलेल्या मोठ्या आरशामध्ये आपल्या बोटीत दोघांच्या मध्ये आपल्या खांद्यावर हात ठेऊन एक हडळ विचित्रपणे हसत असलेली दिसते. व मग लोक खडबडून जागे होऊन खरंच आपल्यामध्ये कोणी भूत बसलेलं आहे का ह्याची खात्री करुन घ्यायच्या मागे लागतात. शेवटी एक भूत सांगते की आम्ही येथे ९९९ जण आहोत. तुमच्या पैकी कोणी आपणहून इकडे येत असल्यास तो १०००वा असेल. आम्ही त्याला आमचा राजा करण्यास तयार आहोत. शेवटी एक दर्शक सांगतो, तुम्ही आता पर्यंत पाहिलेल्या ह्या सर्व भाकड कथा आहेत. ह्यातील एकही भूत जगाच्या पाठीवर कुठेच अस्तित्त्वात नाही. ह्या सर्व काल्पनिक कथा खोट्या आहेत. ह्यांचा वापर करमणूकी करीताच करावा.

पाचव्या फॅन्टसी लँड भागात अमेरीकेतील मागच्या शतकातील एक घरगुती चहापार्टी त्या काळातील कुटुंबातील घटकांचे स्वभाव व दृष्टीकोन दाखविला आहे. वॉल्ट डिस्नेच्या २०,००० लीग्ज अंडर दि सी ह्या चित्रपटातील समुद्राच्या तळातील

प्राणीजीवन, वनस्पती बुडालेल्या बोटी इत्यादि दाखविल्या आहेत. एका तलावात पाणबुडीच्या सहाय्याने पाण्याखाली जाऊन पाहता येते. एक ३ डी सिनेमा पाहता येतो. त्यात पडद्यावरची फुलपाखरं आपल्या पासून दीड फुटावर आलेले दिसतात. घोडे आपल्या अंगावर आल्या सारखे वाटतात. त्या करीता चश्मे देतात. ते शो नंतर परत करायचे असतात. एका अंधाऱ्या गुहेतील बोटीच्या प्रवासात एका हडळचा पाठलाग चुकवून बाहेर सहिसलामत येण्याचा भयंकर नाड्या गोठविणारा अनुभव घेता येईल. एका अंधाऱ्या गुहेतून कालव्यातील बोटीनी प्रवास करताना दोन्ही किनाऱ्यावर जगातील निरनिराळ्या देशातील संगीत त्या त्या देशातील वेशभूषा पोशाखात गाताना बोलक्या बाहुल्या दिसतात तेथील प्रकाश योजना आणि संगीत फारच सुखद आणि अप्रतिम आहे. वॉल्ट डिस्ने मुळे प्रसिध्द पावलेली त्याची पात्र मिकी माऊस बदक वगैरे त्यांचा जीवंत शो एका ठिकाणी पाहावयास मिळतो.

सहाव्या टुमारो लँड ह्या भागात आपण एका रॉकेट मधून मंगळावर उड्डाण केल्या सारखे वाटते. समोरच्या पडद्यावर रस्त्यात येणारे ढग इतर यान हवेतील वातावरणातील बदल दिसतात. शेवटी मंगळाचा भूभाग खाच-खळगे टाळून एका शांत मुलखात रॉकेट उतरल्या सारखे वाटते. सभोवार मंगळाचे आता पर्यंत घेतलेल्या फोटोवरून तेथील जमीन तसेच वातावरण दाखवितात. व मग रॉकेट परत येते. तेथील भाग दाखविताना आपल्याला मंगळावर मानव अथवा जीवसृष्टी, वनस्पती दिसली नाही ह्या बद्दल खंत व्यक्त केली जाते.

एका गोल थिएटर मध्ये ३६० अंशाच्या सर्कल व्हीजन पडद्यावर अमेरीकेचे मागच्या २०० वर्षातील जनजीवन, राहणीमान वगैरे दाखवितात. शेवटी चंद्रावर जाणाऱ्या ३ स्टेज रॉकेटचे उड्डाण त्याचे धुराच लोट निघतात. येथे शो संपतो. जणु काय सर्व भविष्य धुक्यात हरवली वाट ह्या प्रमाणे धुरातील धुसर दिसते. एका भागात मानवाची वाहतूक करण्यातील प्रगती दाखविली आहे. ह्यात चक्राचा शोध लागल्यावर वाढलेली गतिमानता, वाफेचे इंजीन, पेट्रोल इंजीन, कार्ब्युरिटर्रच्या शोधानंतरची क्रांती आणि आता अवकाशातील रॉकेटची १० कि.मी. प्रति सेकंदाची गतीशीलता दिसते. स्पेस माऊंटन ह्या अवकाश यानातून वरील गतीनी प्रवास करता येतो. यावेळी आकाशातील विजेचे कल्लोळ गडगडाट दुसऱ्या यानाची आपल्या यानाशी घसट वगैरेतून आपल्या अगदी नाड्या गोठविणारा प्रवास होतो. जून जुलै हे येथील सुटीचे महिने

त्यावेळी तर फारच गर्दी असते. रात्री ९ ते १० डिस्नेच्या सर्व पात्राची निरनिराळ्या रोषपाई केलेल्या रथात मिरवणूक काढतात. त्यात शेवटी मिकी माऊस पाहून प्रेक्षकही नाचतात. व त्याला साद घालतात.

डिस्ने वर्ल्डचा दुसरा भाग म्हणजे इपकॉट सेंटर! ह्याचे दोन भाग आहेत. (फ्युचर वर्ल्डयं) उद्याचे जग आणि वर्ल्ड शोकेस! उद्याचे जग मध्ये एक कॉम्प्युटर दालन आहे. तिथे पृथ्वींच्या जन्माची माहिती आहे. आजच्या विमान, रॉकेट इतर ग्रहावरील सृष्टी वगैरे पाहिजे त्या विषयातील माहिती मिळते. युनिव्हर्स ऑफ एॅनर्जी भागात उर्जा स्त्रोताचे प्रकार, त्यांचा पृथ्वीवरील साठा, नवीन अणु उर्जा प्रकल्प, सौर उर्जा समुद्राच्या भरतीच्या लाटे पासून उर्जा निर्मिती वगैरेची व्याप्ती, त्याच्या उपयोगया बद्दलच्या मर्यादा ह्या बद्दल फारच सविस्तर आणि उपयोगी माहिती मिळते. मुख्य म्हणजे ह्या उर्जे बद्दल कोणत्या एका देशाची माहिती न देता संपूर्ण पृथ्वीचा संकलीत विचार केलेला आहे. होरायझन ह्या भागात जगातील लोकसंख्या वाढीमुळे नवीन गरजा कशा वाढतील त्या करीता शहरी वातावरण कसे असेल, वाळवंटातील शेती, समुद्राच्या तळातील शहरे, अवकाशातील शहराबद्दल ी फारच उत्तम माहिती मिळते. व नवीन प्रगतीच्या दिशा गरजे पोटी कशा विस्तारत आहेत हे पाहून आश्चर्य वाटते.

वर्ल्ड ऑफ मोशन येथे जुन्या घोडागाडीपासून आजच्या रॉकेट आणि अवकाश याना पर्यंत वाहतूकीच्या साधनांची प्रगती दाखविली आहे. माणसात उपजतच कल्पनाशक्ती असते. कोणत्याही नवीन गोष्टीबद्दल कुतुहल असते. आणि त्याच्या मुळाशी जाऊन ते शोधून काढण्याची इच्छा असते. ह्या इच्छेला जीद्द, प्रयत्न ह्यांची जोड देऊन चिकाटीनी ह्या कोड्याचा उलगडा करतात व नवीन शोध लावतात. जर्नी इन टू इम्यॅजिनेशन ह्या दालनात असेच जुने शोध कसे लागले. ते दाखवून तुमच्या कल्पनानाशक्तीला प्रयत्नाची जोड द्या, तिला प्रोत्साहित करा हा संदेश दिला आहे. जमिनीशी माणसाचे युगायुगाचे नाते! तिला एक दाणा दिला तर ती हजारो दाणे आपल्याला परत करणारी जमीन आपल्या फळफुलांनी वनश्रीनी नटून सजून माणसाला दृष्टीसुख देऊन त्याचे स्वागत करणारी, त्याला उपकृत करणारी जमीन! ह्या बद्दलची माहिती दि लॅन्ड ह्या दालनात मिळते. निरनिराळ्या देशातील विविध हवामान, पाऊस, त्यातून पिकणारे धान्य, फळं फुलं ह्यांची माहिती आणि त्यांचे बनविलेले रंगीत रुचीपूर्ण पदार्थ दिसतात.

वाळवंटातील शेती, आशियातील कोणत्या भाज्या वनस्पती अमेरीकेत होऊ शकतील, अमेरीकेतील कोणती पीके, भाज्या यूरोप आशियात होऊ शकतील ह्यांचे प्रयोग हाणि निष्कर्ष येथे दिसतात. शेवटी जमीन तिची अपार दानशक्ती ह्याचा जगातील भूमीपुत्रांनी निरनिराळे प्रगत तंत्रज्ञान वापरुन अमाप फायदा घ्यावा हा प्रगत शेतकऱ्यांना संदेश देतात.

दि लिव्हींग सीज ह्या दालनात समुद्र, त्याचं खारं पाणी ह्या बद्दल माहिती मिळते. जगातील सर्वात कृत्रिम मोठा खाऱ्या पाण्याचा तलाव की ज्यात ५७ लाख गॅलन खारे पाणी आहे. तो तलाव येथे आहे. त्यात ८० प्रकारच्या माशाच्या निरनिराळ्या जाती सोडून परीक्षण केले. समुद्रातील विविध वनस्पती त्यांचा जीवनक्रम इत्यादीवर अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढलेले येथे दिसतात. याचा जगातील समस्त मच्छीमार लोकांनी फायदा घ्यावा ही येथील आयोजकांची धारणा आहे.

वर्ल्ड शोकेस हा निरनिराळ्या देशांचे वैशिष्ट्य दाखविणारा खास कार्यक्रम आहे. एका मोठ्या तलावाभोवती ११ देशांचे भाग आहेत. ह्या ११ देशांत (१) मॅक्सिको (२) नॉर्वे (३) चायना (४) जर्मनी (५) इटाली (६) अमेरीका (७) जपान (८) मोरोको (९) फ्रांस (१०) ब्रिटन (११) कॅनडा हे देश आहेत. पहिल्या दालनात नवा आणि जुना मॅक्सिको दिसतो. दुसऱ्यात हिम वादळ आणि त्यातून सुटका कशी झाली ते दाखवितात. तिसऱ्या मध्ये ३६० अंशाच्या सर्कल व्हिजन पडद्यावर चायनाची जुनी व नवी ओळख. तसेच यंगत्सी नदी चीनचे संकट म्हणून ओळखली जायची ती आता चीनचे वरदान कशी झाली आहे ते पहावयास मिळते. ह्याच प्रमाणे कॅनडाच्या दालनात सर्कल व्हिजन पडद्यावर कॅनडातील सुंदर फुलं, बर्फाच्छादित शिखर रस्त्यावरील २ मीटर बर्फ व तेव्हाचे जन-जीवन पहावयास मिळते. इतर देशांच्या दालनात त्यांचे कला दालन आणि संगीत ऐकावयास मिळते. रात्री ९.३० ते १० वाजता आवाज विरहित शोभेचे दारुकाम दाखवितात. ती रंगाची उधळण फारच मनोहारी दिसते. सर्वत्र उत्साह ओसंडून वाहिल्या सारखा दिसतो. कडेवरच्या मुला पासून सर्व कुटंब पहावयास आलेले हम दो हमारे चार असे कुटंब असते. इकडचा हा उन्हाळा उष्णतामान ८५$^0$-९०$^0$ फॅ. उन्हापासून बचावासाठी बहुतेक कुटुंब अंगाला सारखे क्रिम लावताना दिसतात. काही छोटी अवखळ मुलांचे हाताला दोरी बांधून तिचे दुसरे टोक आई सांभाळत जाताना दिसते. तेव्हा आपल्या कडे अस्वलीला बांधून नेतात ती आठवण होते. अंगात अर्धी हाफ

पँट व वर जर्सी हा पुरुष स्रियांचा समान वेष. पायात स्पोर्ट शूज. हातात काही तरी खाद्य पदार्थ किंवा आईसक्रिम हे सीन दिवसभर दिसतात. साडीवाली बाई दिसली की ते फार आश्चर्यानी पाहतात.

प्रवेशद्वाराजवळ एक छोटासा ओढा- नाला त्यावर लहानसा पुल तया पुलावर उभे राहून दोन्ही डोळे मिटून एक नाणं त्या पाण्यात टाकतात ते पाहिले की ह्या प्रगत विज्ञानाधिष्ठित देशातील मनुष्य मनात श्रध्देचा एक कोपरा अजून कुठेतरी अस्तीत्वात आहे असे वाटते.

पायाने अधु व अपघातात पाय गेलेले लोक इथे ट्रॉलीत बसून फिरताना दिसतात.ट्रॉली नातु कींवा मुलगी ढकलताना दिसते. ह्या गाड्या येथे भाड्यानी मिळ्तात. त्याच्यासाठी वेगळे रस्ते, गेट असतात. स्टेडीयमवर खालची पहली लाईन त्यांच्या करीता राखीव असते. वृध्द आणि अपंग ह्यांची ही समाजानी आणि सरकारनी घेतलेली खास दखल! युनिव्हर्सल स्टुडियो फ्लेरीडा ही एक स्वप्न नगरी १९९० जून मध्ये सुरु झाली. येथे अमेरीकेतील प्रसिध्द सोने कंपन्यांनी भाग घेतला आहे. ह्यात मेट्रो गोल्डवीन मेयर, पॅरामाऊंट पिक्चर्स, युनिव्हर्सल स्टुडिओ सारख्या प्रसिध्द कंपन्यांचा सहभाग आहे. त्यांच्या गाजलेल्या सिनेमात वापरलेले पोषाख, आभुषणे, दागिने व इतर वस्तु ह्यांचे छोटे म्युझियम आहे. या सिनेमात स्क्रीन इफेक्ट्स कसे दिले, पडद्यावर त्या पात्राच्या विशिष्ट लकबी कशा साकार झाल्यात, मर्डर शी रोट ह्या सिनेमातील कोडं उलगडताना त्यात जीवंतपणा येण्या करता घेतलेली काळ्जी वापरलेल्या युक्त्या त्याच्या मेकअप मध्ये बारकावे वगैरे कसे मिळविले. त्याबद्दल लहान लहान फिल्म द्वारे माहिती मिळ्ते.

हरीकेन सिनेमातील लाटांचा भीषण आवाज त्या वेळच्या वादळाचा आवाज हे प्रथम पडद्यावर दाखवून नंतर स्टेजवर प्रेक्षकातील लोक बोलावून त्याच्या कडून ब्लोअर मधील हवेचा झोत निरनिराळ्या लहान मोठ्या घंटूयाचे आवाज काढून स्टुडिओत वादळ कसे निर्माण केले याचा आश्चर्यकारक अनुभव येतो. आणि पडद्यावरील समुद्री तुफानातील भीषणता एका गमतीदार हास्यात बंदीस्त होते.ऑल्फ्रेड हिचकाक चे ३ डी थिएटर आहे. तेथे त्याच्या गाजलेल्या सायको, बर्डस, व्हर्टीगो सारख्या सिनेमातील भीषण सस्पेन्स आणि भिती प्रेक्षकातील किंकाळ्यावरुन किती जीवंत होती हे

जाणवते. ग्रेव्ह यार्ड रीव्ह्यु येथे युनिव्हर्सल स्टुडिओच्या गाजलेल्या मॉन्सर्ट (भुतांचे) ड्राकूला, दि वुल्फमन पॅन्टम ऑफ दि ऑपेरा, फ्रॅन्केस्टीन अंड हिज ब्राईड हया भुतांचे दर्शन म्हणजे आपला जीव ह्या भुतापैकी कोण घेणार ह्या भितियुक्त संभ्रमातच होतो.

एका चार डब्याच्या लोकल गाडीत आपण बसतो. गाडी थोड्या वेळत पुढच्या स्टेशनवर जाते, तेथे थांबते. आणि स्टेशनात उभी असतांनाच तेथे धरणीकंप होतो. गाडीचे डबे डोलतात. समोरच्या रस्त्यावरील कार घरंगळत गाडीवर आदळते. डावीकडून प्लेटफॉर्मवरची कॉंक्रीटची स्लॅब खाली कोसळते. उजव्या प्लॅटफॉर्मवरच्या टाईलसच्या फ्लोअरींगला ३-४ इंच खोल भेगा पडतात दूर एंजीनजवळ आग लागली असते. व मग पाण्याचा पाईप फुटून सर्व प्लेटफॉर्मवर पाणी साचते व आपल्या डब्यातही पाणी येते. मग धरणीकंप थांबतो. गाडीतील आरोळ्या किंकाळ्यानी लोकांचे गोरे चेहरे भितीनी पांढरे फटफटीत तर काळे चेहरे अधिकच काळवंडलेले दिसतात.दूर कुठेतरी झालेल्या धरणीकंपाचे वर्णन आपण वाचतो. पण धरणीकंपाची भयानकता जाणवते ती ह्या अनुभवातूनच. सभोवतालच्या अस्थीर दुनीयेतील स्थीर माणूस किती आगतीक व अस्थिर होतो. हे अशा धरणी कंपाच्या वेळी जाणवते.

टारझनचे रुप आपण सिनेमात पाहतो परंतु येथे ३५ फुट उंच व १३००० पाऊंड वजन असे वर्णन केलेला गोरीला टारझन प्रत्यक्ष उभा केलेला आहे.रोप वे नी आपण वरुन खाली येताना हा टारझन त्याच्या अजस्त्र पंजानी आपली ट्रॉली धरतो की काय असे वाटते. त्याचा भेसूर चेहरा पूर्ण परीसर चिरत जाणाऱ्या आरोळ्या आपल्याला काही वेळ आपण संपल्यातच जमा करतात.

सी वर्ल्ड येथे समुद्रातील विविध प्राणी, मासे ह्यांची फिल्म शो द्वारे माहिती मिळते. शामु स्टेडियम येथे डॉलफीन माशाच्या अनेक करामती पहावयास मिळतात. हा मासा बुध्दीमान असून लवकर शिकतो. प्रत्येक कसरती नंतर त्याला छोटे मासे खावयास दिल्या शिवाय पुढील आयटम तो करत नाही. आपण T.V. वर पाहिलेल्या माशांच्या उड्त्या उड्या, दोन माशांच्या वेगवान शर्यती तसेच शेवटी हा ८ ते १० फुट मासा उभा पाण्याच्या पृष्ठ भागावर ६-७ फुट उंच आणि त्याच्या तोंडावर एक बाई त्याचा लगाम हातात धरून ताशी ३० मैल वेगाने फिरते तेव्हा त्यावर दृष्टी थांबत नाही. त्याचे पंखात जोर खूप असतो. स्टेडियमच्या खालून १४व्या लाईन पर्यंत पाणी फेकून सर्वांना

ओले करतो. तेव्हा थंडीनी आधीच गारठलेले लोक तार स्वरात किंचाळतात. त्या किंचाळण्यात ही माशाचे कौतुकच दिसते. अटलांटिस वॉटर स्टेडियम वर स्कीइंगचे अनेक प्रकार दिसतात. बँडच्या तालावर तोल सांभाळत वेगवान कसरतीनी मन स्तंभीत होतं. डॉलफिन माशाचे शो अमेरीकेत ४० ठिकाणी होतात. आणि वर्षातून जवळ जवळ एक कोटी लोक ते पाहतात. ह्यांची तेथील समुद्रातील संख्या जवळ जवळ ५७,०००. त्यापैकी ४०० अशा शो करीता बंदीस्त आहेत. १९७३ पासून आजपर्यंत ६५० डॉलफिन मासे ह्या कसरती शिकताना मरण पावले. ह्या माशांची बंदीस्त जागेत जास्तीत जास्त लांबी ९ फुट आणि वजन ६०० पाउंड असते तर समुद्रात १२ फुट लांब व वजन १०० पाउंड नोंदविले आहे. तो ताशी तीन मैल वेगाने जातो. परंतु भक्ष्याचा पाठलाग करताना किंवा संकटापासून दूर पळताना ह्याचा वेग ३० मैल प्रति तास नोंदविला आहे. ह्याचे आयुष्य ५७ वर्ष आहे. ह्याचा मेंदू माणसाच्या मेंदूपेक्षा मोठा असतो. व ग्रहणशक्ति माणसाच्या दुप्पट असते. तो नवीन परीस्थितीतही लवकर अडजेस होतो.

अमेरिकन माणूस नेहमी इतका आनंदी व हसतमुख कसा राहतो ह्याचं मनांत कोडंच वाटतं. पोटातून काही व्यथा असतील, मनांत दुःख असेल तरी चेहऱ्यावर आनंद, उत्साह ओसंडत असतो. गर्दीत कोणाच्या पायावर पाय प ना तरी ती बाई किंचाळून पण एक्सक्यूज मी म्हणणारंच. दिखाई नही देता? अंधा हो गया क्या? ज्यादा मस्ती आई है क्या? ही मुक्ताफळं आपल्या कडेच! ते लोक स्टेडियमवरही मागच्या पुढच्या लोकांशी हस्तांदोलन करुन स्वागत करतात किंवा निरोप घेणार! चिंतेने ग्रासलेले दुर्मुखलेले चेहरे तेथे दिसतंच नाहीत! जीवनातील प्रत्येक क्षण हा चैन आणि आनंद उपभोग घेण्याचा क्षण आहे असे ते मानतात. समृध्दी सुबत्तेच्या बरोबर मनाचा दिलदारपणा, खिलाडू वृत्ती, विशाल दृष्टीकोन आला आहे. तसेच सोबत शिष्टाचार ही निपजला आहे!

ओरलँडो ते लॉसेंजीलीस हा चार तासाचा विमान प्रवास. लॉसएनजीलीस हे वीस लाखाची लोकसंख्या असलेले गाव. सिने स्टुडिओ व्यवसाया करीता प्रसिध्द. हे न्युयॉर्कच्या तीन तासानी मागे तर मुंबई पेक्षा साडे बारा तासानी मागे आहे. मॅन चायनीज थिएटर हे १९२७ साली बांधले. येथे मुक् सिनेमा पासून आजच्या सिनेमा पर्यंतच्या सर्व नटनट्यांची नावे कोरुन ठेवलेली आहेत. जगातील सौंदर्य सम्राज्ञी मेरीलीन मनरो बंगला ते दाखवितात. विच्छ निराशा आणि वैफल्य ग्रस्त जीवनाचा शेवट पाहीलेला

हा झकास बंगला अगदी साधा बंगला आहे. रेडिओ ड्राईव्ह हा येथील प्रसिध्द एअर कंडीशन्ड मार्केट! येथे प्रसिध्द नटनट्या मार्केटिंगला जातात. त्या आधी दुकानदाराची अपाईंटमेंट घ्यावी लागते.

लॉसएनजीलीस ते लास व्हेगस हा ३१० मैलाचा बसचा सहा तासाचा प्रवास आहे. सर्व खडकाळ भाग. रस्त्याचया दोन्ही बाजूला पडीत खदानीची जमीन. इतर सर्व रस्त्यांवर दुतर्फा दाट झाडी आहे. तसेच टेकड्या सुद्धा हिरव्यागार वनश्रीनी नटलेल्या आहेत परंतू ह्या रस्त्यांनी खडकाळ जमीनी आहेत तेथे वनस्पती लावण्याचे प्रयोग सुरू आहेत. लास व्हेगस हे दिवसा निद्रिस्त असलेले गांव. हे अमेरीकेतील कॅसीनो आणि जुवा संबंधित खेळाचे माहेर घर आहे. येथे दुरून दुरून जुवा खेळण्याकरीता येतात. जगातील पंचतारांकित हॉटेल मधील सर्वात मोठे व दोन नंबरचे हॉटेल येथे आहे. सर्वात मोठ्या हॉटेलात ४००० खोल्या आहेत. तर हॉटेल हिल्टन मध्ये ३००० खोल्या २६ मजल्यात विखूरलेल्या आहेत. येथे रात्रभर कॅसीनोच्या मशीन घरंगळत असतात. येथे सुटे पैसे करण्याकरिता निरनिरळ्या मशीन आहेत. काहीत ५ डॉलरची नोट टाकली तर खाली ट्रे मध्ये २५ सेन्टची नाणी मिळतात. तर काही मध्ये एक डॉलरच्या नोटा मिळतात. रात्री सर्व हॉटेलवर मनोवेधक रोषनाई असते. हॉटेल मीराज मध्ये कृत्रिम नायगरा धबधबा केला आहे. त्यात १४८ मीली दशलक्ष डॉलर खर्चून एक कृत्रिम ज्वालामुखी तयार केला आहे. दर १५ मिनिटांनी ज्वालामुखीचा स्फोट होतो. ८ ते १० फुट उंचीच्या ज्वालामुखीतून धूर आणि ज्वाळावर उडतात. सर्व धबधब्याचे पाणी लाल लावा रसासारखे दिसते. जीवंत ज्वालामुखी इतक्या जवळून अन ते ही त्याचा ज्वालाग्राही लावाचा धोका नसताना पाहणे हा एक मनाला चटका लावणारा अनुभव आहे. त्याच्या समोर एक जुन्या बोटीच्या आकाराचे त्याच्या ड्रॉईव्हींग व्हील धुरांड्यासहीतचे हॉटेल आहे. दर १५ मिनिटानी आपले सायरन वाजवून प्रसाशांना खुणावीत असते. त्याच्या जवळ ज्युलिअस सीझर मेमोरियल आहे. चार पीतळी घोडे रथाला जुंपलेले, त्यात सीझर आपल्या खांद्यावर त्रिशूळ घेऊन घोड्यांना चौखूर उधळत रथातून जाताना दिसतो. रात्रभर सकाळी पाच वाजे पर्यंत हा जुवा चालु राहतो. उलट रात्र जशी जशी वाढते तशी त्या खेळांची नशाही वाढताना दिसते.

ह्या जगप्रसिध्द जुवाडी गावांतील रात्रीच्या कॅसीनो व इतर खेळाच्या नशा बेजोड आहेत. रात्रभर कॅसीनो मशीनची घरघर, नोटांचे सुटे नाणे देणाऱ्या मशीनचे समयबध्द

आवाज, पत्ते आणि इतर चक्र ह्यांचे मंजूळ नाद हरणाऱ्या लोकांचे चित्कार जिंकणाऱ्याचे जग काबीज केल्याच्या विजयोत्सवी आनंदातील उन्माद ह्यांनी सगळं वातावरण धुंद झालेलं असतं. जिंकणाऱ्यांना कुठे थांबावं हे न कळलेलं, हरणाऱ्यांना अधिक स्फुर्ती आलेली पुन्हा जिंकण्याची नवीन इर्षा आणि जास्त पैशाचे बीड वाढवत चाललेले बेभान लोक पुन्हा डाव लावण्याचा लाडीक आग्रह करणाऱ्या सुंदर ललना नोटाचे ढीग इकडून तिकडे सरकताना पाहताना स्वप्नातही न अंदाजलेले वातावरण प्रत्यक्ष दृश्य स्वरुपात पाहताना आपणच कुठे आहोत हा संभ्रम मनाला पडतो.

लास व्हेगास ते सॅनफ्रान्सीसको हा तीन तासाचा प्रवास आहे. हे उंच सखल टेकड्यांचे गांव. दिवसभर कुठल्यातरी भागावर धुकंअसतंच म्हणून ह्याला फॉग सिटी असेही म्हणतात. १७७६ मध्ये पहिला सर्पनीश मिशनरी आपल्या धर्माची ध्वजा घेऊन येथे उतरला. १८३६ मध्ये मेक्सीकन लोक आले आणि १८७६ मध्ये साहसी ब्रिटिशांचे पांढरे पाय येथे उतरले. त्यांनी ह्या गावाचे नाव सेंट फ्रान्सीस ठेवले. येथे सोन्याच्या खाणी सापडल्या! त्याकरीता हाँगकाँगहून अनेक चिनी इथे आले ते नंतर येथेच स्थायीक झाले. आज अमेरीकेत बाकी शहरांपेक्षा या शहरात सर्वात जास्त चिनी लोक राहतात. त्यांचे चायना टाऊन येथे आहे. हे लोक जानेवरी फेब्रूवारी महिन्यात १५ दिवसाचा नव पंधरवाडा १५० फुट लांब कृत्रिम अजगराच्या सानिध्यात साजरा करतात. ४६ १/२ चौरस मैल व्यापाचा, ७० लाख लोकवस्तीचे हे शहर धरणीकंपाला वाहिलेले! येथे वारंवार धरणीकंप होत असतात. गावांत ५० वर्षापूर्वी बांधलेली सुंदर तीन मजली लाकडाची अनेक घरं आहेत. ७-१०-७९ ला मोठा भूकंप रीचर स्केलवर नोंद ७ असा झाला. तसेच जगातील सर्वात मोठा भूकंप रीचर स्केलवर ८.५ नोंद घेऊन ८६ साली झाला. त्या सर्वांवर मात करून ही लाकडी घरं आपल्या सुंदर स्वरुपात आजही दिमाखात उभी आहेत. आता तेथे ५२ मजली कॉंक्रीटची बिल्डींग झाली आहे. त्यात बँक ऑफ अमेरीकेचे कार्यालय आहे. एक ५ मजली शॉपिंग सेंटर आहे. सर्व जगात अद्वितीय असे अर्ध गोल एस्कॅलेटर फक्त येथेच आहे.

गांव उंच सखल असल्यामुळे गावांत केबल कारची बस सेवा आहे. हे ही येथील वैशिष्ट्य आहे. प्रो युनियन डेमॉन्स्ट्रेशनचे स्टेज म्हणजे लंडन मधील हाईड पार्कसारखे वक्ता घडविणारे स्टेज आहे. सात टेकड्यांवर वसलेल्या ह्या गावात टाऊन हॉल, सीफनी हॉल आणि १०,००० प्रेक्षक बसु शकतील असा कुर्कऑडीटोरीयम आहे.

एक स्कॉटीश गार्डनरनी जॉन मॅकलोरा यानी आपल्या ९६ वर्षांच्या आयुष्यात येथे मनुष्य निर्मित पार्क१००० एकरात तयार केला आहे. हा पार्कजगातील सर्वात मोठा पार्कआहे. येथे खाली सर्व वाळू तेथे बाहेरुन माती आणून घातली, व प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेल ही गळे, ह्या उक्तीचा प्रत्यय आणून दिला. त्याच्या जिद्दीची, संकल्पाची कदर म्हणून, त्याच्या उपकारातून उतराई होण्याच्या भूमीकेतून त्याचा जाहिर सत्कार करण्याचा कार्यक्रम ठरला. तेव्हा त्यानी जाहिर विनंती केली की माझ्या सत्कारात मला काही भेट द्यावयाची असेल तर ४० टन खत मला द्यावे ते मी माझ्या फुलझाडांना वाहिन. तेथे जवळ गार्डन लेक आहे. तेथे बोटींच्या शर्यती रीमोट कंट्रोलनी कंट्रोल करून करतात.

गोल्डन ब्रीज हा १.२५ मैल लांबीचा जगांतील सर्वात लांब सस्पेंशन ब्रीज आहे. सहा स्पॅन सर्वात मोठा ४२०० फुटाचा ज्यात ६ ३/८" जाडीच्या ७६५० फुट केबल ८०,००० मैल व वजन २४५०० टन होते. हा १९३५ साली बांधला २५-३० फुट पर्यंत खाली वाळू की ज्यात ८-१० इंजीनियरांचे प्रयत्न फसले. शेवटी एका आयरीश इंजीनियरनी हे आव्हान स्वीकारून भरती ओहोटीच्या सान्निध्यात पुलाचे काम पूर्ण केले. व तो १९३५ साली चालू केला. १९८५ मध्ये एका मोठ्या समारंभात पुलाला ५० वर्षे झाल्याबद्दल त्या इंजीनियरचे आभार मानण्यात आले. ५० वर्षात फक्त काही तास हा पुल बंद ठेवण्यात आला. एकदा ५० वर्षाच्या बिन तक्रार सेवे बद्दलच्या आभार प्रदर्शन सोहळ्या करीता आणि दुसऱ्यांदा एका वर्षी खूप मोठे वादळ झाले तेव्हा. ह्या पुलाच्या पेंटींग साठी चार वर्ष लागतात. वैफल्यग्रस्त, निराश झालेल्या अशा ८०० अकेरीकनानी आता पर्यंत ह्या पुलावरून आत्महत्येचे प्रयत्न केले त्यातील फक्त १९ जणांना वाचविता आले. येथील मच्छीमारी व्यवसाय इटालियन कोळ्यांच्या हाती आहे. हा विस्तिर्ण समुद्र किनारा आहे. परंतु येथे सरासरी पाऊस २५" पडतो. तो ही मागच्या ६ वर्षात दरवर्षी १० ते ११"च पडला. दुष्काळी परिस्थिती तेथे घोषित केली आहे. त्यामुळे दुष्काळ परिस्थितीशी जवळीक साधणारा हा भाग,उगीचच आपल्याला जवळचा वाटतो.

सॅनफ्रान्सीसको ते शिकागो हा विमानाचा साडे तीन तासाचा प्रवास. स्वामी विवेकानंदांच्या इतिहास प्रसिध्द भाषणाचे गाव! येथे भारतीयांची वस्ती जवळ जवळ एक लाखापेक्षा जास्त आहे. येथील इंडीया मार्केट प्रसिध्द आहे. तेथे एक खूप मोठे

व सुंदर देऊळ बांधले आहे. त्यात जम्मुच्या रघुनाथ मंदीरा प्रमाणे मूर्ती स्थापन केल्या आहेत. विठोबा रखुमाईच्या मूर्ती सातासमुद्रा पलीकडे तेथे लवकर स्थापन करणार होते. जगातील सर्वात उंच ११४ मजली बिल्डींग येथे बांधली आहे. औ द्योगीक दृष्टया हे शहर प्रगत आहे तसेच काळ्या लोकांची येथे जास्त वस्ती आहे. अमेरीकेतील इतर शहरापेक्षा गुन्हेगारीसाठी हे शहर प्रसिध्द आहे. गुन्हेगारी बद्दल पुष्कळ वाचलं होतं, ऐकलंही होतं. बहुतेकांनी सांगितलं होत, सावध राहण्याबद्दल सुचविलं होतं. येथील पार्कमधील रंगीबेरंगी रोषनाई केलेले विशाल कारंजे तर बेजोड आहेत. पार्कमध्ये फिरतांना दोन जाडे जुडे कुरळ्या केसाचे धिप्पाड माणसं झाडामागून एकदम पुढ्यात येऊन उभे राहिले. दरडावण्याच्या सुरात कुजबुजत्या घोगऱ्या आवाजात तुमच्या जवळ आहे ते सर्व आम्हाला ताबडतोब द्या अशी त्यांनी आज्ञा केली. १५-२० डॉलर खिशात होते ते व अंगठी घड्याळ देण्याची तयारी केली. परंतु जाता जाता काही सांगावं म्हणून त्यांना भीत भीत सांगितलं की आम्ही टुरीस्ट आणि तेही भारतासारख्या गरीब देशातले, तुमचा देश पहायला आलेले आहेत तेव्हा ते म्हणाले तुम्ही फक्त एक डॉलर द्या आणि येथून लवकर निघून जा. हे संभाषण अर्थात इग्लीशमध्ये झाले. गुन्हेगारीला ही समजदारीची झालर पाहून अचंबा वाटला. आणि तिथल्या गुन्हेगारी बद्दल ऐकले होते त्यावर विरजण पडले. विमानवळावर सामानाकरीता पोर्टर केला त्यानी पळत पळत जाऊन तोंडानी शिट्या वाजवून बस थांबविली व आम्हाला बस मिळवून दिली. आणि पैसे न घेता तुम्हाला बस मिळली यातंच आनंद झाला असे म्हणून शुभेच्छा दिल्या तेव्हा ह्या काळ्या माणसाच्या शुभेच्छांना कशी दाद द्यावी कळेना! अमेरीकेत अजून मेट्रीक पध्दत स्वीकारलेली नाही. सर्व मोजमाप फुट, यार्ड, मैल, पाऊंड यातच होते. शिकागो पासून मिलवाकी हे ८० मैलावर आहे. हे अमेरीकेतील १८ क्रमांकाचे गाव आहे. शिकागो पासून एक लेक ३०० मैल लांब व एक मैल रुंद असे आहे. त्याच्याच काठावर हे मिलवॉकी गाव आहे. २८ मैल x १० मैल अशा विस्तीर्ण जागेवर हे वसले आहे. येथे औद्योगिक वसाहती मोठ्या आहेत. गावाचे झोनल विभाग केले आहेत. आपल्याकडे वार्ड असतात तसे. प्रत्येक झोनमध्ये कॉरपोरेशन शाळा, एक वाचनालय असलेच पाहिजे. शाळेला फी नाही. प्रत्येक शाळेची विद्यार्थ्यांना ने आण करण्याकरीता बस आहे. त्याची ही फी नाही. बालवाडी ते सहावी पर्यंत प्राथमिक शाळा सातवी व आठवी ही वेगळी शाळा. ती मिडल स्कूल आणि ८वी ते १२वी ही हायस्कूल. १०वी

मॅट्रीक नाही. १२वी नंतर कॉलेज किंवा इतर ट्रेडचे शिक्षण. १२वी नंतर मुलंमुली पालका पासून विभक्त होतात. पुढील शिक्षण त्यांनी स्वबळावर घ्यायचे. ८ ते ११वी ह्या इयत्तेतून शाळा सोडणारे ३० ते ४० टक्के विद्यार्थी असतात. १२वी नंतर प्लंबर, फिटर, कारपेंटर इत्यादि ट्रेड शिकून मुलं धंदा नोकरी करतात. कॉलेज शिक्षण फार महाग आहे. इंजिनियरींग किंवा मेडीकलला वर्षाला साधारण २०,००० डॉलर खर्च होतो. त्यामुळे मेडीकल कॉलेज मध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थीच कॉलेजची चौकशी करतो. प्रोफेसर कोण आहेत, लॅब कशी, दवाखाना किती मोठा, किती बेडचा वगैरे त्याला हया सर्व गोष्टी समाधानकारक वाटेल त्याच कॉलेजात तो प्रवेश घेतो. आपल्याकडे देणगी कॉलेजमध्ये कसा सगळा आनंदच आहे. अमेरीकेत गुणी विद्यार्थ्यांकरता सरकारी परतफेडीच्या शिष्यवृत्त्या अनेक आहेत. त्या बिनव्याजी आणि शिक्षण पूर्ण झाल्यावरही ३वर्षानंतर त्याची परतफेडीचे हप्ते सुरु होतात. काही विद्यार्थी डेटींग करता करता आपल्या प्रेयसीशी अथवा प्रियकराशी विवाह करतात. आणि शिक्षण पूर्ण होई पर्यंत पार्टनर त्याचा सर्व खर्च स्वतः नोकरी करुन भागवितात. काही उदाहरणे अशी होतात की १-२ वर्षात त्यांचे बिनसले की शिकणाऱ्या विद्यार्थ्याची खर्चाची मिळवणी करणे अशक्य होते. आणि त्याच्या फजितीला पारावार राहात नाही. अशा वेळी कॉलेज त्याला मेरीट शिष्यवृत्ती मिळवून देण्यास मदत करते किंवा फावल्या वेळात त्या विद्यार्थ्याला काही काम धंदा करून जिद्दीने शिक्षण पूर्ण करणे भाग पडते

प्रत्येक झोन मधील लायब्ररी-ग्रंथालय हे तर एक अजोड प्रकार आहे. त्याला फी नाही किंवा डिपॉझिट नाही. आपण त्या झोनमध्ये राहतो हे एकच कारण त्या ग्रथालयाचा मेंबर होण्याकरीता पुरेसे असते. एका वेळी ४-४ पुस्तक मिळू शकतात. तेथे कॉम्प्युटर असतो. आपल्याला पाहिजे त्या विषयावर किती पुस्तके सध्या आहेत, नवीन किती निघाली आहेत, त्या प्रत्येकाचे नाव, लेखक, पत्ता, किंमत वगैरेची तपशीलवार सुची मिळते. आपल्याला हवे असलेले कोणते पुस्तक तेथे नसल्यास ते दुसरीकडून मागुन देऊन ते दुसऱ्या दिवशी आपल्या घरी पाठवितात. नक्कल करण्याकरीता कॉपीइयरची तेथे सोय असते. ५x५ फुटाच्या लहान लहान स्वतंत्र खोल्या आहेत. तेथे बसून निवांतपणे वाचन करता येते.

आपल्याकडच्या एका ११० वर्षाच्या जुन्या ग्रंथालयात गेलो. तेथे १० पुस्तकांचे नंबर काढून दिले. अर्धातास शोध घेण्यात गेला. नंतर ग्रंथपालानी हसत हसत

सांगितले की १० पैकी ६ पुस्तकांची नावे आमच्या कडे सुची मध्ये आहेत. परंतु ती सापडत नाहीत. दोन पुस्तकंगहाळ झाली आहेत. दोन पुस्तकांची काही पानं फाटली आहेत. म्हणून ती आम्ही देत नाही. ह्याच पुस्तकांचा तुमचा आग्रह कां? आमच्या ग्रंथालयाच्या त्रुटी दाखविण्याचा तुमचा दुष्ट उद्देश दिसतो. इतर अनेक पुस्तक-ग्रंथ आहेत ती वाचा! एका १०० वर्षाच्या जुन्या प्रसिध्द वाचनालयाच्या ग्रंथपालाचा हा मार्मिक सल्ला! दुसऱ्या जिल्हा ग्रंथालयाच्या ग्रंथपालानी गर्वानी सांगितले की आम्ही नवीन सदस्य करीत नाही. कारण माझ्या कडे ५० लोकांची प्रतिक्षा यादी आहे. आणि तेच आमचे भूषण आहे. आमचे ग्रंथालय चांगले असल्याचा तो पुरावा आहे. ज्ञानोपासकांची ग्रंथलयाकरीता आलेली ही दैना शोचनीय नाही का!

इलेक्ट्रोनिक्सचा भरपूर वापर त्यामुळे दैनंदिन जीवन किती तरी सुखकर झालेले आहे. गाडी फाटका जवळ आल्यावर फाटक उघडणे, बाजूचे दिवे लागणे, गॅरेजचे दार उघडणे, नंतर ते बंद होणे ही सर्व कामं रीमोट कंट्रोलवर होतात. गॅरेजचे दार उघडल्या पासून ४० सेकंदात जर ते बंद केले नाही तर जवळच्या पोलीस स्टेशनवर इंडिकेटर लॅम्प लागतो व काही मिनिटातंच सिक्युरिटी पोलीस हजर होतात.

येथील मराठी लोकांचे आपले भावनिक संबंध अजून मराठी संस्कृतीशी, महाराष्ट्राशी जुळलेले दिसतात. ही पहिली पीढी जी भारतात जन्मलेली येथे शिक्षण घेऊन परदेशात येऊन नवे जग नव्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन मुबलक लौकिक फायदे मिळवलेली. आपल्या ऐन बहारीचा काळ मायदेशाला मुकलेली. आपले कर्तृत्वाचे वर्ष संघर्षात घालवून अमेरीकेत स्थायिक झालेली ही पहिली पीढी! डोलकर ह्या कोळीगीतावर किंवा अमर भूपाळी ह्या सिनेमातल्या लावणी गीतावर नाच बसवून आपल्या मराठी जुन्या भावविश्वात धुंद होणारी पीढी, खेड्यातल्या एखाद्या वृध्द भाजीवालीच्या जुन्या संवादात एकरुप होणारी ही पीढी ह्यांना आपली मुलं मराठी न राहिलयाची मनातून फार खंत आहे. अमेरीकेतील वातावरणात वाढलेली ही मुलं मराठी संस्कृतीपासून फार दूर गेलेली आहे. बहुतेक मराठी मुलांना मराठी बोललेलं समजतं पण लिहीता बोलता येत नाही. मराठी लिहिण्याचे चार आठवड्याचे वर्ग तेथे मराठीतून महाराष्ट्र मंडळतर्फे मधून मधून घेतात.

अंकल, फीश, मीट आम्ही खातो तसंच बीफ खायचं त्यात वावगं काय आहे. हे त्यांना थोडक्यात सांगणं आणि पटवणं कठीणंच आहे. पपा, मॉम तम्ही आयुष्यात

काय चुका केल्या आणि त्या पासून काय धडा घेतला हे मला सांगा म्हणजे मी त्या चुका पुढील आयुष्यात होऊ देणार नाही. असं ६-७वीतली मुलगी आई वडीलांना विचारते तेव्हा व्यक्ती विकासाची मूळं तेथे किती खोलवर गेली आहेत हे पाहून आश्चर्यच वाटतं. ह्या मराठी मुलामुलींचे क्रॉस कल्चर विवाह पुढे कितपत यशस्वी होतील हा ह्या पहिल्या पीढीतील मराठी माणसा समोर प्रश्न आहे.

येथे नुकतेच चार विवाह मुला-मुलींच्या पालकांनी रीतसर जुळ्वुन झालेले पाहीले तेव्हा अपले सत्व टिकवण्याच्या जुन्या रीती आणि पायंडे कटाक्षानी पालन करण्याच्या ह्या प्रयत्नांना दाद देण्याची इच्छा झाली.

शिकॅगो आणि सॅनफ्रान्सीसको मध्ये वाढणारी आणि लोकांचे सहज निष्ठुरपणे निर्दालन करणारी गुन्हेगारी हाही अमेरीकेतील जन जीवनाचा एक भाग आहे. शिकॅगोमध्ये तर लोकसंख्येच्या प्रमाणातली गुन्हेगारी हे प्रमाण तर जगातल्या इतर कोणत्याही शहरापेक्षा कीती तरी पटीनी जास्त आहे. गाव कुरवा बाहेर बसलेल्या उपेक्षित वस्त्याप्रमाणे तेथेही 'हार्लेम' ही निग्रोंची वसाहत आहे. तेथील वकालपणा गुन्हेगारी, मादक पदार्थांची उघड अंमल बेकारी, वैफल्य, दारिद्रय, संताप, चीडचीड हे सारे तेथील जीवनाचा एक अंग बनुन राहीली आहेत.

स्टेडीयमवर मागच्या पुढच्या लाईन मधील अनोळखी लोकांचे हस्तांदोलन करून क्षेत्र कुशल विचारणारी हसत मुख ज़ोडपी इथे दीसतात. आपल्या बाय फ्रेंडची जो सध्याचा प्रीयकर व पुढचा नियोजीत नवरा आहे त्याची दुसऱ्या गावी बदली झाली तर अगदी गळयात गळा घालुन अश्रुंना मुक्त वाट मोकळी करून निरोप देणारी नियोजीत जोडपी इथे विमान तळावर दिसते. कारण कुटुंबाची व्याप्ती सीमीत झाल्यामुळे सुख दुखाचे वाटेकरीही ती दोघेच राहीली.

रात्री दोन पर्यंत एकटीने टुरीस्ट बस चालवून टुर पूर्ण करून नंतर लोकलनी ३०-४० मैल दूर घरी जाणारी हसतमुख ६ फुट उंच गौर वर्णाची स्त्री दिसते. आपल्या दोन लहान मुलींचा प्रेमपूर्वक व कर्तव्य दक्षपणानी संभाळ करीत असल्याचे ती उत्साहानी सांगते. नुकतीच त्यांची अध्यक्षांची निवडणूक झाली. आपला अध्यक्ष हा कुटुंब वत्सल असावा. पत्नीशी इमानदार असावा, भ्रष्टाचारी नसावा वगैरे आदर्श त्यांच्या समोर आहेत. सुबत्ता अमाप आहे, सुबत्तेतून स्वैराचार आहे. गुन्हेगारी आहे, परंतु त्या सोबतच मदर्स

डे आहे आणि कुटुंब वत्सल इमानदार अध्यक्षाचा आदर्श आहे. राजकीय जीवन, सामाजिक जीवन आणि व्यक्तीगत जीवनातही इमानदार कुटुंब वत्सल सत्शील नवऱ्याचा आदर्श जोपासलेला आहे.

स्वतःची खास संस्कृती नसलेला जगभरच्या स्थलांतरीतांचा हा देश आपले अस्तीत्वाकरीता लढता लढता प्रथम २८ संस्थानाची सम्मती मिळवून स्थापन केलेला हा देश आहे. सतत कष्ट करीत ज्ञानोपासना करीत तेथील लोकांनी पुढे आणला, प्रगती केली, त्यांचे नंदनवन केले. त्यामुळे त्या देशाबद्दल कुतुहल, आकर्षण हे राहणारच!

●

REFBK-0027259